# ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय.
दिनांक २०/०६/२००९.

## ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त
## सभा क्रमांक ५ दिनांक २०/०६/२००९
## सभा सूचना क्रमांक २ दिनांक १०/०६/२००९
## सभा क्रमांक १ दिनांक २०/०६/२००९

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २०/०६/२००९ रोजी सभा सूचना क्रमांक २ दिनांक १०/०६/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करण्याकरिता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर सौ.स्मिता सुभाष इंदुलकर हया उपस्थित होत्या.

**सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे**

**१. सौ.स्मिता सुभाष इंदुलकर- महापौर**

**२. श्री. अशोक नारायण भोईर- उप महापौर**

३.श्री.सारंग राजेश नामदेव
४.श्रीमती पाटील कविता सुरेश
५. श्री.मधुकर रामचंद्र पावसे
६. श्री.आनंदा तुकाराम केसरी
७. श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर
८. .सौ.शिंदे मिनाक्षी राजेंद्र
९. श्री.रामचंद्र लहू फडतरे
१० श्री.दिनेश मनोर पाथरे
११. सौ.ताई मारुती भोंडवे
१२. श्री. राजेश रामचंद्र ठाकूर
१३. श्रीमती इंदिसे द्रौपदाबाई जगदीश
१४. श्री.नागसेन (भैय्यासाहेब)गंगाराम इंदिसे
१५. सौ.वनिता गंगाराम इंदिसे
१६. सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील
१७. श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील
१८. श्री.भोईर संजय देवराम
१९. . श्री.भोईर देवराम लक्ष्मण
२० श्री.रविंद्र माणिक पाटील
२१.श्रीमती शारदा दादू पाटील
२२.श्रीमती तरे महेश्वरी संजय
२३.श्री.एगडे राम हरी
२४.श्रीमती छाया मनोहर राव
२५.सौ.परिषा प्रताप सरनाईक
२६. श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे
२७. श्री.बारटक्के दिलीप चंद्रकांत
२८. श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंह
२९. श्री.कांबळे सुरेश चंदू
३०. सौ.एकता एकनाथ भोईर

३१. श्री.कांबळे पद्‌माकर संभाजी
३२. .श्रीमती अपर्णा नंदकुमार यादव
३३ श्री.दशरथ बाबुराव पालांडे
३४. श्री. संतोष वसंत वडवले
३५. कु.योगिता रमेश वैती
३६. श्री.विचारे राजन बाबूराव
३७. श्री.सोनार संजय प्रभाकर
३८. श्री.राऊळ अशोक राजाराम
३९. .श्री.कोकाटे सुधीर विष्णू
४०श्री.साळवी संतोष गजानन
४१. श्रीमती मुल्ला फातिमा अंजूम मुहम्मद असिफ
४२.श्री.मुल्ला नजीब सुलेमान
४३. श्रीमती कदम रुपाली रमेश
४४. श्री.लासे मनोज विठ्ठल
४५. श्री.पाटील उमेश काशिनाथ
४६. .सौ.गौरी अनिता सुनिल
४७. श्री.कांबळे दिनेश दाजी
४८.सौ.साळवी अपर्णा मिलींद
४९श्रीमती खातू सुरेखा सुरेश
५०. श्री.मिलिंद भारत पाटील
५१. श्रीमती सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे
५२.श्री.बिष्ट महदिप उर्फ मुन्ना
५३.श्री.नारायण शंकर पवार
५४. श्री.वाघुले संजय संतू
५५. श्रीमती पाटील सुजाता भास्कर
५६. श्रीमती अनिता हिराकांत फर्डे
५७. श्रीमती देशमुख स्मिता मधुकर
५८. श्री.अशोक बारकू वैती
५९. श्री.जनार्दन कृष्णा खेतले
६०. श्री.होडावडेकर मधुकर विठठल
६१. श्रीमती सुनिता (ताई) सुरेश सावंत
६२. श्री.शैलेश तुकाराम शिंदे
६३. सौ.पाटील प्रभावती माने
६४. डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ
६५. श्रीमती कदम निता मदन
६६. श्री.मनोज तुकाराम शिंदे
६७. श्री.कणसे घनश्याम शिवाजी
६८. श्री.मोरे संजय भाऊराव
६९. श्री.फाटक रविंद्र सदानंद
७०. श्री.सावंत शैलेश तुकाराम
७१. .सौ.संगिता मिलिंद बनकर
७२. श्री.पांडुरंग गोविंद पाटील
७३. श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
७४. श्री.लक्ष्मण(लच्छु)चंदुमल टिकमानी
७५. श्री.राऊत प्रकाश हरिश्चंद्र
७६ श्री.खारकर राजेश आत्माराम
७७. श्री.खारकर सुभाष आत्माराम
७८. श्री.सचिन जयराज म्हात्रे
७९. .सौ.मनिषा महेश साळवी
८०. श्री. गणेश यशवंत साळवी
८१. श्री.साप्ते राजेंद्र रमेश
८२. श्रीमती काकडे अनिता बालाजी
८३. श्री.कुरेशी यासीन अय्युब
८४. श्री.सय्यदअली अशरफ उर्फ भाईसाहेब
८५.श्री.शिवदास नाना भगत
८६. श्री.मढवी रमाकांत दशरथ
८७. श्री.राजन नारायण किणे.
८८. .सौ. अनिता राजन किणे
८९. श्री.भगत सुधिर रामचंद्र
९० श्री.महेंद्र वसंतराव कोमुर्लेकर

९१. .सौ.राऊत आशरीन ईब्राहिम
९२ श्रीमती शेख रजिया इकबाल
९३. श्री.डांगरे सिराज अहमंद अली
९४.श्रीमती नाईक हफीजा नसरुद्दीन
९५श्रीमती इम्तियाज बानू
९६. . श्री.सुभाष गणू भोईर
९७ श्री.म्हात्रे दिलीप रतन
९८. श्री.नरेश गणपत म्हस्के
९९.श्री. अनिल गजाानन सावे
१००. श्री. पवन काशिनाथ कदम
१०१.श्री.सन्नी वर्गीस थॉमस
१०२. श्री. मिलींद मनाहेर साळवी

**गैरहजर सदस्य :-**

१. श्री.संजय रामचंद्र तांडेल
२. श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक
३.श्री.जगदाळे हणमंत ज्ञानु
४. श्रीमती अनिता अशोक सावंत
५.श्री.सुधाकर वामन चव्हाण
६.श्री.बळीराम वासुदेव नईबागकर
७.श्रीमती यादव केवलादेवी रामनयन
८.श्री.पाटणकर मिलिंद माधव
९.श्रीमती शांता शामजी सोलंकी
१०.श्री.सामंत विलास शिवराम
११.श्री.वैती हरिष काशिनाथ
१२.श्री.राम पांडुरंग रेपाळे
१३सौ.घाग संगिता चंद्रगुप्त
१४.श्री.घाग चंद्रगुप्त सिताराम
१५.सौ.कोमुर्लेकर स्वाती महेंद्र
१६.श्रीमती नाईक अफिजा नसरुद्दीन
१७.श्री.अन्सारी अस्लम सलिम
१८.श्रीमती खान शगुप्ता नसिर

मा.सचिव :

महापौर महोदया, आजच्या सभेमध्ये चार सन्मा.सदस्यांनी रजेवर असल्याबाबत मा.महापौरांना कळविलेले आहे. १.मा.विरोधी पक्ष नेते श्री. हणमंत जगदाळे . २. मा.स्थायी समिती सभापती सन्मा.श्री.चंद्रगुप्त घाग. ३. सन्मा.सदस्या सौ.संगिता घाग. ४. सन्मा.सदस्य श्री.बळीराम नईबागकर.

आजच्या सभेपुढे एकुण सात प्रश्न आलेले आहेत.

श्री.सुभाष भोईर :

महापौर महोदया,प्रश्नोत्तरास सुरुवात होण्याअगोदर एक अत्यंत महत्त्वाच्या विषयावर चर्चा करणे उचित होईल. मा.महापौर महोदया आपण मा.आयुक्त महोदयांनी ठाणेकर जनतेला आश्वासन दिले आहे की,३० तारखेला कुठल्याही प्रकारे सॅटीस सुरु होणार आहे,परंतू तशी परिस्थिती याठिकाणी दिसत नाही. तरी अशाप्रकारे जनतेला फसवणे योग्य होणार नाही. कारण या सभागृहाच्या पुर्ण भावना आहेत. तरी आपण याठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली पाहिजे. व नंतर आपण सांगितले पाहिजे. कारण आज तेथील परिस्थिती पाहिली असता हे सॅटीसचे काम ३० जूनपर्यंत पुर्ण होईल असे बिलकुल वाटत नाही. याबाबत मी दोन दिवसांपुर्वी मा.आयुक्तांना पत्र दिले होते व या भागाचे आदरणीय खासदार डॉ.संजीव नाईक साहेब व आमदार जितेंद्र आव्हाड साहेब हे पाहणी दौ-यासाठी आम्ही जाणार आहोत तरी आपण व आपले प्रमुख अधिकारी त्या दौ-यास यावे परंतू महापालिकेच्या प्रशासनाने याबाबत कोणत्याही प्रकारची दखल त्याठकाणी घेतली नाही . आम्ही त्याठिकाणी पाहणी दौ-यास गेलो परंतू महापालिकेच्यावतीने फक्त कार्यकारी अभियंता पाफळकर सोडून. कोणताही अधिकारी त्याठिकाणी उपस्थित नव्हता.तरी अशाप्रकारचा अवमान खासदार व आमदार यांचा होत असेल व विरोधी पक्षनेत्यांनी दिलेल्या पत्राचा होत असेल तर ही फार मोठी गंभीर बाब मला या सभागृहात नमुद करावीशी वाटते. हे सभागृह चांगले काम करत असेल तर त्यांच्याबरोबर आम्हीसुध्दा आहोत.परंतू आज त्याठिकाणी अशाप्रारच्या घोषणा केल्या की,३० जूनला सॅटीस प्रकल्प पुर्ण होईल,परंतू हा सॅटीस प्रकल्प ऑगस्टपर्यंत पुर्ण होऊच शकत नाही. आम्ही वर्तमानपत्रामध्ये सुध्दा पाहतो की प्रसिध्दीकरीता वारंवार त्याठिकाणी पाहणी दौरे होत आहेत,व जनतेला त्या प्रकल्पाची पुर्ण माहिती देणे व जनतेला अशाप्रकारे वेठीस धरणे योग्य होणार नाही, एकप्रकारे आपण ज्या पध्दतीने जनतेला आव्हान केले आहे की,३० जुनपर्यंत सॅटीस प्रकल्प पुर्ण हात असुन जनतेच्या सेवेसाठी तो खुला करण्यात येईल. तरी मी याठिकाणी विनंती करतो की,आजची सभा सुरु होण्यापुर्वी आपण सभागृहातील सर्व सदस्यांनी सॅटीस प्रकल्पाची पाहणी करावी व जनतेला सर्वांनी मिळून सांगावे. कारण जेव्हा मी या प्रकल्पाची पाहणी केली त्यावेळी तेथे असणा-या जनतेचे असे म्हणणे होते की,आम्हाला व्ही.टी.येथून ठाण्याला येण्यास ५० मिनिटे लागतात परंतू ठाणे स्टेशन येथून घरी जाण्यास एक ते दिडतास लागतो. कारण तेथे जो ठेकेदार काम करतो त्याच्या माणसांनी जो पसारा टाकलेला आहे त्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे महापौर महोदया आपण व जिल्हा अध्यक्ष यांनी उद्घाटन केले व आता अर्धवट अवस्थेत असताना तो चालू करण्यांत आला तर त्याचे कांय होईल हे आपल्याला माहितआहे. त्यामुळे घाईघाईने काम केले तर ते चांगल्या पध्दतीचे होणार नाही.व हया प्रकल्पाला फार मोठा धोका निर्माण होऊ शकतो,तसेच त्यामध्ये फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होऊ शकतो. तरी महापालिकेच्या वतीने आपण हा सॅटीसचा प्रकल्प हाती घेतलेला आहे व तो चांगला असावा याकरीता मी सभागृहातील सदस्यांना विनंती करतो की,आजची सभा येथेच थांबवून सदरचा प्रकल्प पाहण्यासाठी जाऊया व तेथे जो निर्णय घेणार आहोत तो सर्वांनी मिळून एकत्रित निर्णय घ्यावा,आणि लोकांना खरी परिस्थिती कांय आहे ती सांगावी, व आम्ही जी ३० तारखेची घोषणा केलेली आहे ती चुकुन केलेली आहे. आयुक्त महोदय,इंजिनियर क्षेत्रातला आम्हाला जरी अनुभव नसला तरी गेल्या ३५ ते ४० वर्षापासुन बांधकाम क्षेत्रातील चांगला अनुभव आमच्याकडे आहे. आज या कामाला सुरुवात होऊन २४ महिने झालेले आहेत. त्यांना १६ महिन्याचा कालावधी दिलेला होता,तो कालावधी सुध्दा पुर्ण झ ालेला आहे. दरम्यानच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हलविण्यामध्ये काहीकालावधी गेलेला आहे, परंतू त्यामुळे सॅटीसचा प्रकल्प अडला नव्हता. तरी या प्रकल्पाला जी दिरंगाई झालेली आहेती होत असताना आपण अशाप्रकारे लोकांना आव्हान करणे की ३० जुन रोजी हा पुल आम्ही लोकांसाठी खुले करणार आहोत तरी याबाबत आमचा विश्वास नाही. आम्ही त्या पुलाची पुर्णपण पाहणी केलेली आहे त्यामुळे महापौर महोदया,आपल्याला विनंती करण्यात येत आहे की,आत्ताच्याआत्ता आपण सर्व सदस्य मिळून जाऊया व त्याठिकाणी निर्णय घेऊया अशी सभागृहास विनंती करीत आहे.

श्री.अशोक वैती :

महापौर महोदया,सन्मा.जेष्ठ सदस्य श्री.सुभाष भोईर साहेबांनी अतिशच चांगली सूचना केलेली आहे की,सॅटीचे कामास दिरंगाई होत आहे व त्यामध्ये कोणकोणत्याअडचणी आहेत हे सुध्दा आपण समजून घेणे गरजेचे आहे. भोईर साहेबांनी फार महत्वाची सूचना केली की, आपण त्याठिकाणी जाऊन पाहणी केली पाहिजे. विरोधी पक्षनेते जगदाळे साहेब असताना एकदा पाहणी झालेली आहे. ख-याअर्थाने सर्वांनी पाहणी गरजेचे आहे परंतू ती कोणत्यावेळी केली पाहिजे हा देखिल महत्वाचा मुद्दा आहे. आपण जर आता गेलो तर त्याठिकाणी हातगाडया नसतात. तरी आज संध्याकाळी ही महासभा संपल्यानंतर भोईर साहेबांनी जी सूचना केली आहे त्याप्रमाणे तेथे पाहणी करण्यास गेलो तर त्याठिकाणी काम करताना नक्की कांयकांय अडचणी येतात ते आपल्याला समजेल. तसेच ठेकेदाराकडून डेडलाईन प्रशासनाचे अधिकारी घेत असतात,तशाप्रकारची सूचना मग ते पेपरच्या माध्यमातून किंवा केबलच्या माध्यमातून देत असतात. जर ठेकेदाराने ही सूचना केली असेल की हे ३० जुनपर्यंत करुन देतो आणि होणार नसेल तर मग हया ठेकेदारावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. त्याचप्रमाणे सॅटीसचे हे काम थोड स्लो झाले तरी चालेल परंतू घाईघाईने करुन भविष्यात कोणताही धोका होऊ नये म्हणून थोडा वेळ लागलातरी चालेल परंतू लोकांचा अंत पाहण्याएवढा इतका वेळ सुध्दा नको. तरी सुध्दा हया कामास दिरंगाई कां होत आहे याबाबत आपण सर्वांनी त्याचा पाठपुरावा केला पाहिजे की,दिरंगाईचे नक्की कारण कांय आहे? तसेच माझी अशी सूचना आहे की,संध्याकाळी सातनंतर गेलो तर नक्की त्याठिकाणी समजेल की कोणत्याप्रकारच्या अडचणी आहेत, कारण रात्रौ दहानंतर तेथे काम करुन देण्यात येत नाही,अशाप्रकारची माहिती आम्हाला मिळालेली आहे. तरी याठिकाणी भोईर साहेबांनी चांगली सूचना केलेली आहे,व त्याप्रमाणे आपण सर्वांनी जर त्याठिकाणी गेलोतर सर्वांना समजेल की कामकशाप्रकारे चालू आहे व ते किती दिवसांत पुर्ण होईल. तसेच काम करीत असताना त्यांच्यासुध्दा कांय अडचणी आहेत हयाबाबतीतसुध्दा आपण त्यांच्याशी विचारविनिमय करु शकतो,अशाप्रकारची माझी सूचना आहे.

श्री.सुभाष भोईर :

महापौर महोदया,सन्मा.जेष्ठ सदस्य श्री.अशोक वैती यांनी चांगलीसूचना केली आहे. मुळातच कोणत्याही प्रसिध्दीसाठी आम्ही सॅटीचा पाहणी दौरा केला नव्हता,कोणत्याही फोटाग्राफर्स किंवा मिडीया यांना घेऊन गेलो नव्हतो. माझा मुद्दा आहे की,आपण जी डेडलाईन दिलेली आहे तीच घाईघाईची आहे त्यामुळे सदरचे कामनिकृष्ट दर्जाचे होऊ शकेल,व हिच भिती आम्हाला वाटते. कारण आम्ही तेथील काम पाहिलेले आहे,ते पाहता हे काम अजून तीन महिने होऊच शकत नाही,अशी तेथील परिस्थिती आहे. आणि म्हणूनच जनतेला खोटी आश्वासने देऊ नये याकरीता याबाबत जे कांही निर्णय घ्यायचे असतील ते आपण सर्वांनी मिळून घेऊया.सॅटीसप्रकल्पाच्या विरोधात आम्ही यापुर्वीसुध्दा नव्हतो व आजसुध्दा नाही आहोत. कारण जनतेसाठी आपण हा एक महत्वाचा प्रकल्प उभा करीत आहोत. सॅटीसच्या पाहणीदौ-याबाबत आम्ही मा.आयुक्तांना पत्र दिले होते परंतू त्याची दखल घेण्यात आलेली नाही,त्यामुळे मला येथे बोलणे गरचेचे आहे कारण जनतेच्या भावना याठिकाणी बोलून दाखविणे आणि जनतेला कशापकारे फसविले जात आहे हे आम्हाला याठिकाणी सांगणे आमचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे तेथील पादचारी पुल हा लोकांना न सांगता,विरोधी पक्षनेता यांना विश्वासात न घेता आपण त्याचे उद्‌घाटन केले ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आता बाकीचे काम हे घाईघाईने उरकण्यात येणार आहे,आणि याची संपुर्ण जबाबदारी आपल्यावर येणार आहे, आमच्यावर नाही. पादचारी पुलासंदर्भात आम्ही प्रशासनाला विचारले असता,प्रशासनाने सांगितले होते की,आम्ही त्यांना सांगितले होते की काम पुर्ण झालेले नाही तरी याचे उद्‌घाटन करण्यात येऊ नये,तरीसुध्दा आपण त्याचे उद्‌घाटन केले आहे.

श्री.पांडुरंग पाटील :

महापौर महोदया,याठिकाणी माजी विरोधी पक्षनेते श्री.सुभाष भोईर यांनी सॅटीससंदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. वास्तविक पाहता,स्कायवॅाकचे उद्‌घाटन झाले व कोणालाही विश्वासात घेतले गेले नाही अशीसुध्दा चर्चा झालेली आहे. तरी याबाबत जगदाळे साहेबांना फोन केला होता की,पाहणी दौ-याकरीता आपल्याला सदर ठिकाणी जायचे आहे. व तेथे जात असताना तेथील जो स्काय वॅाक पुर्ण झाला होता परंतू बांबू बांधून तो थांबून ठेवला होता.सॅटीसचे उद्‌घाटन झालेले नाही.तसेच तेथून जे नागरीक येत होते ते तक्रार करायला

लागले की हा स्कायवॉक पुर्ण झालेला आहे,ये-जा करण्यासाठी महिलांना अडचण होत आहे तरी कृपया हा स्कायवॉक चालू करा जेणेकरुन नागरीकांना ते सोयीचे होईल. याबाबत विरोधीपक्षनेत्यांना विश्वासात घेतले नाही असा प्रकार नाही. त्यावेळी मी सुध्दा बाहेरगांवी असल्यामुळे उपस्थित राहू शकलो नाही परंतू जगदाळे साहेबांना फोन करुन सांगण्यांत आले होते. कोणत्याही प्रकारचा पुर्वनियोजित हा कार्यक्रम नव्हता. मी दिवसाआड त्याठिकाणी जातआहे,प्रत्यक्ष त्याठिकाणची पाहणी करीत आहे,दररोज पाच ते सहा नागरीकांची सदर ठिकाणाहून येजा होत असते. तरीसुध्दा आपण येथपर्यंत पोहोचलेलो आहोत. ३० तारखेची डेडलाईन निश्चित दिली होती,व त्या मिटींगला मीसुध्दा हजर होतो व ही डेडलाईन अशासाठी दिली होती की,त्या ठेकेदाराने त्यामध्ये घाई करणे आवश्यक आहे,परंतू त्याला ज्या अडचणी नंतर येत गेलेल्या आहेत त्याचे सुध्दा कोठेतरी सुतोवाच होणे आवश्यक आहे.याठिकाणी ठेकेदाराची बाजु घेण्याचा प्रकार नाही परंतू आज तेथे असंख्य अडचणींना सामोरे जावे लागत आहे,त्यामुळे विरोधी पक्षनेते यांनी जो आरोप केला आहे की,तुम्ही उद्घाटन उरकुन घेतले,परंतू त्यामध्ये कांहीच तथ्य नाही. तसेच ज्यावेळी महापौर पाहणी करण्यास जातात त्यावेळी ठाण्यातील पत्रकार व छायाचित्रकार हे निश्चित उपस्थित असतात. त्यांनी त्यावेळी फोटो काढले व बातमी दिलेली आहे,महापालिकेकडून कोणत्याही प्रकारची बातमी पेपरमध्ये देण्यांत आलेली नाही,याची सुध्दा सभागृहास माहिती होणे आवश्यक आहे. आयुक्त महोदय,याबाबतआपण स्वत: खुलासा करावा की,या सॅटीस प्रकल्पामध्ये आलेल्या अडचणी आणि किती दिवसांत तो पुर्ण होईल,जेणेकरुन आजनागरीकांना आज ज्या अडचणी निर्माण होत आहेत,संध्याकाळी ट्रॅफीकचा जो कोंडमारा होत आहे हा थांबविण्यासाठी आपण खुलासा करावा . तसेच याबाबत सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना तिव्र आहेत म्हणून आजच संध्याकाळी महासभा संपल्यानंतर सर्व सदस्यांना घेऊन सॅटीस प्रकल्पाची पाहणी करावी.

श्री.देवराम भोईर :

महापौर महोदया, आत्ताच सॅटीस प्रकल्पाची पाहणी करण्यास जाऊया.

मा.महापौर :

आज संध्याकाळी सात वाजता सभा संपल्यानंतर पाहणी दौ-यास जाऊया.

श्री.सुभाष भोईर :

महापौर महोदया,आम्ही आपल्या प्रत्येक उपक्रमात आपल्याबरोबर आहोत. सातत्याने विरोधी पक्षनेत्याची भूमिका शहराच्या विकासाकरीता गेल्या अनेक वर्षापासुन पार पाडीत आहे. असे असताना तुम्ही जर राजकीय डाव आखत असाल तर ते योग्य होणार नाही. तसेच जर दिलेल्या पत्राची प्रशासन दखल घेत नसेल तर जाब विचारणे हा आमचा अधिकार आहे. तरी आजच्याआज साईटवर जाऊन कांय परिस्थिती आहे हे जनतेसमोर सांगावी,आम्ही तुमच्याबरोबर आहोत.

मा.महापौर :

मी तुमच्या भावनांशी सहमत आहे. तरी आजची महासभा झाल्यानंतर सॅटीस प्रकल्पाची पाहणी करण्यास जाऊया. आता आयुक्तांना निवेदन करुदया.

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)

मा.महापौर :

दहा मिनिटासाठी सभा खंडीत करण्यांत येत आहे.

(ठिक १२.४० वाजता सभा खंडीत होते.)

सभा ठिक १२.५० वाजता पुर्ववत सुरु होते.

मा.महापौर :

विरोधी पक्षाकडून एकच  जेष्ठ सदस्य श्री.देवराम भोईर बोलतील व सत्तारुढ पक्षाकडून आमचे एकच जेष्ठ सदस्य बोलतील.

श्री.देवराम भोईर :

महापौर महोदया, मला बोलण्याकरीता संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. सन्मा.जेष्ठ सदस्य श्री.सुभाष भोईर साहेब सॅटीसची पाहणी दौरा करण्यासाठी मा.आयुक्त व मा.नगर अभियंता यांना एक पत्र पाठविले होते. हा प्रकल्प पाहण्यासाठी मा.खासदार डॉ.संजीव नाईक,आदरणीय आमदार श्री.जितेंद्र आव्हाड. आम्ही हा प्रकल्प पाहण्यासाठी गेलो होतो.मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती की,या प्रकल्पातील कांही भागाचे उद्घाटन करण्यात आले आहे.तेथे फित कापण्यांत आलेली आहे..,

मा.महापौर :

फित वगैरे कांही कापण्यांत आलेली नाही,सदर ठिकाणी तेथील जे नागरीक होते त्यांनी सांगितले की,हा ब्रिज बांधून झालेला आहे,तरी तो आमच्यासाठी खुला करण्यांत यावा.

श्री.देवराम भोईर :

महापौर महोदया,त्यावेळी आपण मा.विरोधी पक्ष नेते यांना कां घेऊन गेला नाहीत?

मा.महापौर :

आम्ही विरोधी पक्षनेते यांना फोन केला होता.

श्री.देवराम भोईर :

महापौर महोदया,जे कांही पेपरमध्ये फोटो आले व ज्याचे आपण उद्घाटन केले. वास्तविक पाहता या ठाणे महापालिकेचे वैभव सॅटीसच्या माध्यमातून निर्माण होत आहे.सॅटीसच्या प्रकल्पाची आम्ही पाहणी केलेली आहे.  मधल्या काळामध्ये मा.आयुक्तांनी ३० जुनला सॅटीसचे उद्घाटन करणार आहोत,अशाप्रकारच्या बातम्या पेपरमध्ये आल्या होत्या.व ही गोष्ट जर खरी असेल तर आपण प्रत्यक्ष त्याठिकाणी जाऊन पाहणी करावी.या सॅटीस प्रकल्पाकरीता जेएनएनयुआरएमकडून जी निधी येते त्यामुळे आपण हे प्रकल्प उभे करीत आहोत. ३० जूनला हया प्रकल्पाचे उद्घाटन करायचे म्हणून अतिशय घाईघाईने हे काम उरकण्याचा प्रयत्न होत आहे,तसेच आचारसंहिता लागेल म्हणून,त्याठिकाणचे अर्धे सुध्दा काम झालेले नव्हते. आम्ही पाहणी करीत असताना सदर ठिकाणी मो.ह.विदयालय येथे जे काम चालू आहे त्याठिकाणी अदयाप स्लॅब टाकण्यात आलेले नाही,त्याचप्रमाणे स्टेशनजवळ व्यवस्थित काम झालेले नाही. ज्याप्रमाणे गडकरी रंगायतन,स्टेडियम व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय झाले त्याचप्रमाणे हा सुध्दा एक चांगला प्रकल्प होत आहे. आज त्या सॅटीचे पन्नास टक्के सुध्दा काम झ ाालेले नाही.चित्रफितमध्ये दाखविल्याप्रमाणे थोडसेसुध्दा काम तशाप्रकारे झालेले नाही. व अशापरिस्थितीमध्ये ३० तारखेला उद्घाटन होणार अशा ज्या बातम्या येत आहेत. तेथील ठेकेदाराने आम्हाला सांगितले अजून हे काम पुर्ण होण्याकरीता तीन ते चार महिने लागणार आहेत. वास्तविक हया कामासाठी १८ महिन्यांचा कालावधी दिलेला होता व त्याप्रमाणे करारनामा झाला होता.तेथे जे डांबरीकरणाचे काम चालू आहे ते अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे.आज ते प्रकल्पासाठी २२ कोटी रुपये खर्च करीत असताना त्या कामाची क्वॉलिटी चांगली असली पाहिजे.  कारण हा जनतेचा पैसा आहे. मा.महापौर व मा.आयुक्त महोदय आपल्याला माझी विनंती आहे की,अजून या कामासाठी तीन महिने लागले तरी चालतील आम्ही तुमची मुदतवाढ शा ासनाकडून आणु.तसेच त्याठिकाणी जे निकृष्ट दर्जाचे काम चाललेले आहे,त्याबाबत क्वॉलिटी कंट्रोल नेमण्यांत यावे. सदर ठेकेदाराने अठरा महिन्यात काम पुर्ण करायला हवे होते,आज त्या कामाला तीस महिने लागले आहे व यामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा शिप्ट करण्यामध्ये दोन ते तीन महिन्याचा कालावधी गेला होता,परंतू उरलेल्या दहा महिन्यामध्ये त्याने जो दिरंगाईपणा केलेला आहे त्याबाबत त्याला कोणती दंड आकारणी करणार आहात,त्याचा सुध्दा खुलासा याठिकाणी झाला पाहिजे.  कारण शेवटी हा जनतेचा पैसा आहे. या प्रकल्पाकरीता २२ कोटीची तरतुद असताना तो आता ३० कोटीपर्यंत जाणार आहे. तरी आज त्याठिकाणी जे काम चालले आहे त्याबाबत सखोल चौकशी करण्यांत यावी,असे माझे मत आहे.त्याचप्रमाणे मा.खासदार डॉ.संजीव नाईक हे जेएनएनयुआरएमचे प्रमुख आहेत त्यांनी निवडून आल्यानंतर घोषित केले आहे की,या ठाणे शहराकरीता मी पांच हजार कोटी उपलब्ध करुन देणार आहे. तरी अशावेळी अशा व्यक्तींचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.परंतू तसे न करता आपण जर एकेरी भुमिका करत असाल

तर आज ठाण्यामध्ये जी जी कामे झाली त्याबाबत आम्हाला जातीने लक्ष दयावे लागेल याचीसुध्दा नोंद आपण घेतली पाहिजे.आणि पुनश्च मी याठिकाणी सांगू इच्छितो की,जसा प्रकार आर्ट गॅलरीचा झाला तसाच प्रकार सॅटीसबाबत होऊ नये याची दखल घ्यावी,अशी विनंती करतो.

मा.आयुक्त :

मा.महापौर महोदया, सॅटीस संदर्भात मी सभागृहासमोर थोडक्यात निवेदन करीत आहे. सर्वप्रथम हा जो सॅटीस प्रकल्प आहे, देशासाठी एखादा राष्ट्रीय प्रकल्प अतिशय महत्वपुर्ण मानला जातो आणि तो वादातीत रहावा याचा समाजातील सर्व घटक सर्वच आटोकाट प्रयत्न करीत असतात. ठाणेकराच्या दृष्टीकोनातून सॅटीस हा देखिल एखादा राष्ट्रीय प्रकल्प असतो तितकाच ठाणे शहराच्या जिवनाशी निगडीत असलेला हा प्रकल्प आहे याचे महत्व अनन्यसाधारण आहे हे मी सांगण्याची खरे म्हणजे याठिकाणी गरज नाही. त्यामुळे प्रशासनातर्फे मनोमन आमची सर्वांची इच्छा आहे की,हा पुर्णपणे वादातीत असा हा प्रकल्प रहावा,कोठल्याही प्रकारचा वाद विवाद या प्रकल्पाच्या बाबतीत येऊ नये याकरीता आमच्याकडून जेवढे शक्य असेल तेवढे प्रयत्न आम्ही देखिल करीत आहोत व याकरीता आपल्या सर्वांकडून आतापर्यंत जेवढे सहकार्य मिळाले तसेच भविष्यकाळांत सुध्दा मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपल्याला विनंती देखिल करतो.

महापौर महोदया,यासंदर्भात जे कांही सन्मा.विरोधी पक्ष नेते व सन्मा.जेष्ठ सदस्य आणि सन्मा.अन्य जेष्ठ सदस्य,सन्मा.सभागृह नेते व सर्व सन्मा.सदस्यांनी याठिकाणी अन्य सर्व प्रकल्पाचा सुध्दा उल्लेख केला त्याबाबतीत मी कधीतरी योग्यवेळेला परामर्श घेईन व आज फक्त सॅटीसबाबत थोडक्यात मी याठिकाणी निवेदन करु इच्छितो, व त्यातील पहिले निवेदन हे वस्तुस्थितीच्याबाबतीत सभागृहाच्या पटलावर मांडण्याची गरज आहे ते म्हणजे या सॅटीस प्रकल्पाचे उद्‌घाटन आणि त्याबाबत आयुक्तांनी केलेले सुतोवाच. याबाबतीत महापौर महोदया, परवा ठाणे पत्रकार संघामार्फत जो कांही वार्तालाप आयुक्तांशी झालेला होता त्याची सीडीसुध्दा उपलब्ध आहे आवश्यकता वाटली तर आपल्या अनुमतीने तेवढा जो_रिलेव्हन पोर्शन आहे उद्‌घाटना बाबतीत आणि तारखेबाबत ती कांही येथील चर्चा त्याच्या अनुषंगाने मी दोन दिवसांपुर्वी निवेदन केलेले नाही ते सभागृहात सुध्दा मी दाखविण्यास तयार आहे. आशय एवढाच आहे यापुर्वी आयुक्त म्हणुन अनेक वेळेला पदाधिका-यांनी केव्हा कोणते निवेदन करायचे याबाबत जे संकेत व प्रथा तसेच रुढी आहेत त्याप्रमाणे त्यांनी ती निवेदन करायची असतात. प्रशासनामार्फत आमच्याकडून सातत्याने प्रयत्नअसतो आमच्या अधिका-यांना सांगण्याचा. अतिउत्साहच्यावेळी ब-याचवेळेला आपण औपचारीक ठिकाणी सुध्दा कांहीतरी स्टेटमेंट करीत राहतात आणि कळत-नकळत त्यातुन एक गैरसमज निर्माण होतो.यापुर्वी सॅटीस प्रकल्प म्हणजे याबाबत सभागृहाची अनुमती असेल तर मी १५ ते २० मिनिटे घेणार आहे. कुठल्याही परिस्थितीत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी व लोकप्रतिनिधींमध्ये सुध्दा आपापसात कुठल्याही प्रकारचे गैरसमज असु नयेत अशी प्रामाणिक इच्छा आयुक्त म्हणून तसेच वैयक्तिक म्हणून माझी राहील. अन्यथा मतभिन्नता असु शकते परंतू त्यामुळे आपण गैरसमज निर्माण करुन मतभेद व त्याचे रुपांतर म्हणजे जनतेसमोर एक वेगळाच मेसेज जातो, तरी माझे सातत्याने असे सांगणे आहे की,अशाप्रकारच्या ज्या तारखा जाहीर करतात ते करु नये. परवाच्या वार्तालापामध्ये मी निश्चित एक विधान केलेले आहे जे मी सीडीवर आतासुध्दा दाखवू शकेन किंवा आपण बघु शकता तीन विधाने यातारखेबाबत केली होती .आयुक्त म्हणून मी सुरुवातीला ३१ मार्च२००९ रोजी खरे म्हणजे आमचे ३१ डिसेंबर २००९ पर्यंत पुर्ण करण्याचा प्रयत्न आहे परंतू ३१ मार्च२००९ पर्यंत पुर्ण होईल अशी शक्यता असल्याची मी कधीतरी विधान केले होते,सभागृहात सुध्दा मी ते विधान केलेले होते. त्यानंतर ३१ मे २००९ पर्यंत निश्चितपणे आम्ही आटोकाट प्रयत्न करु अशाप्रकारचे विधान केले होते आणि परवाच्या वार्तालापामध्ये म्हटले त्यानंतर कोठलेही विधान आयुक्त म्हणून याठिकाणी हा प्रकल्प केव्हा पुर्ण होणार हे आतापावेतो मी केलेले नाही.आणि परवाच्या वार्तालापात मी सांगितले की आज शनिवारी माझी व्हिजिट ठरली होती परंतू आमचे नगर अभियंता सुध्दा उपलब्ध नाहीत व आज महासभा आहे त्यामुळे परवाच्या वार्तालापात असे जाहिर केलेले आहे की सोमवारी सायंकाळी आयुक्त म्हणुन मी संपूर्ण तांत्रिक व तेथीलसल्लागार आहेत कंत्राटदार आहेत आमचे अधिकारी आहेत यांच्यासमवेत मी त्याठिकाणी भेट देणार आहे व त्यानंतर त्याची संभाव्य साधारण् हा प्रकल्प केव्हापर्यंत पुर्ण करणार आहे व ही तारीख आम्ही जाहिर करणार आहोत त्या वार्तालापात मी दुसरे सुध्दा निवेदन केलेले व हेच सभागृहासमोर मांडण्याची गरज आहे की हयाचे उदृघाटन केव्हा करणार आहात,याबाबतीतसुध्दा मी त्या वार्तालापात म्हटलेले आहे त्यातील कांही सन्मा.पत्रकार मित्र याठिकाणी आहेत की

हा सन्मा.लोकप्रतिनिधीचा प्रेरॉगेटीव्ह आहे सन्मा.महापौरांच्या माध्यमातून याबाबतीत याचे उद्घाटन कधी करायचे हे सर्वांना विश्वासात घेऊन त्याबाबत उचित जी तारीख असेल ती ते जाहिर करतील. प्रकल्प केव्हापुर्ण करता येईल,साधारणपणे नागरीकांना केव्हा उपलब्ध करुन देता येईल हे अनमान आयुक्त करतील व ते करणे आवश्यक आहे व ते माझे कर्तव्य आहे म्हणून मी करणार,परंतू उदृघाटन हया ज्या बाबी असतात त्या संकेताप्रमाणे ते सन्मा.महापौर व त्यातील दुसरे जे संकेत आहेत ते आपल्याला सुध्दा माहित आहे की,सर्वांशी विचारविनिमय करुन आपण ते ठरवितात व त्याप्रमाणे ते करतील. त्यामुळे कोठल्याही प्रकारे आयुक्तानी लेखी तोंडी औपचारीक किंवा अनौपचारीक ३० जुनला या प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे असे कोठेहे निवेदन केलेले नाही व तसे करण्याचा कांही मानसही नाही,हा झाला पहिला मुद्दा. दुसरे जे आपण सांगितले ते भेटीबाबत. भेटीबाबतचे सभागृहाचे संकेत आहेत आपले देखिल संकेतआहेत सन्मा.खासदार असतील,सन्मा.आमदार असतील यांच्यासमवेत आयुक्तांनी भेटीला जावेच असा कांही येथला संकेत नाही. आणि हा पक्षाचा भाग नाही.परंतू आवश्यक असेल यापुर्वी आपण कांहीवेळेला प्रकल्पाला भेटी दिलेल्या आहेत त्यावेळेला सन्मा.महापौर असतील सन्मा.विरोधी पक्षनेते असतील, सन्मा.पदाधिकारी असतील आयुक्त त्यांच्याबरोबर गेलेले आहेत परंतू ज्याज्यावेळेला निवडणुकीचे वातावरण निर्माण होत असते त्यात्यावेळेला तुमच्या ज्या भेटी असतात निश्चितपणे या प्रकल्पाला चालना देण्यासाठी आम्हाला मार्गदर्शक ठरतील परंतू आयुक्त जरी नाही गेले तरी आमचा प्रयत्न असा असतो की जेष्ठ अधिकारी त्याठिकाणी उपस्थित राहतील सन्मा.खासदार यांचेशी आजसुध्दा बोलणे झालेले आहे व काल संध्याकाळी सुध्दा बोलणे झाले निश्चितपणे त्यांचे सहकार्य मोलाचे आहे आणि भविष्यकाळात सुध्दा सर्व सन्मा.लोकप्रतिनिधींचे आम्हाला सहकार्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. संकेत असे आहेत की,एखादा जेष्ठ जबाबदार अधिकारी १८ तारखेला जेव्हा सन्मा.विरोधी पक्षनेत्यांनी ज्यावेळेला ते पत्र दिले त्यानंतर दुस-या दिवशी साडेअकरा वाजता उपस्थित राहणार आहेत म्हणून त्यावेळेला कांही कारणास्तव सन्मा.खासदार महोदय उपस्थित राहू शकले नसतील परंतू सन्मा.आमदार महोदय,सन्मा.विरोधी पक्षनेते महोदय आणि जेष्ठ
सदस्य श्री.देवराम भोईर व अन्य कांही सदस्य त्याठिकाणी उपस्थित होते.या प्रकल्पाचे टिम लिडर आणि प्रोजेक्ट लिडर जेएनएनयुआरएममध्ये याप्रकल्पाचे सर्वोसर्वा टिम लिडर श्री.पाफळकर हे कार्यकारी अभियंता आहेत आणि नगर अभियंता हे त्याचे प्रमुख आहेत त्याप्रमाणे त्याठिकाणी नगर अभियंता जर उपस्थित राहीले असते तर आणखीन उपयुक्तठरले असते . शेवटी तुमच्या भेटीमध्ये तुम्ही ज्या कांहीसूचना केलेल्या आहेत या मोलाच्या असतात. कांही गोष्टी या आमच्या लक्षात नाही आल्या त्या जनतेच्या माध्यमातून आपण जेव्हा एखादया प्रकल्पाकडे बघत असतात तेव्हा तुमच्या दृष्टीकोनातून कांही सूचना केलेल्या असतात तेव्हा आमच्यादृष्टीने त्या मोलाच्या आहेत ,व आतापर्यंत त्या विचारांतघेतलेल्या आहेत व भविष्यकाळांतसुध्दा त्या निश्चितपणे घेतल्या जातील.सन्मा.पदाधिकारी असो,सन्मा.लोकप्रतिनिधी असो सन्मा.खासदार तसेच सन्मा.आमदार यांच्या सुध्दा याबाबतच्या सूचना निश्चितपणे आमच्यादृष्टीने मोलाच्याआहेत,त्यावेळी नगर अभियंता उपस्थित राहिले असते तर चांगले झाले असते. तरी याबाबत कोठल्याही प्रकाराचा प्रशासनाचा त्याबाबत अट्टाहास नाही. तसेच याबाबतचे फोटो आपल्याकडे सुध्दा आहेत तसेच माझ्याकडे सुध्दा आहेत त्या फोटोमध्ये आमचे जे अधिकारी होते त्यामध्ये श्री.पांचाळ सहाआयुक्त त्या विभागाचे होते,श्री.पाफळकर कार्यकारी अभियंता होते,श्री.फणसे प्रभाग अधिकारी होते,श्री.पाटील उपअभियंता होते तसेच श्री.झा हे प्रोजेक्ट कंसलटंट हे सर्वअधिकारी होते आणि भविष्यकाळांत सुध्दा आपण निश्चितपणे हे प्रोजेक्ट पुर्ण करीत असताना कांही भेटी आयोजित केल्या तर जास्तीत जास्त अधिकारी त्याठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रशासनाची कुठलीही हरकत नाही,तुम्ही आलात तुम्ही भेटी दिल्या व त्यामुळे आणखीन जर प्रकल्पाला गती मिळाली तर निश्चितपणे आम्हाला ती स्वागतार्ह बाब आहे . महापौर महोदया, हया दोन गोष्टी सांगितल्यानंतर हे जे फोटो आहेत ते आपल्यासमोर देतो.

तिसरा मुद्दा म्हणजे सॅटीस प्रकल्पाला झालेला विलंब. महापौर महोदया,याबाबत रेकॉर्डवर कांही गोष्टी आणण्याची गरज आहे त्यातला पहिला मुद्दाम्हणजे हा प्रकल्प आपण हा डीपीआर आपण ८ डिसेंबर २००६ रोजी मंजूर केला या प्रकल्पाचे आपण ३ मार्च २००७ रोजी शुभारंभ झाला तसेचयाचा एकुण कालावधी१८ महिने म्हणजे ८ सप्टेंबर २००८ या पुर्वी सध्दा सभागृहाच्यासमोर पटलावर आणलेलीबाब आहे की याचा मुळ कालावधी ८ सप्टेबर २००८ ही होती. हा प्रकल्प घेत असताना त्याठिकाणी जी जागा आहे त्याजागपैकी एक तृतीयांश हीजागा

रेल्वेची आहे आणि बाकीची उर्वरित महापालिकेची रस्त्याची आणि इतर जागा आहे. या रेल्वेबरोबर आपण ८ फेब्रुवारी २००६ रोजी सामंजस्य करार या सभागृहाच्या सहमतीने केलेला आहे की अशाप्रकारचा प्रकल्प उभा रहावा आम्ही जे गल्लीत सांगितले ते दिल्लीतसुध्दा सांगितले आहे की,सॅटीससारखा हा संपूर्ण देशातला पहिला प्रकल्प उभा राहतो आहे,एखादया अर्बन लोकल बॉडीच्या अखत्यारीतला पहिला प्रकल्प होऊ घातलेला आहे. ठाणे महापालिकेने आपल्या सर्वांसाठी हा पक्षातीत,वादातीत आपल्या सर्वांना सभागृहाला अभिमान वाटावा असा हा प्रकल्प आहे जनतेला अभिमान वाटावा असा हा प्रकल्प आहे.८ फेब्रुवारी २००६ रोजी आपण त्यांच्याशी सामंजस्य करार केल्यानंतर रेल्वेने नंतर आम्हाला जीएडी हा जो प्लान असतो त्याकरीता आम्हाला दहा महिन्यांचा कालावधी लागलेला आहे. महापौर महोदया,रेल्वेशी काम करीत असताना आपल्याला अतिशय कटु अनुभव आणि एक जबाबदारी अधिकारी म्हणून रेकॉर्डवर सांगतो की,हा कटु अनुभव फक्त आपल्याशीच नाही तर बृहन्मुंबईतसुध्दा असतील किंवा अन्यठिकाणी सुध्दा रेल्वेशी काम करीत असताना आपल्याला खुप कटु अनुभव आलेले आहेत. रेल्वेचा आरओबी जो पुल आहे किंवा विटाव्याचा जो पुल आहे हे दोन्ही त्याची साक्ष आहेत.या बॅगग्राऊंडवर रेल्वेचे जवळजवळ पंधरा विभाग तारखानिशी प्रत्येक अधिका-यांचे नावानिशी पटलावर ठेवण्यास तयार आहे. दहा महिन्याच्या कालावधीनंतर जीएडी ॲप्रु केले तोपर्यंत रेल्वेच्या जागेमध्ये एक कुठल्याही प्रकारचे काम करण्याची महापालिकेला अनुमती नव्हती,महापालिकेने डीपीआर मंजुर करुन घेतला,महापालिकेने करार केला,महापालिकेने वर्कऑर्डर दिली,महापालिकेने सामंजस्य करार केला,सर्व केले याबाबतीत कदाचित आम्ही कमी पडलो असु,रेल्वेच्या किमान पुर्तता ज्या आहेत त्या करणे प्रशासनाचे काम आहे असे मी मानतो, परंतू याकरीता खूप पाठपुरावा केल्यानंतर अनेक बैठका झाल्यानंतर जनरल अरेजमेंट ड्रॉईंगला १६.१.२००८ ला मान्यता दिली. त्यानंतर पुढील पाच महिने हस्तांतर करण्यासाठी हे या विलंबातील प्रमुख कारणे आहेत . तिसरे विलंबाचे कारण म्हणजे १५ महिन् हे साईट हॅंडींग ओव्हर म्हणजे कॉन्ट्रॅक्टरचे जे म्हणणे आहे आणि हे गर्व्हमेंट ऑफ इंडियाला लेखी कारण आज स्टार प्रोजेक्ट म्हणून घेण्यांत आलेले आहे व त्याचा सुध्दा उल्लेख मी या सभागृहाला केलेला आहे.भारताचे सन्मा.पंतप्रधान महोदय आहेत यांच्याकडे ज कांही स्टार प्रोजेक्ट म्हणून घेण्यांत आलेले आहेत,अभिमानाची बाब त्यामध्ये आपला सॅटीससुध्दा घेण्यांत आलेला आहे. त्याचे मॉनिटरींग हे पीएमओपर्यंत जेएनएनयुआरएमच्या सेलच्या माध्यमातून जाते ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. अशा परिस्थितीमध्ये १६ मे २००९ रोजी अतिशय तपशिलवार तारीखनिहाय म्हणजे कांही वेळकाढू प्रकार नाही परंतू जी वस्तुस्थिती घडलेली आहे याचा अर्थ आपल्याकडून कुठलाच विलंब झालेला नाही अशी बाब नाही .यामध्ये विलंबाचे दोन प्रमुख कारणे म्हणजे रेल्वे व तिसरा म्हणजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे स्थलांतराबाबत आपण सर्वच सन्मा.लोकप्रतिनिधींनी सर्व जबाबदार मंडळीनी जे सहकार्य केले त्याबाबत मी मन:पुर्वक आभारी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हलविण्यासाठी पडदयाच्यासमोर आणि पडदयाच्याआड देखिल अनेक प्रकारचे प्रयत्न करण्यात आले तसेच सर्वपक्षिय बैठका मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झाल्या, मा.उपमहापौर, सर्व सन्मा.लोकप्रतिनिधी अनेक गटाचे प्रतिनिधी, अनेक चर्चेच्या फेरी होऊन अतिशय अडचणीच्या परिस्थितीमध्ये कोठलाही पुतळा नविन करायचा असेल किंवा स्थलांतर करायचा असेल तर त्याला शासनाची मान्यता लागते.परंतू हा शंभर मीटरच्या आतील अंतरामध्ये म्हणजे कोहीनुरच्या बाजुला आपल्या सर्वांच्या संमतीने आपण निर्णय घेतला परंतू तो थोडा कॉर्नरला आहे असे वाटु लागले पुन्हा महापालिकेने धावपळ करुन त्याठिकाणी अतिशय सुंदर जागा केली व त्यानंतर आम्हाला ताप्तुरता पुतळा नको आम्हाला पुर्णाकृती पुतळ्याचे जे कांही चबुतरा आहे तसा पाहिजे आपल्या साक्षीने ही चर्चा झालेली होती ते सुध्दा दोन महिन्यात करुन घेतले . आणि सर्वांच्या साक्षीने,सर्वांच्या सहभागाने आणि सर्वांच्या सहकार्याने एका शुभप्रसंगी विधीवत पुजा करुन त्या पुतळ्याचे स्थलांतर आपण रेल्वे स्टेशनला केले आणि ख-याखु-या अर्थाने त्या कामाला गती आली. आता हया तीन बाबी झाल्यानंतर आपण मुंबईमध्ये व्हीटीपासून ते आमच्या आनंदनगर चेकनाक्यापर्यंतचे संपूर्ण प्रकल्प बघत आहात.आता अलिकडेच मी वारंवार पोर्टट्रस्ट येथील रस्त्यावरुन प्रवास करीत असतो तेथे मोनो रेल्वे तसेच इतर जी कांही कामे चालू आहेत सर्वचठिकाणी कामाचे एक वैशिष्टय असे दिसेल की सेग्रीगेटेड,डेडिगेटेड प्रोजेक्ट इंप्लिटीमेशनसाठी प्रत्येकठिकाणी एरिया दिलेला आहे.त्याठिकाणी दोन्ही बाजुंनी बॅरीगेटींग केलेले आहे. सॅटीस हाच असा एक प्रकल्प आहे की ज्याठिकाणी प्रत्यक्ष लाखो नागरीकांची दररोजची वर्दळ आणि प्रशासनाचे कमी पडलेले प्रयत्न जे हॉकर्सबाबतीत यासाठी निश्चितपणे पोलिस आणि प्रशासन यांनी अधिक दक्ष राहिले असायला हवे होते,कारण हॉकर्सचा त्याठिकाणी खुप त्रास झालेला आहे आणि त्यामुळे विलंब झालेला आहे आणि लाखो नागरीक ये-जा व वाहतुक

पोलीसांची नाईलाजास्तव टाकलेले निर्बंध. सन्मा.शिवानंदन साहेब ज्यावेळेला याचे सीपी होते त्यावेळी त्यांनी पुर्ण सहकार्य करण्याबाबत मान्य केले होते. सन्मा.ढेरे साहेब यांनी सुध्दा तीच परंपरा सॅटीसबाबत चालू ठेवलेली आहे. कुठेही पोलीसांचा अडथळा आहे असे मी म्हणणार नाही. ज्या ज्यावेळेला आयुक्तांनी बैठका बोलाविलेल्या आहेत त्यावेळी डीसीपीसारखे जेष्ठ दर्जाचे अधिकारी आलेले आहेत. परंतू मोठी वाहने जे १५ ते २० मीटरचे रस्ते असलेले त्याहून मेठे जे ट्रेलर्स आणि मोठमोठया क्रेन्स हलविणे हे सर्व कामे दिवसा कधीही होऊ शकली नाहीत. शेवटी मला वाहतुकवाल्यांना विनंती करावी लागली की निदान जीबीरोडवरुन सर्व्हीस रोडवरुन दिवसा येऊ देत आणि नंतर रात्री दहाच्यापुढे आपण अनुमती दयावी कारण खुप गर्दीची जागा असल्यामुळे गर्डर लाँचीग करण्यासाठी व क्रेन मोमेंटसाठी हा फक्त संध्याकाळी दहा ते सकाळी सहा एवढाच कालावधी आपल्याला उपलब्ध होत होता आणि त्यामुळे देखिल आपल्याला निश्चितपणे कामाची जी स्पिड आपण अपेक्षित केलेली होती त्यापेक्षा कामाचा स्पिड कमी झालेला आहे असे जर म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. या सर्व परिस्थितीतुन आणखीन एकच मुद्दा मी सांगेन की सुरुवातीच्या काळाला टीएमटी असो एसटी असो किंवा रिक्षा असो आता रिक्षाच्याबाबतीत देखिल तशीच परिस्थिती आहे,हॉकर्स आणि ऑटो रिक्षा ठाण्यामध्ये किती आहेत याचे अनुमान मी करणार नाही परंतू ऑटोरिक्षाबाबत त्यांची संघटना आणि आमचे वाहतुकचे अधिकारी आहेत आपले सर्व सन्मा.पदाधिकारी,लोकप्रतिनिधी आहेत सर्वाच्या सहकार्याने त्यांनी सहकार्य देण्याचे मान्य केले परंतू यामुळे अपेक्षित गती जी आपल्याला अपेक्षित होती ती निश्चितपणे आपल्याला मिळू शकली नाही,ही वस्तुस्थिती आहे तसेच जी मॅनपॉवर होती त्याबाबत मध्यंतरी ज्या निवडणुका झाल्या त्यावेळी हा कांही एक्युझेसचा भाग नाही कारण कंत्राटदाराने कोठुन माणसे आणावीत याला आम्ही कांही जस्टीफिकेशन देण्याचा भाग नाही परंतू त्यावेळी मनुष्यबळ फार कमी झाले होते. कांही घटना अशा घडल्या त्यामुळे कांही ठिकाणी मारहाणीचे तसेच दमदाटीचे प्रकार झाले होते,त्यामुळे सुध्दा याचा कामावर परिणाम झाला होता. या सर्व विलंबामुळे कांही काळ सॅटीस प्रकल्प उभारण्यास विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती जरी असली तरी या सर्व बाबी आणि रेल्वेने सुचविलेले मेजर चेंजेस जे कांही ड्रॉईंग आहेत जे कांही डिझाईन आहेत ते फायनल करण्यासाठी विलंब झाला आणि याचा सर्वाचाच परिपाक म्हणजे आपण त्यास सुरुवात केली नाही तरीसुध् दा आपण आता जी शिल्लक राहिलेली कामे आहेत त्याची सोमवारी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतरच समजेल. आपण यामध्ये दोन मुद्दे सभागृहात व्यक्त करण्यासाठी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.यामध्ये जेष्ठ सदस्यांनी दर्जाबाबत सांगितले आणि दुसरा म्हणजे हा प्रकल्प केव्हा कार्यान्वित होणार आणि घाईघाईने करु नका हा सल्ला तर मोलाचा आहे निश्चितपणे मी आदर करतो आणि मानतो. दर्जाबाबत सांगायचे तर यामध्ये दोन भाग आहेत. एकंदर आरसीसी फ्रेम असेल,स्लॅब असेल हे अतिशय दर्जेदार काम आहे असे आमचे मत आहे. मॉनिटरींग एजन्सी जे गर्व्हमेंट ऑफ इंडिया यांनी अपॉईन केलेले आहे त्यांचे पत्ते देतो,मागच्यावेळी मी सभागृहात पटलावर ठेवले होते त्यांनी केलेल्या ऑर्ब्जवेशनचे रिपोर्ट देतो ते आपण बघु शकता.त्यामध्ये कांही त्रुटी नसतील एवढे धाडसी विधान मी आयुक्त म्हणून करणार नाही परंतू सर्वसाधारणपणे त्याचा दर्जा ब-यापैकी चांगला आहे,चांगला असावा अशी माझी धारणा आहे.

दुसरा सन्मा.सदस्यांनी मुद्दा मांडला की सदरठिकाणी घाईघाईने डांबरीकरण करण्यात येत आहे. हा फक्त ५० एमएमचा थर आहे तर हा मात्र थोडया घाईगडबडीने होत आहे ही वस्तुस्थिती आहे व त्याचे कारण एवढेच आहे की,स्लॅब कास्टींगनंतर डांबरीकरण का लागते तो कंसलटंटचा भाग आहे परंतू डांबरीकरण हे पावसाळ्यापुर्वी शक्य झाले तर लवकर करावे अर्थात दर्जेदार करावे हे अपेक्षित आहे कारण बाकीची कामे होऊ शकतात परंतू डांबर हा असा प्रकार आहे की पावसात त्याला अडचण होते.कांही अपवादात्मक काम सोडले तर डांबरीकरण एवढया मोठया प्रमाणात पावसाळ्यांत होत नाही म्हणून जेथे जागा उपलब्ध झाली त्याठिकाणी डांबरीकरण करण्याचे त्यांनीच निर्णय घेतला व त्याप्रमाणे काम चालू आहे आणखी चांगला दर्जा राखण्यासाठी मी पुनश्च भेटीमध्ये मी स्वत: दक्षता घेईन. आता जी बॅलेन्स कामे आहेत यामध्ये आपण आणखीन एक मुद्दा उपस्थित केला की,हे जे दोन एफओबी आहे याच्या उद्घाटनाबाबत सभागृहात चर्चा झाली तरी याबाबत मी सभागृहात एकच विनंती करेन की,एफओबी साऊथ आणि एफओबी नॉर्थ याती एफओबी साऊथ हा आपण ओपन केलेला आहे त्याचे कारण नागरीकांची जीवघेणी गर्दी थोडी कमी व्हावी म्हणून तो उपलब्ध होता म्हणून ओपन केलेला आहे. तरी माझ्यादृष्टीने देखिल ते औपचारीकपणे त्याचे उद्घाटन होऊ शकते असे तर आपण मानतही नाही कारण तो एखादा छोटासा भाग ओपन केला म्हणजे त्या संपूर्ण प्रकल्पाचे उद्घाटन झाले असे होत नाही. या परिस्थितीमध्ये आता जे शिल्लक राहिलेले काम आहे त्यामध्ये आमचे सर्वात जास्त प्रयत्न काय आहे तर आपण कांहीही भाष्य केले तरी

आमचे निश्चितपणे जमिनीवरच पाय आहेत परंतू या प्रकल्पाच्याबाबतीत जमिनीवरुन वरती जावे असा आमचा प्रयत्न आहे. म्हणजे जमिनीवर जेवढी कामे चालू आहेत ते लवकरात लवकर पुर्ण करावेत ते संपूर्ण स्कॅफोल्डींग वगेरे काढावेत व ते काढल्यानंतर खालच्या ज्या लाईटींग त्या कराव्यात व लेनमार्कींग करावीत व याबाबत सोमवारीच ट्रॅफीकचे अधिकारी व आमचे अधिकारी व रिक्षा टॅक्सी युनियन यांचेबरोबर चर्चा करायची आहे.कारण त्यांना विश्वासात घ्यावे लागेल,विश्वासात घेतले तर काहीही होते जर आपण एकतर्फी सांगितले तर गुंता होतो तरी याबाबत त्यांना विश्वासात घेऊन तो ट्रॅफीचा प्लान ते माझ्याकडे देणार आहेत नंतर आपणासर्वांना विश्वासात घेऊन तो आपण अंतिम करु. हे सर्व केल्याने रिक्षाची वाहतुक आपोआपच सुरळीत होईल परंतू बसची वाहतुक कशी होईल एवढाच माझ्यासमोर प्रश्न आहे परंतू केव्हाही कुठल्याही परिस्थिती स्लॅबच्याबाबतीत ही जी कामे आहेत कुठल्याही परिस्थितीत स्टेशनच्या समोरील स्कॅफोल्डींग वगैरे काढून हा जो खालचा भाग आहे हा भाग साधारणपणे ८ ते १० जुलैपर्यंत संपुर्ण मोकळा होईल. त्यामुळे खालुन जे ट्रॅफीक जाणार आहे ती १० जुलैपर्यंत संपूर्ण सुरळीत होईल बस सोडून अशी आमची अपेक्षा आहे. आरसीसीची जी कामे आहेत डेस्करस्लॅबची आहेत ती अंतिम टप्प्यात आलेली आहेत व ती कोठल्याही परिस्थितीत ३० जुनपर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे आणि ते होईल असे अपेक्षित आहे. एक्सांपशन जॉईटला खरे म्हणजे वेळ लागत आहे,परंतू हा थोडा टेक्निकल मुद्दा असतो त्याला अतिशय तज्ञ अशी माणसे लागतात.तरी हे सुध्दा काम जुलैपर्यंत होण्याची शक्यता आहे. पुलाचे रंगकाम सध्या ज्याज्याठिकाणी चालू आहे ते चालू आहे आणि ते देखिल आपण जुलैअखेर पुर्ण करण्याचे काम चालू आहे. डांबरीकरण ज्याज्याठिकाणी होईल तेथे तेथे बसस्टॉप उभारणीचे देखिल काम चालू होईल आणि त्यानंतर हा पुल वाहतुकीसाठी खुला राहील.तरी आमचा अनुमान आहे साधारणपणे जुले अखेर ते ऑगस्टच्या पहिल्या दुस-या आठवडयापर्यंत हा वाहतुकीसाठी ९५ टक्के काम पुर्ण होऊन १०० टक्के वाहतुकीसाठी पुर्ण होण्याची शक्यता आहे व निश्चित किती कालावधी लागेल हे प्रशासनामार्फत आम्ही सर्व पदाधिकारी तसेच आपल्याला देखिल सन्मा.विरोधी पक्षनेते यांना देखिल आम्ही त्याची माहिती माझी परवाची व्हिजिट झाल्यानंतर मी देईन आणि कुठल्याही प्रकारे हा सॅटीसचा प्रकल्प लवकरात लवकर आमचा पुर्ण करण्याचा मानस आहे आणि याच्यात नागरीकांची जी गैरसोय झालेली असेल तरी हा मेगा प्रोजेक्ट आहे, कॉंप्लेक्स प्रोजेक्ट आहे व यातील ड्रॉईग,डिझ ाईन,बाकीच्या एजन्सीस,एक्सर्टनल पोर्सेस या सर्व बाबी विचारांत घेता,प्रशासनाने प्रयत्नाची पराकाष्ठा केलेली आहे एवढेच मी याठिकाणी सांगेन आणि जसे आपले आतापर्यंतचे सहकार्य मिळालेले आहे तसेच सहकार्य हे पुर्णत्वास येईपर्यंत आपल्या सहकार्यानेच आणि सहभागातून पुर्ण होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो याठिकाणी मी आवर्जुन सांगेन की सर्वांनीच सहकार्य केल्यामुळे या स्टेजला आपण आलेलो आहोत. रेल्वेला राज्य शासनाकडून सूचना देण्यांत आलेल्या होत्या,केंद्र शासनाने सुध्दा सातत्याने दिल्लीला बैठकीमध्ये जे कांही प्रकल्प मॉनिटर करीत होते त्यामध्ये हा प्रकल्प आहे केंद्र शासनाचे फक्त आर्थिकच मोलाचा भाग नसून हा स्टार प्रोजेक्ट आहे म्हणून सन्मा.मुख्यमंत्री महोदयांच्यासमोर देखिल याची आढावा घेतलेला आहे त्यांनी देखिल संबंधिताना निर्देश दिलेले आहेत.यामध्ये केंद्र शासन आले,राज्य शासन आले,व आपल्या सर्वांच्याच सहकार्याने आणि सहभागातून हा प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करु एवढेच मी याठिकाणी सभागृहाला ग्वाही देऊ इच्छितो आणि माझ ो निवेदन याठिकाणी मी आटोपतं घेतो धन्यवाद.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदया,संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ठाणेमहापाकिला सन्मा.भारताचे पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण साहेबतसेच मा.श्री.शरदराव पवार साहेब यांनी प्रचंड मदत करुन ठाण्यामध्ये सॅटीस प्रकल्प प्रथम राबविण्यासाठी मदत केली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. परंतू महापौर महोदया,२००८ रोजी सुरु झालेलासॅटीस प्रकल्प एवढा लांबला का, याचे कथन आयुक्त साहेबांनी याठिकाणी केलेले आहे. थोडेसे याबाबत मला विचारायचे आहे की,ज्यावेळी आपण एखादा प्रकल्प हाती घेतो त्यावेळी अगोदर कांही त्याबाबतची संमती ही घ्यायला पाहिजे होती असे मला वाटते. व याची प्रशासनाने सुध्दा नोंद घ्यावी. आज हा सॅटीस प्रकल्प हाती घेतल्यानंतर ब-याचशा अडचणींना आपल्याला तोंड दयावे लागले हे सर्व सभागृहाला माहित आहे. या सॅटीस प्रकल्पामध्ये खायचे दात वेगळे आणि दाखवयाचे दात वेगळेअशा प्रकारची शंका मनामध्ये येते. आजहा प्रकल्प राजकीय प्रकल्प झालेला आहे कारण आज त्याठिकाणी सर्व राजकीय मंडळी जात आहेत. आयुक्त साहेब जरी म्हणत असले तरी की राजकीय नेते गेल्यामुळे कामाची गती वाढली परंतू मला

वाटते यामुळे कामाची गती मंद होत चालली आहे, व ती अडचण निर्माण करत आहे. या प्रकल्पाकरीता मा.खासदार डॉ.संजीव नाईक पाच हजार कोटी जेएनएनयुआरएम अंतर्गत देऊ इच्छितात,परंतू त्यांचा याठिकाणी सन्मान होत नाही असे मला जाणवते. कोठेतरी राजकारणाचे जोडे बाहेर ठेवावेत. जर याबाबत केंद्र व राज्य शासन आपल्याला मदत करत असेल तर डॉ.संजीव नाईक यांचा सन्मान देखिल मा.महापौर महोदया आपण केला पाहिजे. कारण गेल्या पांच वर्षामध्ये जी कलाटणी या महापालिकेला मिळालेली आहे. दोनशे तिनशे कोटीची महापालिका हजारो कोटीवर पोहचायच्या प्रयत्नामध्ये आहे त्याला नक्कीच विरोध विरोधक म्हणुन आम्ही बसलो आहोत तरी त्याला देखिल आमचा मोठा हातभार आहे. आणि म्हणून महापौर महोदया,मला खरे वाटणार नाही की,आयुक्त महोदय यांच्या भाष्यावर भाष्य करावे,खरे पाहता ा मला सभागृहाचे मत पटत नव्हते परंतू याठिकाणी विरोधी पक्षानी मध्यस्थी करुन जो मार्ग काढलेला आहे त्याला मी संमती देतो आणि आयुक्त महोदय आम्ही याठिकाणी कोणत्याही प्रकारचे राजकारण केलेले नाही, आपल्याला माहित आहे. परंतू माझा अधिकार कोणी काढायचा प्रयत्न करत असेल तर तो चुकीचा असल्यामुळे मी माझा हक्क् बाधित ठेवला होता तरी महापौरांनी सुध्दा त्याची नोंद घ्यावी .सन्मान दिला तर सन्मान मिळतो हे देखिल आपण नमुद करुन घ्यावे.महापौर महोदया, पावसाळ्यापुर्वी जर हा सॅटीस प्रकल्प झाला नाही तर होणारा जो त्रास आहे त्या त्रासासंदर्भात आपल्याकडून आम्हाला अपेक्षित आहे की,आपण सर्व पक्षियांच्या नेत्यांना आणि आयुक्तांना जी चर्चा या सभागृहात व्हायलाच नको होती,ही चर्चा आपल्या अँटीचेंबरमध्ये व्हायला पाहिजे होती,या चचेच्या निमित्ताने आपण सर्व सदस्यांना घेऊन साईटवर जाऊन त्याठिकाणी प्रखरतेने संगायला पाहिजे होते की,एवढा वेळ लागेल तरी सहकार्य करा,सर्व सहकार्य याठिकाणी होते.आणि माझी हिच विनंती हेती या सभागृहात चर्चा कशासाठी,कारण या प्रकल्पाला सर्व सभागृहाने मंजुरी दिल्यानंतर त्यास उशिर होत असेल तर त्याला कांय कारण असु शकेल व त्यावर काय सोल्युशन काढले पाहिजे ही चर्चा आयुक्त महोदय आपल्या दालनात सुध्दा सर्वपक्षिय किंवा महापौर म्हणून आपल्या दालनात सुध्दा झाली असती,परंतू आपण तसे केले नाही,हयाचे मला दुर्देव वाटते आणि यापुढे आपल्याला अनेक प्रकल्प करायचे आहेत त्यामुळे रस्ता रोको करुन राजकरण करणार नाही,असे याठिकाणी सांगत असताना आपल्याकडून असे अपेक्षित करतो की,आपण यापुढचे जेव्हा प्रकल्प चालू कराल त्यावेळी सर्व सदस्यांना मग हया हया सदस्याला बोलण्याचा अधिकार नाही व त्याला वेगळया प्रकारचे राजकारण आणण्याचा प्रयत्न करु नये.प्रत्येक सदस्याला बोलण्याचा अधिकार आहे. आणि तो अधिकार बजावत असताना सन्मा.सुभाष भोईर यांचे स्वागत करेन कारण त्यांनी मोठेपणा घेतला,तरी सुध्दा हा प्रोटोकॉल कुठला आहे असे सांगेन आणि पुढच्या वेळेला असा आग्रह करु नये एवढेच सांगून या प्रकल्पाला शुभेच्छा देतो व हया प्रकल्पाला कोणत्याही प्रकारचा काळीमा लावू नये.कारण एखादया प्रकल्पाचा चुकीचा मेसेज जर वृत्तपत्रातून गेला तर माझ्या माहितीप्रमाणे पुढील प्रकल्प थांबतील अशाप्रकारचा संकेत जाऊ नये आणि आत्ताच आपण विचार करा एवढेच सांगतो आणि माझी पाच मिनिटे संपलेली आहेत. जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री.राजन विचारे :

महापौर महोदया,सन्मा.विरोधी पक्षनेते आदरणीय सुभाषजी भोईर यांनी जे सॅटीस प्रकल्पाबाबत विलंबाच्या कारणासाठी निवेदन दिले होते. मला वाटते सॅटीस प्रकल्पाच्यासंदर्भामध्ये मी त्यावेळी महापौर असताना सर्व सन्मा.नगरसेवकांनी मग ते विरोधी पक्षेनेते असुदया,सर्व पक्षाचे नेते या मंडळींनी एकमताने याला मंजुरी दिली होती आणि हे प्रकल्प मंजूर होत असताना रेल्वेच्या नाकर्तेपणामुळे आज अडीच वर्षाचा जो कालावधी होता त्यावेळेमध्ये हा प्रकल्प पुर्ण होऊ शकला नाही,यासंदर्भामध्ये ज्या अनंत अडचणी आल्या त्या अनंत अडचणींना तोंड देऊन मा.आयुक्त साहेब व नगर अभियंता,सन्मा.पाफळकर व त्यांचे सर्व अधिकारी हयांनी ख-याअर्थाने हा प्रकल्प मार्गी लावण्यास जे मोलाचे परिश्रम घेतलेले आहेत. खरोखर त्यांना धन्यवाद दयावेसे वाटेल कारण हा जो प्रकल्प हा प्रकल्प केंद्र सरकार ठाणे महापालिकेचा जवळजवळ ५० टक्के आर्थिक तरतुदीमध्् त्याचा वाटा आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनाने१५ टक्के त्याचा भार उचलेला आहे आणि ३५ टक्के केंद्र सरकारने केलेला आहे. जेव्हा आपण ठाण्याचा विकास करतो तेव्हा ही कामे ठाण्यातील जनतेच्य पैशातून केली जातात.या हिंदुस्थानातून जवळजवळ ७५ हजार कोटी हया जनतेच्या कररुपाने हया विकासासाठी आपण वापरत असतो. आज ही हिंदुस्थानातील पहिली महापालिका असेल त्यांनी या प्रकारचा पायलट प्रोजेक्ट यशस्वी करुन दाखविलेला आहे आणि ख-याअर्थाने याचेअनुकरण इतर महापालिका सुध्दा करीत आहे. तसेच हा प्रकल्प महापालिकेच्या अंतर्गत

करण्याचा हया ठाणे महापालिकेने एक चांगला दिशा दाखविण्याचे काम केलेले आहे आणि हे करीत असताना खरे म्हणजे हा प्रकल्प रेल्वेने करायला पाहिजे होता. आज ठाणे शहरात जवळजवळ साडेतीन लाख लोकं या रेल्वे परिसरामध्ये जात असतात आणि त्यांना होणारा त्रास पाहता रेल्वेने हे काम करायला पाहिजे होते परंतू गेली पंधरा वर्ष आम्ही हे प्रोजेक्ट होण्यासाठी आम्ही लोकप्रतिनिधी असतील,तसेच त्यावेळेचे खासदार मा.श्री.प्रकाश परांजपे ही सर्व मंडळी गेले १५ वर्ष प्रयत्न करीत होते. तरी महापौर महोदया,याबाबतच्या कांही आठवणी मी आपल्याला सांगू इच्छितो की,त्यावेळेला माझे महापौर म्हणून पहिले वर्ष संपले होते आणि मी शिर्डीला गेलो होतो व साईबाबा चरणी विनंती करत होतो की,ठाणे शहराचा एक प्रकल्प व्हावा,त्यावेळी तेथे रेल्वेचे जनरल मॅनेजर हे माझ्यासमोर मंदिरात होते,व आएएएस ऑफीसर श्री.लकीना साहेब सुध्दा तेथे बसले होते. आणि ही चर्चा चालू असताना त्यावेळी श्री.लकीना साहेबांनी मला सांगितले की,यासंदर्भामध्ये नुकतेच येथे रेल्वेचे जनरल मॅनेजर श्री.कौल येथे आलेले आहेत त्या कौलसाहेबांकडे हा विषय काढला तर हे प्रोजेक्ट होऊ शकेल आणि याबाबत आपल्याला आनंदाची बातमी सांगतो की,त्यावेळेला कौल साहेबांनी शिर्डीच्या मंदिरामध्ये मला शब्द दिला की तुमचा हा प्रकल्प मी मंजुर करुन देतो आणि ख-याअर्थाने त्यांची चार तारखेला चार्ज घेतल्यानंतर एक तारखेला माझी आणि त्याची शिर्डी येथे भेट झाली आणि चार तारखेला त्यांनी आमच्या तत्कालीन आयुक्त श्री.संजय सेठी व इतर सर्व मंडळींना बोलावून घेतले आणि ती मंजुरी पंधरा दिवसामध्ये त्यावेळी दिली गेलेली आहे. ज्या कामाची ठाणेकर नागरीक पंधरा वर्ष आतुरतेने वाट पहात होते ती साईबाबांमुळेच मंजुर झाली आणि ख-या अर्थाने मी आयुक्त साहेबांना आणि त्यांच्या सर्व सहका-यांना धन्यवाद देईन त्यावेळेला हायकोर्टामध्ये हे प्रकरण पेंडींग होते,कांही नागरीक सुध्दा त्यासंदर्भामध्ये कोर्टात गेले होते. आणि हायकोर्टामध्ये दिडतेदोन वर्ष आपले अधिकारी आणि कर्मचारी प्रयत्न करत होते आणि एक वर्षापुर्वी याचा निकाल लागला गेला आणि तो निकाल ठाणे महापालिकेच्या बाजुने लागला आणि ख-याअर्थाने हे सर्व करीत असताना मी त्यावेळेला जे मा.आयुक्त साहेब आणि त्यांच्या सर्व सहका-यांना धन्यवाद देईन की,हा प्रकल्पाचे दिड वर्ष ख-याअर्थाने काम झालेले आहे,व एक वर्षामध्ये अडचणी निर्माण झाल्या आणि त्या अडचणींना तोंड देऊन मा.आयुक्त व त्यांचे अधिकारी यांनी जे काम केले ते खरोखरच त्यांचे कौतुक करावेसे वाटते. त्याचप्रमाणे माजी विरोधी पक्षनेते श्री.सुभाषजी भोईर व श्री.मनोज शिंदे यांचे मा.आयुक्तांनी निवेदन केल्यानंतर समाधान झाले असेल आणि हा प्रकल्प व त्याचे उद्घाटन भव्यदिव्य असे होईल अशी मी आशा बाळगतो व ३० जुलैअखेर हा कार्यक्रम शिवेसेनचे कार्याध्यक्ष मा.उध्दवजी ठाकरे यांच्या आशिर्वादाने आणि त्यांच्या शुभहस्ते झाले होते व त्यावेळी डावखरे साहेब सुध्दा त्या कार्यक्रमाला उपस्थित होते आणि ख-या अर्थाने हा प्रकल्प केंद्र सरकार,महाराष्ट्र शासन आणि ठाणे महापालिका हा एक चांगला प्रकल्प होत आहे आणि त्याला सर्वांच्या शुभेच्छा आहे आणि प्रकल्प लवकरच चांगल्यारितीने होईल अशी आशा बाळगुन माझे दोन शब्द संपवितो.जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.महापौर :**

**अर्धा तास जेवणाची सुट्टी जाहिर करण्यांत येत आहे.**

दुपारी ठिक ३.०० वा. जेवणाची सुट्टी होते.

श्री.अशोक वैती :-

महापौर माझा घनकच-याबाबत दुसरा प्रश्न असा होता की, घरोघरी जाऊन कचरा जमा करण्याबाबतची मी प्रस्तावाची सुचना दिली होती. त्या प्रस्तावाच्या सुचनेला मा.महासभेने मान्यता दिली होती.पण याबाबत याच मत असे आहे की, घरोघरी जाऊ कचरा घेणे शक्य होणार नाही. त्यामध्ये माझ्या प्रभागात पाहणी करुनच कार्यवाही करण्यांत येईल. यामध्ये एखाद्याने भाग घेतला नाही आणि एखाद्याने भाग घेतला तर नगरसेवकांमध्ये वाद निर्माण होईल.

**डॉ.केंद्रे :- (वैद्यकीय आरोग्य अधिकारी)**

महापौर महोदय, ज्याठिकाणी आमच्या तीनचाकी हातगाडया,घंटागाडया जात नाहीत. जिथं कचरा टाकण्यासाठी जागा नाही अशा ठिकाणचे नागरीक कचरा टाकण्यासाठी नाल्याचा वापर करीत असतात.त्यामुळे पूर्ण वॉर्डात असे जे स्पॉट आहेत.तेवढयापुरतीच ही स्कीम मर्यादित ठेवावी अशी प्रशासनाची सुचना आहे.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया, हे बरोबर आहे. पण ज्याठिकाणी फक्त झोपडपट्टया आहेत. झोपडपट्टयामधील कचरा कुंडया बंद कराव्या अशी ब-याच दिवसापासून ओरड होती.परंतु ज्याठिकाणी कचरा पडतो.त्यामुळे आजुबाजूच्या लोकांना त्रास होतो. आमच्या येथे आतापर्यंत आम्ही चार कचरा कुंडया बंद केलेल्या आहेत. आता फक्त एकच कचरा कुंडी राहिलेली आहे.

**डॉ.केंद्रे :-(वैद्यकीय आरोग्य अधिकारी)**

महापौर महोदया, पूर्णपणे शहरातील कचरा कुंडया आपल्याला बंद करता येणे शक्य नाही. प्रत्येकाच्या कचरा टाकण्याच्या वेळा वेगळया आहेत. आपल्या गाडया आणि कामगाराची वेळ मॅच झाली नाहीतर लोक त्यांना जो सोईचा स्पॉट असतो तेथे कचरा टाकतात.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया, शहरातील कचरा दोन-दोन दिवस उचलला जात नाही.त्यासाठी ही सुचना होती.तरी सभागृह नेत्यांना मला सांगाव की, ही सूचना बजेटमध्ये आहे तसेच हे काम करणार आहात की नाही. झोपडपट्टीमध्ये अशा योजना राबविता येणार नाही का ?

**डॉ.केंद्रे :-(वैद्यकीय आरोग्य अधिकारी)**

महापौर महोदया, हे काम आपण करणार आहोत.साठेवाडी,वाल्मीकीपाडा येथे जाण्या-येण्यासाठी पायवाटा आहेत.तेथील नागरीक आपला कचरा नाल्यात टाकतात.असे जे प्रत्येक प्रभागातील स्पॉट आहेत ते आयडेन्टीफाय करुन तेथे आपण कचरा वेचक ठेवणार आहोत.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया,झोपडपट्टीमध्ये अशाप्रकारच्या योजना राबविता येणार नाही का ? जेथे काही अडचणी आहेत त्याठिकाणीच फक्त आहेत का ?

**डॉ.केंद्रे :-(वैद्यकीय आरोग्य अधिकारी)**

महापौर महोदया, ज्याठिकाणी आपली वाहने जात नाहीत.

**श्री.अशोक वैती :-**

प्रशासनाला अडचण वाटते तेवढी कामे केली जातात. नगरसेवकांनी किंवा महासभेने केलेल्या सुचनेचे पालन होणार नसेल तर मग याठिकाणी चर्चा करुन काय उपयोग. महापौर महोदया,आम्ही मागच्या २-३

महासभेत नालेसफाईबाबत अनेक तक्रारी केल्या त्यावेळी आम्ही सुचना केल्या होत्या की,घरोघरी जाऊन कचरा जमा करणे. चाळीतील कच-याबाबत मी बोलत आहे.तरी येथील कचरा दारोदारी जाऊन कचरा जमा होणार असेल तर ठिक आहे. .महापौर महोदया,आपण मागे एकदा घोषणा करणार होता का ? प्रशासनामार्फत हे चालणार असेल तर मी माझ्या सुचना मागे घेतो.

**मा.महापौर :-**

त्याला मंजूरी दिलेली आहे. घरोघरी कचरा उचलण्याचे काम सुरु करण्यांत येईल.

**डॉ.केंद्रे :- (वैद्यकीय आरोग्य अधिकारी)**

महापौर महोदय, माझी दुसरी सुचना अशी होती की, संगणक प्रशिक्षण केंद्रासंदर्भात आमच्या येथील एका संस्थेने मागणी केली होती. आज ते प्रशिक्षण केंद्र बंद आहे.शाळेतील विद्यार्थ्यासाठी या प्रशिक्षण केंद्रातून मोफत प्रशिक्षण देणार होतो.तसेच शाळेतील पालक आणि शिक्षकांना देखील आपण प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. अशाना प्रशिक्षण देण्यासाठी हजार ते पाच हजार रुपये महापालिका खर्च करीत होती. अशा प्रशिक्षण केंद्रातून शाळेतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रशिक्षण तर ते योग्य होईल. अशाप्रकारची सूचना केली होती.याबाबत मला शिक्षण मंडळाकडून उत्तर मिळालं होतं की, सदर विषय शिक्षण मंडळाच्या विषयपत्रिकेवर घेऊन त्यावर निर्णय घेण्यात येईल. हे उत्तर कोणी दिलं हे मला समजलं नाही.

**श्री.भातणकर :- (उपआयुक्त)**

मा.महापौर महोदया,उत्तर माझ्याकडून देण्यात आलेले आहे.

**श्री.अशोक वैती :-**

भातणकर साहेब, शिक्षण मंडळाचा अधिकार फक्त ३ महिन्याचा आहे. ३ महिन्याच्या वर आपल्याला देता येत नाही.आपण या प्रशिक्षण केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन दयावी. हा विषय महासभेपुढे आला म्हणजे प्रशिक्षण केंद्रासाठी ५ ते १० वर्षासाठी द्याव.त्यासाठी आपण महासभेपुढे आलो आहोत. शिक्षण मंडळाची मर्यादा आम्हाला माहित आहे की, १ दिवसासाठी देतात किंवा जास्तीत जास्त ३ महिन्यासाठी देतात. तरी हा प्रश्न कोणाकडे जाईल याबाबत माहिती द्यावी.

**श्री.भातणकर :- (उपआयुक्त)**

महापौर महोदया, ही उपयुक्त सुचना आहे.महासभेच्या अधिकारात येत असेल तर तो पुढच्या महासभेत ठेवतो.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया, महासभेचा अधिकार असेल तर तो विषय कोणाकडे जाईल.स्थावर मालमत्तेकडे जाईल की

**श्री.भातणकर :- (उपआयुक्त)**

महापौर महोदया, सदर विषय स्थावर मालमत्तेकडे जाईल.

**श्री.अशोक वैती**

महापोर महोदया, तशा प्रकारे फाईल स्थावर मालमत्तेकडे पाठविण्यांत यावी.ही चांगली योजना आहे. यामाध्यमातून शाळेतील शिक्षकांना देखील प्रशिक्षण घेता येईल.तसेच झोपडपट्टीतील दारिद्रय रेषेखालील लोकाचे सर्वेक्षण झाले आहे ते चुकीच्या पध्दतीने झालेले आहे.काही ठिकाणी एखादा माणूस असूल दारिद्रय रेषेखाली. सर्वे करण्यासाठी एखादा माणूस आला तर ते नगरसेवकाला सुध्दा माहित पडत. की आपल्या प्रभागामध्ये अशाप्रकारचे सर्व्हे होणार आहे. त्यामुळे तेथील नागरीक अधिका-यांना विचारण्यापेक्षा प्रभागातील नगरसेवकांना विचारता की, अशाप्रकारचा सर्व्हे चालू आहे. तरी या संदर्भातील अधिकारी याठिकाणी उपस्थित आहे का ? महापौर महोदया, असे का होते की एकाच संस्थेला सर्व कामे मिळतात. मग ते दारिद्रय रेषेखालचं असो, कोणत्याही प्रकारचा सर्व्हे करायचा असो,स्वच्छतेचा असो,शौचालय स्वच्छतेबाबत असो म्हणजे या महिला मंडळाऐवजी ठाणे शहरात कोणी नाही का ?

**श्री.रंगनाथ वाघ :- (सहा.आयुक्त )**

महापौर महोदया, मला नुकताच या खात्याचा चार्ज मिळालेला आहे. याबाबत ८ दिवसात संपूर्ण माहिती संकलित करुन आपणांस सादर करतो.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया,महापालिकेमार्फत सदरचा सर्व्हे करण्यात आला या संदर्भात श्री.पाटोळे याठिकाणी उपस्थित रहावयास हवे होते. हा एक प्रश्न पाटोळे येईपर्यत राखून ठेवा. आणि आता परत एक तुम्ही सर्व्हे घेतला आहे. जवाहरलाल नेहरु  नागरी पुर्ननिर्माण अभियानामार्फत सर्व्हे करण्यांत आला आहे. त्या सर्व्हेमध्ये देखील हेच आहे. एकाच वेळी दोन-दोन वेळा सर्व्हे करुन शासन नागरीकचे पैसे फुकट घालवित आहे. याबाबत महासभेचे ठराव झालेला आहे. त्यांनतर आतासुध्दा दारिद्रय रेषेखाली सर्व्हे करावयाचा आहे.दोन दारिद्रय रेषेखालील सर्व्हे कशासाठी चालू आहे. आपण यापूर्वी देखील दारिद्रय रेषेखाली सर्व्हे झाला आहे असे आपण म्हणता आहात.तो शासनाकडे पाठविला आहे. असे असताना आता कसला सर्व्हे करायचा.

**डॉ.केंद्रे :- (वैद्यकीय  आरोग्य अधिकारी)**

महापौर महोदया,सुवर्ण जयंती रोजगार योजनेबाबत दर १-२ वर्षानी राज्य शासनाच्या सुचना असतात की, आपल्या महापालिका क्षेत्रामध्ये दारिद्रय रेषेखालील किती लोकांना  या योजनेचा लाभ मिळाला आहे. त्या अंतर्गत नव्याने सर्व्हेक्षण करावं, मागच्या वेळी जो सर्व्हे केलेला आहे  तो राज्यशासनाने दिलेल्या निर्देशानुसार केला आहे. दरम्यानच्या कालावधीत आपण बीएसपीयु प्रकल्प हाती घेतला होता.

**श्री.अशोक वैती**

महापौर महोदया,मागच्यावेळी जो सर्व्हे करण्यांत आला होता त्यांची कोणत्या पेपरला जाहिरात दिली होती. माझ्या मते जे आपल्या भेटीला येतात त्यांनाच या योजनेंचे काम देण्यात येतं.

**श्री.व्यंकटेश भट (उपआयुक्त )**

महापौर महोदया, माझ्या माहितीप्रमाणे त्याची पेपरला जाहिरात दिली होती. त्याचा सर्व तपशील मी आपल्याला उपलब्ध करुन देतो.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया, मी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो अधिकारी येथे उपस्थित असायला पाहिजे. असे अनेक संस्था ठाणे शहरात आहेत की त्यांना पेपर नोटीस न देतो ठाणे महानगरपालिकेने कामे दिलेली आहेत.हे मी जबाबदारीपूर्वक बोलतो आहे.

**श्री.व्यंकटेश भट (उपआयुक्त)**

महापौर महोदया, महानगरपालिकेचे जे धोरण आहे. मागच्या वेळेस आपण सर्वसाधारण सभेत ठराव पारित केलेला आहे. यावर्षी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर विभागामार्फत जी कामे देणार आहोत.त्यामध्ये विविध महिला बचत गटांना २५ टक्के देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया, ही कामे देताना शासनाने काही निकष लावलेले आहेत.सोडत पध्दतीने ही कामे त्यांना दयावीत. महिला बचत गटाना सोडत पध्दतीने कामे देण्यांत यावीत.

**श्री.व्यंकटेश भट ,उपआयुक्त**

महापौर महोदया,हा यापूर्वीचा एखादा अपवाद असेल.तो आपण तपासून पाहू.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया,याबाबत मी आता काही बोलत नाही.प्रत्यक्ष आपल्याशी आणि मा.आयुक्तांची भेट घेऊन बोलीन.कोणतीही पेपर नोटीस न काढता ही कामे देण्यात आलेली आहेत.महापौर महोदया,आपण आम्हाला जसे वेळेवर येण्यास सांगता,प्रत्येकाला वेळ देता आहात.त्याप्रमाणे अधिका-यांनी सुध्दा वेळेवर या सभागृहात उपस्थित राहायला पाहिजे जेणेकरुन इतर सदस्यांचे प्रश्न देखील मार्गी लागले असते. महासभा असताना काही अधिकारी रजेवर जातात. अशावेळी अधिका-यांनी रजेवर जाऊ नयेत अशाप्रकारचे संकेत आहेत.ख-या अर्थाने ज्या अधिका-यांचे प्रश्न-उत्तरे आहेत अशा अधिका-यांनी उपस्थित राहायला पाहिजे.

**श्री.नारायण पवार :-**

महोदया महोदया,सन्मा. सदस्य श्री.अशोक वैती यांनी आता सांगितले की, त्यांनी १५ दिवसापूर्वी प्रश्न विचारले होते त्यांना आता उत्तरे देण्यांत आली.मी ६ महिन्यापूर्वी पत्र देऊन प्रशासनाकडून उत्तराची अपेक्षा करीत आहे. महापालिकेतील ऑफीसमधील फर्निचरबाबत प्रश्न विचारला होता.त्यांचे उत्तरे मला अजूनपर्यत मिळालेली नाही.माझ्या प्रश्नाची उत्तरे मला वर्षानंतर मिळणार आहेत का ?

**मा.सचिव :-**

महापौर महोदया, शेवटचा प्रश्न सन्मा.सदस्य श्री.मढवी यांचा आहे.

**श्री.रमाकांत मढवी :-**

महापौर महोदया, मी परिवहन सेवेबाबत प्रश्न विचारला होता.श्री.कमलाकर दिक्षित यांनी सूरज एन चौपका भावनगर यांच्याकडून घेतलेली जीजे ०४डी-९९८ ही मारुती गाडीचे कोणते मॉडेल होते. आणि त्या संदर्भात मला उत्तर दिलेले आहे की दिक्षितांनी दिलेल्या माहितीनुसार वाहन क्र. एमएच-०४ एच-२००९ या व्हिआयपी नंबरसाठी कोणतीही रक्कम भरलेली नव्हती.तसेच या वाहनाचे आर.टी.ओ.विभागाकडून मूल्यांकन करुन घेतले नव्हते. हे उत्तर अपुरे आहे असा मला वाटते. कारण की,त्यांनी जेव्हा गुजरातमधून गाडी ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत आणली तेव्हा त्यांनी व्ही.आय.पी.नंबर घेताना मुल्यांकन केलेलं नव्हते. असे आपण म्हणतो आणि दुसरीकडे महापालिकेचा उच्चपदस्य अधिकारी महापालिकेचा जकात बुडवून महापालिकेच्या हद्दी आणीत असेल आणि या गाडीवर महापालिकेच्या माध्यमातून/ परिवहन सेवेच्या माध्यमातून कर्ज असताना देखील त्यांच्या महापालिकेमार्फत कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही उलट आपल्याला असे ही म्हणता येईल की एखादया वाहकांच्या बॅगेमध्ये जर एक रुपया जास्त मिळाला तर त्याच्यावर आपण शिस्तभंगाची कारवाई करतो.आणि कमलाकर दिक्षीत,दामोदर नानकर,गुरुकुमार पेडणेकर आणि अजित निहाळी यांच्या सारख्या परिवहन सेवेतील उच्चपदस्य अधिकारी परिवहन सेवेचे आर्थिक नुकसान करीत आहेत. त्यांनी याबाबत प्रशासनाची परवानगी न घेता परस्पर परिवहनचे कर्ज असताना देखील त्यांनी ती वाहने विकलेली आहे. त्यांच्यावर आपण कोणत्या स्वरुपाची कारवाई करणार आहात.

**श्री.श्रीकांत सरमोकदम :- (उपआयुक्त )**

मा.महापौर महोदया,आपल्या प्रश्नाच्या ५ व्या कॉलममध्ये लिहिलेलं आहे की, मार्च २००३ ते मे २००९ हा कालावधी विचारात घेऊन सदर चारही अधिका-यांचा रु.३१,८८७/-जी व्याजाची रक्कम आहे.त्यावर व्याज लावून जी रक्कम येईल ती त्यांच्याकडून वसूल करण्यांत येऊन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यांत येईल.आपला प्रश्न आल्यानंतर माहिती घेतली असता ही वाहने १९९२-९३च्या आसपास त्यानी खरेदी केली आहेत.महापालिकेने धोरणात्मक निर्णय घेतला की काही अधिका-यांना वाहन भत्ता दयायचा.पण त्या कालावधीमध्ये महापालिकेच्या अधिका-यांस फोरव्हीलर गाडी खरेदी करण्यांस कर्ज दिलेले नाही.टू व्हीलर साठी ज्याचे अर्ज येतात त्यांना नियमानुसार अजूनही आपण कर्ज देत आहोत. पण परिवहनच्या अधिका-यांनी तो बेस दाखविला की,महापालिकेच्या अधिका-यांना ४ चाकी वाहन खरेदी करण्यांस कर्ज दिले जाते त्याच्या अनुषंगाने आम्ही हे परिवहनमधून कर्ज घेतलेले आहे. ही पहिली दिशाभूल केली आहे. दुसरे असे की एकदा तुम्ही कर्ज घेतलं की ती जी व्याजाची रक्कम आहे ती रक्कम मंथली इनस्टॉलमेंट ही वसुली करण्याची जबाबदारी लेखा विभागाची आणि ज्यांनी लोन घेतले आहे त्यांची आहे. १९९३च्या सुमारास आता जसे त्यांनी व्ही.आर.पी.नंबर डिक्लेअर केले आहे.सटर्ननंबर हे व्हि.आय.पी.आहेत.जे जर तुम्हाला पाहिजे असतील ते स्वतंत्र पैसे व्ही.आय.पी.नंबरच्या स्टेजप्रमाणे भरावे लागतात. माझ्यामते १९९-९२ला हा नियम लागू होता असे नाही.हा नियम १९९५-९६च्या दरम्यान लागला.आता जर आपल्याला व्ही.आय.पी. नंबर हवा असेल तर त्यासाठी आपल्याला जादा रक्कम मोजावी लागते.म्हणून मी उत्तराच्या सुरुवातीस संबंधितांनी जी माहिती दिली त्यांच्या अनुषंगाने लिहण्याचे कारण असे की परिवहनकडे याबाबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे नाहीत.ऑडीटमध्ये हरकत घेतली की त्यानी व्याजाची रक्कम रु.३१,८८७/- रक्कम भरलेली नाही. ही रक्कम ज्या तारखेला कॅलक्युलेट केली होती, त्या रक्कमवर आजपर्यत व्याज आकारण्यांत आलेले आहे.

**श्री.रमाकांत मढवी :-**

महापौर महोदया, महापालिकेच्या पैशांची घेतलेले वाहन परस्पर जी व्यक्ती विकते.महापालिकेचे परिवहन घाटयात आहे. आणि परिवहनचे अधिकारी फायद्यात आहेत. त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात.

**श्री.श्रीकांत सरमोकदम :-(उपआयुक्त )**

महापौर महोदया, आपण त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करु शकत नाही. आपणांस याबाबत ३-४ मुद्दे सांगितले त्या अनुषंगाने त्यांच्यावर कारवाई करण्यांत येईल.आपण म्हणता की व्ही.आय.पी. नंबरसाठी त्यांनी पैसे दिले होते का ? माझ्या मते सन १९९१-९२सुमार व्ही.आय.पी. नंबर आपण ठरवायचे होते. शासनाने ठरविले नव्हते. अमुक एक नंबर हे व्हि.आय.पी. असतील.ते शासनाने सन १९९६-९७च्या नंतर ठरविले.त्यासाठी प्रत्येक नंबरसाठी वेगवेगळे दर आहेत.

**श्री.रमाकांत मढवी :-**

महापौर महोदया, साहेब आता जे व्ही.आय.पी.नंबरसाठी २५ ते ५० हजार झालेले आहेत.ते त्याही वेळेस होते.पण त्यावेळी त्यांचे प्रमाण फार कमी होतं.५ते १०हजार पर्यतची रक्कम होती.

**श्री.श्रीकांत सरमोकदम :-(उपआयुक्त )**

महापौर महोदय,याबाबतची मी पहाणी करतो, माझ्या मते हया कालावधीमध्ये व्ही.आय.पी.नंबर त्यावेळी नव्हता.

**श्री.रमाकांत मंढवी:-**

महापौर महोदया, प्रशासनाने मान्य केले आहे की, महापालिकेच्या उच्चपदस्य अधिका-यांनी महापालिकेची फसवणूक केली आहे.तर मग आपण त्यांच्या कोणत्याही स्वरुपाची कारवाई करणार आहोत. किती दिवसांत करणार आहोत.शिस्तभंगाची कारवाई करणार असाल तर त्यांच्यावर स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करा ना. महापालिकेची आर्थिक फसवणूक केली म्हणून.

**श्री.श्रीकांत सरमोकदम :-(उपआयुक्त )**

महापौर महोदया, ज्यावेळी ऑफीस कर्ज देतं त्यावेळी कर्जाची रक्कम आणि व्याज ठरविण्यांत येते.मासिक पगारातून ज्यावेळेस करतो त्यांनी कर्ज घेतलयं याची जशी जबाबदारी आहे.अशी अकाऊंड विभागाची सुध्दा जबाबदारी होती की, व्याजासह कर्जाची परतफेड व्हायला पाहिजे.

**श्री.रमाकांत मढवी :-**

महापौर महोदया, आपल्या म्हण्ण्यानुसार अकांऊट विभागावर सुध्दा कारवाई होणे गरजेचे आहे.मग दोघांवर महापालिकेची फसवणूक केली म्हणून गुन्हे दाखल करा.

**श्री.श्रीकांत सरमोकदम :-(उपआयुक्त )**

महापौर महोदया, अगोदर विभागीय चौकशी करतो त्यातून जर वाटलं.......

**श्री.रमाकांत मढवी :-**

महापौर महोदया, म्हणजे आपण आणखी कोणती पळवाट शोधण्यास वेळ देता असे नाही का ? पुढच्या महासभेपर्यत त्यांच्यावर कारवाई झालेली असेल का ?

**श्री.श्रीकांत सरमोकदम :-(उपआयुक्त )**

महापौर महोदया, दोन महिन्याचा कालावधी ठेवा. जास्तीत जास्त १ महिन्यात कारवाई करतो.

**श्री.रमाकांम मढवी :-**

महापौर महोदया,आपणच उत्तर देताना मान्य केलं आहे की, ते दोषी आहेत.मग पुन्हा विभागीय चौकशी कशाला.

**श्री.श्रीकांत सरमोकदम :-(उपआयुक्त )**

महापौर महोदया, १ महिन्यात प्रयत्न करतो. त्यातील ३ जण निलंबित आहेत.एकच सर्व्हीसमध्ये आहे.त्याची पार्श्वभूमी लक्षात घेऊन मी आपणांस २ महिन्यांचा कालावधी सांगितला.

(मा.सचिव सभा तहकूबीचे पत्र वाचून दाखवितात.)

**श्री.देवराम भोइर :-**

महापौर महोदया, प्रशासनाने बदली संदर्भात कार्यवाही केलेली असल्यामुळे मी माझी तहकूबीची सुचना मागे घेतो.

**श्री.महेंद्र कोमुर्लेकर :-**

महापौर महोदया, काल काही जकात विभागातील बदल्यासंदर्भात ऑर्डर निघाल्या आहेत.त्यांची नांवे माझ्याकडे आहेत. त्यांना आपण ऑर्डरची अंमलबजावणी केलेली आहे का ? कारण त्यामध्ये जे वशिल्यांचे ठट्टू आहेत. ते महापालिकेमधील आणि संबंधीतजकात ठेकेदार आहेत ते सेटर आहेत.जाणूनबुजून गाडया अडवून ठेवणं आणि त्याची सेटींग करणे हा व्यवहार ते लोक करतात.काल त्यांना बदलीच्या ऑर्डर काढल्या आहेत त्या त्यांना लागू केल्या आहेत का ? त्या तातडीने लागू कराव्यात.जर केल्या नसतील तर.महापौर महोदया, ते ज्या दिवसापासून कामाला लागले आहेत त्यादिवसापासून जकात विभागात आहेत. जकातमध्ये उत्पन्न कमी झालं म्हणून तेथील कर्मचा-यांच्या बदल्या झाल्या आहेत. म्हणजे जकात विभागात भ्रष्टाचार झाला असे प्रशासनाने मान्य केलेलं आहे. म्हणून तेथील अधिका-यांची उचलबांगडी केलेली आहे.परंतु ती कायम राहावी आणि ते पुन्हा वशिला लावून जकात विभागात येतील.या संदर्भा आम्हाला खुलासा मिळेल का ?

**मा.आयुक्त :-**

मा.महापौर महोदया,याबाबतीत सन्मा.जेष्ठ सदस्यांनी सांगितलं की,जकातीच्या बाबतीत आपले अतिरिक्त आयुक्त,दोन जेष्ठ उपआयुक्त श्रीयुत निंबर्गी आणि श्रीयुत भट या तीन लोकाची कमिटी केलेली

आहे. त्यांना काही जनरल गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. यासाठी कुठल्याही परिस्थितीत दबाव आणलेला नाही. आणि आणला तरी त्या दबावाला बळी न पडता आत जी जकात विभागाची बदलीच्या माध्यमातून साफसफाई होत आहे.त्यातले काही कार्यक्षम अधिकारी/कर्मचारी घेऊन जकातीचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणार आहोत. आम्ही ज्या ज्या बदल्या केल्या आहेत त्यांची तातडीने अंमलबजावणी केली जाईल.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदया, जकात विभागात मागील ७-८ वर्षापासून एकाच विभागात आहे अशाची यादी आपल्याला देतो.

**मा.आयुक्त :-**

मा.महापौर महोदया, या बाबतीत आमच्या समितीच्या अधिका-यांनी एकाच सांगितले की, एकदम ८ दिवसांत जकात विभागातील सर्व अधिकारी/ कर्मचा-यांच्या बदल्या केल्यास कामकाजात अडथळा निर्माण होईल टप्प्याटप्प्याने बदलीची कार्यवाही करणार आहोत.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदया, आपण आता जी यादी काढलेली आहे त्यामध्ये माफीया किंग आहेत. तरी त्याची तातडीने बदली करण्यात यावी.

**श्री.नारायण पवार :-**

महापौर महोदया, जुन्या लोकांना बदले नाहीतर ते नविन लोकांना त्रास देतील.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया, जेष्ठ नगरसेवक श्री.देवराम भोईर यांनी सभा तहकुबीची मांडली. त्यात माझी सुचना आहे की, पुढच्या महासभेत जकात चेकरस् आणि लिपिक यांची पूर्ण माहिती दयावी. त्यात त्यांनी किती वर्षे सर्व्हिस केली,कोणत्या खात्यात किती वर्ष काम केले याची संपूर्ण माहिती पुढच्या सभेमध्ये दयावी.सन्मा.सदस्य श्री.मनोज शिंदे यांनी आपल्याकडे जकात अधिका-यांची नांवे दिली आहेत. ती नांवे आम्हाला सांगावी.तसेच महापौर महोदया त्यांची हिस्ट्री आम्हाला पुढच्या महासभेत मिळावी. त्यांची नोंद पी.ओ.मॅडम आपल्याकडे असेल का ?

**श्री.संजय मोरे :-**

महापौर महोदया, मी देखील या संदर्भात प्रशासनाकडे पत्र दिलेले आहे. जे सद्या जकात विभागात काम करीत आहेत त्यांचा आपल्या सर्व्हिसमध्ये जकात विभागातील किती कालावधी आहे. याची माहिती मला देण्यांत यावी.

(मा.सचिव श्री.सुभाष भोईर यांची तहकूबीची मांडतात )

**श्री.संजय भोईर :-**

महापौर महोदया, मी आज याठिकाणी लक्षवेधी मांडली आहे. ज्या संदस्यांना या लक्षवेधीवर आपले मत मांडावयाचे असेल तर त्यांनी ती मांडावी.

**श्री.अनिल सावे :-**

महापौर महोदया, लक्षवेधीची परंपरा अशी आहे की, सुचकाचे प्रथम बोलून झाल्यानंतर अनुमोदकानी बोलायचे आणि नंतर सभागृह सदस्यांनी बोलायचें असते.

**श्री.पांडुरंग पाटील :- ( सभागृह नेते )**

महापौर महोदया, आज जी लक्षवेधी मांडली आहे त्यावर ७ञ८ दिवसापूर्वीच या सदनामध्ये ४ ते ५ तास चर्चा झालेली आहे. त्यावेळी महापौर महोदयांनी घोषणा केली होती की, ज्या ज्या नाल्यामुळे मनुष्यहानी होईल त्या अधिका-यावर निश्चित कार्यवाही करण्यांत येईल. भोईरा साहेबांना तेच अपेक्षित आहे.

**मा.महापौर :-**

सर्व सन्मा. नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील नाल्या संदर्भात चर्चा केलेली आहे. ज्याच्या प्रभागात अजूनही नाले सफाई झालेली नाही.त्यांनी ठेकेदार आणि अधिका-यांना सांगून ते साफ करुन घेण्यात येतील. अन्यथा त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यांत येईल.

**श्री.शैलेश शिंदे :-**

महापौर महोदया, किती वेळा त्यांच्यावर कारवाई करणार.महापौर महोदया म्हणण्याप्रमाणे ७-८ दिवसापूर्वी आपण या विषयावर चर्चा केली आणि ही चर्चा झाल्यानंतर देखील लक्षवेधी सभागृहातयेते. याबाबत आपण ही विचार करावयास हवा. त्यावर चर्चा होऊन योग्य ती कारवाई झाली पाहिजे.

**श्री. सुभाष भोईर :-**

महापौर महोदया, ठाणे महानगरपालिकेच्या नालेसफाईच्या संदर्भात मी आणि कॉंग्रेस पक्षाचे गटनेते श्री.नारायण पवार यांनी मांडलेली आहे आणि ही लक्षवेधी मांडत असताना आपण याठिकाणी खुलासा केला आहे तसेच सभागृह नेत्यांनी याबाबत काही सुचना केल्या आहेत. या अगोदर ६-७दिवसापूर्वी याविषयावर चर्चा केली असेल तर या संबंधिची सभागृहाला किवा त्या प्रभागातील समिती कार्यालयात माहिती उपलब्ध होणे गरजेचे होते. परंतु तशा प्रकारची माहिती उपलब्ध न होता.आज या सभागृहात लक्षवेधी मांडत असताना ९ प्रभाग समित्यामध्ये नालेसफाई झाली की नाही आणि आजच वरुण राजानी हजेरी लावली आहे. पावसाळा अगोदर सुरु झाला असता तर अशाप्रकारची लक्षवेधी आलीच नसती. याचाच अर्थ स्पष्ट होतो की, ४० टक्के नालेसफाई ही पावसाच्या माध्यमातून वाहून जाते. तो स्पष्ट निवाडा त्यांनी दिलेला आहे. म्हणून आज या सभागृहामध्ये प्रभाग निहाय अभ्यास केला तर त्याचा अहवाल मागितला तर प्रत्येक नगरसेवकांच्या माध्यमातून आपल्याकडे तक्रारी येतील. म्हणून मी आज याठिकाणी लक्षवेधी मांडण्याची इच्छा व्यक्त केली आहे. नालेसफाई करीत असताना मुंब्रा,कळवा आणि शहरातील इतर प्रभाग समित्यामध्ये कशाप्रकारे नालेसफाई झाली आहे यांची माहिती दयावी. याठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, महापौराच्या माध्यमातून पहाणी दौरे खूप झाले अनेक वर्तमान पत्रामध्ये आपले फोटो पहायला मिळाले. सभागृहनेते,स्थायी समिती सभापती यांनी पहाणी दौरे केले. विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा काही प्रमाणात दौरे केले. त्यांना प्रतिसाद मिळाला

नाही. कारण ज्यावेळेला त्यांनी दौरे लावले त्यावेळेला महापौरानी स्वतःहून अधिका-यांची खाजगीत मिटींग लावल्या.त्यामुळे ते अधिकारी त्याठिकाणी जावू शकले नाही अशाप्रकारे विरोधी पक्षनेत्यांनी त्यांवेळेला सांगितलं आणि असे असतानासभागृहामध्ये नालेसफाई झाली नाही म्हणून चर्चा झाली नाहीतर मला वाटत महापालिकेमध्ये १०० टक्के नालेसफाई झाले आहे आ अशाप्रकारचा दावा प्रशासनाकडून आणि महापौर महोदया आपल्याकडून होऊ शकतो अशी मला आपणांस आठवण करुन दयावीशी वाटते.तरी मी याठिकाणी एवढेच सांगू इच्छितो की, मुंब्रा प्रभाग समितीच्या माझ्या प्रभागात आज जरी नालेसफाईबाबत पहाणी केली तर भोलानाथनगरमध्ये कोणत्याही प्रकारची नालेसफाई झालेली नाही असा माझा दावा आहे. सकाळी केली तर मला माहिती नाही. मी कालपर्यत माझ्या प्रभागात नालेसफाई झाली नव्हती.मुंब्रा विभागात एका बाजूला डोंगर आणि दुस-या बाजूला खाडी असताना देखील या भागात नालेसफाई ज्याप्रकारे व्हावयास पाहिजे होती ती झालेली नाही.यांच्यामागे पाठीमागे काय आहे याचा शोध आपण घेणे गरजेचे आहे. महापौर महोदया, काल भोईर साहेबांच्या प्रभागात असाच एक दौरा केला.आपण एकात्मीक नाले बांधणी योजनेतंर्गत नविन नाले बांधण्यास सुरुवात केली. त्यांच्यामध्ये माझा नाला साफ झाला.त्यावेळी त्यांनी नाल्यामध्ये पोकलेनसारख्या मशिन लावल्या आणि तो नाला बांधण्यासाठी नाला रुंद केला. तो नाला आपाआप साफ झाला.तसेच काल मी श्री.देवराम भोईर यांच्या प्रभागाची उपआयुक्तांच्या माध्यमातून पाहणी केली. सदर नाला ३० फूटाचा आहे. माजिवडयावरुन सरळ सांकेतच्या तिथून लोढाच्या जवळून खाडीत जातो. तो नाला अजूनपर्यंत साफ झालेला नाही.नगरसेवकांनी केलेल्या सुचना मात्र तेवढया प्रशासनाकडून विचारात घेतल्या जात नाहीत.जर तेथील एखादया बिल्डरने तक्रार केली की प्रशासन कशाप्रकारे पूर्तता करते त्यांचे उदाहरण माझ्या हातामध्ये आहे. लोंढा या बिल्डरने आयुक्त महोदयाना नालेसफाईबाबत पत्र लिहिले आहे.माजीवडा सर्व्हे क्र.२५/७,२५/९,२६/४,२६/९/२७/९ मिळकतीवर दाखल प्रस्तावाला शहर विकास विभागाकडून मंजूरी मिळालेली आहे. मंजूर झालेले आहेत.या विकास आराखडयाला २००५मध्ये मंजूरी मिळालेली आहे. तेथील नाला कोठे डायर्व्हट करायचा नसताना महापालिकेने घाट घातलेला आहे की तो नाल्या सरळ न जाता डावीकडे वळवायचा.त्यासाठी कमीतकमी ९ ते १०कोटी रुपये खर्च करण्यांचा प्रस्ताव आपल्यासमोर येत आहे. मुळात जो नाला १० मीटरचा आहे तेथे तशाच प्रकारचा दुसरा नाला वळविण्याची आवश्यकता नसताना मुळात महापालिकेने लोढाच्या नाल्याबाजूचे विकास प्रस्ताव मंजूर केलेले आहे.हे सर्व विकास प्रस्ताव मंजूर करीत असताना २००८ मध्ये तशाच प्रकारचा सर्व्हे केला आयुक्त महोदय.त्यांनी सर्व्हे केल्यानंतर त्याठिकाणी असा घाट घातला की,सदरचा नाला बाळकुमच्या बाजूला वळवून तो पुन्हा रुस्तमजीच्या प्रॉपर्टीमधून वळवून बाळकूमच्या खाडीला जोडण्यांत येईल.त्यामुळे तेथील नागरीकांच्या घरावर बुलडोझर फिरवून त्यांना तेथील हटविण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा प्रकारची परिस्थिती काल आम्ही पाहिली आहे. मुळात आज जे पाईप त्याठिकाणी लावले आहेत. ते जमिनीपासून ६ फूटावर आहेत. सदर नालाा बिल्डरच्या सहमतीने भविष्यात बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.म्हणून मा.आयुक्त महोदय आणि महापौर महोदया आपणांस विनंती करावयाची आहे की, जेष्ठ नगरसेवक श्री.देवराम भोईर यांच्याबरोबर महानगरपालिकेने पहाणी दौरा करावा आणि पहाणी दौ-यामध्ये आपल्या आढळले की,या नाल्याची आवश्यकता आहे तर त्याठिकाणी स्थानिक नगरसेवकांला विश्वासात घेऊन.१० मीटरचा नाला बाधावा.एखादया बिल्डरच्या सहमतीने नाला फिरविण्याचा घाट कोणी घालत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. श्री.देवराम भोईर यांनी याठिकाणी स्पष्ट सांगितलं आहे की, त्या नाल्याचा तेथील शेतक-यांच्या घरावर नांगर फिरणार असेल तर तेथे रक्तपात झाल्याशिवाय राहणार नाही. त्याठिकाणी नविन नाला बांधण्याचा प्रयोग आपण हाती घेतला आहे तो कदापी सहन केला जाणार नाही. अशा प्रकारचे त्यांनी त्याठिकाणी आपले म्हणणे मांडले आहे.आपल्याकडे जे नैसर्गिक नाले आहेत.त्यांची वेळेवर साफसफाई झाली

पाहिजे.या भागाचा जोपर्यंत महापालिकेमार्फत पहाणी दौरा होत नाही.यासंबंधी सर्वपक्षाचे नेते मग ते आमदार,खासदार असतील त्यांना देखील माहिती देणे गरजेचे आहे. नाहीतर ११६ लोकांना बेघर केले अशी महापालिकेची बदनामी कुठेतरी थांबली पाहिजे.नालेसफाईबाबत मी सभागृहात प्रश्न उपस्थित करीत असताना जे नाले आज पूर्णपणे साफ झाले नाहीत.त्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून प्रभाग निहाय काय उपाय योजना केल्या पाहिजेत.ठाण्यातील नाल्याचे ६५ टक्के सफाई झाली असे आम्हाला जेव्हा सांगितले जाते.तेव्हा प्रभाग निहाय नाल्याची साफसफाई झाल्याबाबतची माहिती सभागृहाला मिळावी. जेणेकरुन आमचे समाधान होईल. या हेतूने मी याठिकाणी लक्षवेधी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**श्री.देवराम भोईर :-**

सन्मा.महापौर महोदया,सन्मा विरोधी पक्षनेते श्री.सुभाष भोईर आणि सन्मा.नारायण पवार नालेसफाईबाबत जी लक्षवेधी सुचना याठिकाणी मांडली आहे.त्या लक्षवेधी सुचनेवर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.सन्मा.महापौर महोदया, गेल्या दोन महिन्यापासून ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमधील छोटे मोठे नाले आहेत.त्या नाल्यासंदर्भात प्रशासनाच्या माध्यमातून जी नालेसफाई झाली.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदया, याठिकाणी जेष्ठ नगरसेवक बोलत असताना इतर सन्मा.नगरसेवकांनी बोलू नये अशी प्रथा आहे.

**मा.महापौर :-**

सभागृहात कोणतेही सदस्य बोलत असताना इतर सदस्यांनी मध्ये बोलू नये. अशी अपेक्षा सर्व सन्मा.सदस्यांकडून आहे.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदय, आपण जी सूचना केली आहे की, जेष्ठ नगरसेवक बोलत असताना कोणी बोलू नये ही फार महत्वाची सुचना आहे.जेष्ठ नगरसेवकांनी लक्षात ठेवायला पाहिजे की नविन सदस्य बोलत असताना आपआपसात बोलू नये.

**श्री.देवराम भोइर :-**

महापौर महोदया,गेले दोन महिने महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या माध्यमातून महापालिकेच्या हद्दीमध्ये जे छोटे मोठे नाले आहेत ते युध्दपातळीवर साफ करण्यासंदर्भात विविध सोसायटयाना कामे दिलेली आहेत.या महापालिकेमध्ये ११६ नगरसेवक असून,त्याच्या प्रभागातील छोटे मोठे नाले आहेत.ते नाले पावसाळयापूर्वी साफ होणे गरजेचे आहे. यासाठी मा.महापौर महोदयानी,आयुक्तांनी,सभागृह नेत्यानी,विरोधीपक्षनेते तसेच उपमहापौर त्यानी देखील नालेसफाईबाबत दौरे केलेले आहेत.मागच्या महिन्या बजेटचे मिटींग लावली असताना त्यावेळी नालेसफाईबाबत चर्चा घडवून आणली होती.त्या चर्चेमध्ये मी देखील भाग घेतला होता. आमच्या प्रभागातील नाले अर्धा फूट देखील साफ झालेले नाहीत.वास्तविक हे नाले ५ ते ६ फूट खोलवर साफ होणे गरजेचे होते.ते न साफ झाल्यामुळे मी नळपाडयातील नाल्याबाबत सभागृहात बोललो होतो. नळपाडयातील नाल्याची इतकी भयानक परिस्थिती आहे की, थोडा जरी पाऊस पडला तर तेथील नागरिकांच्या घरी पाणी जाऊ शकेल.त्यामुळे तेथे मनुष्यहानी होण्याची शक्यता नाकारता

येत नाही.मी ज्यावेळी सन १९८९मध्ये स्थायी समितीचा सभापती असताना आमच्या कमिटीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या श्रीमती वीणा भाटीया होत्या.त्यावेळी देखील नळपाडयातील नाल्यातील पाण्यात १०ते १५ माणसे वाहून गेली होती.१००ते १५० म्हशी त्या पाण्यामध्ये गुदमुरुन मेल्या. त्यावेळी प्रशासनाला जाग येवून शहरात छोटे मोठे नाले बांधण्यांस सुरुवात केली.त्यानंतर आजतागायत असे नाले बांधलेले नाहीत. हे नाले बांधणे सोडाच,पण मूलभूत जे नाले आहे ते ज्या पध्दतीने साफ होणे गरजेचे होते. ते साफ न झाल्यामुळे त्याठिकाणी केव्हाही थोडासा जरी पाऊस आला तरी तेथील नागरिकांच्या घरात पाणी जाऊन त्यांच्या घरातील वस्तूचे नुकसान होऊ शकते.माजिवडयापासून जो नाला वाहतो त्याबाबत मी श्री.हिर्लेकर,श्री.अशोक बुरपुल्ले यांच्याशी सुध्दा बोललो.या नाल्यामध्ये जो गाळ आहे पहिला नाला ७ते ८ फुट खोल होता.तो आता ६ फूट उंच आलेला आहे.त्यावेळी तेथे कीतीही पाऊस पडला तरी त्या ६फूटाच्या गाळातून पास व्हायचा.त्यामुळे तेथील नागरीकांना त्याचा कधीही त्रास झाला नाही.परंतु गेल्या वर्षापासून नाल्यातील पाणी तेथील नागरिकांच्या घरात घुसत आहे.शेवटी त्या भागातील नागरिकांचे संरक्षण करणे हे तेथील नगरसेवकाचे कर्तव्य आहे.ते कर्तव्य आम्ही व्यवस्थितरिक्त पार पाडीत आहोत.महापौर महोदय ज्यावेळी आम्हाला वाटते की,शहरामध्ये जास्त पाऊस पडणार आहे.त्याठिकाणी आमची यंत्रणा उभी असते.पावसाळयामध्ये कोणत्या प्रभागात आपत्कालीन परिस्थिती उदभवू नये म्हणून आम्ही त्यांना मदत करतो.आदरणीय श्री.सुभाष भोईर यांनी माझ्या प्रभागात येऊन पाहणी केली.लोंढा बिल्डरच्या सहमतीने त्या भागात पाईप टाकण्याची काही गरज नव्हती. कारण त्याठिकाणी पाणी साचतच नाही.लोंढा बिल्डरने आपल्या जागेत भराव टाकल्यामुळे तो भाग उंच झालेला आहे आणि गौतमनगरची वसाहत खाली आलेली आहे. त्यामुळे तेथील पाणी गौतमनगरमध्ये घुसते.ते पाणी आम्ही २-३ वर्षापासून चर मारुन काही बिल्डरचे सहकार्याने पाणी काढीत आहोत.मा.आयुक्त महोदय ज्यावेळी २००६-०७ मध्ये नाल्याचे डिपीआर तयार करण्यांत आले. त्या डिपीआर अतंर्गत जे मुलभूत नाले समाविष्ट केले होते. त्या नाल्याचे काम सद्या सुरु आहे. उर्वरित ठिकाणी काम अजूनपर्यंत सुरु झालेले नाही.त्यामध्ये नळपाडयातील नालाचा समावेश आहे.

मा.आयुक्त महोदय, मला आपणास विनंती करावयाची आहे की, जे डीपीआरमध्ये नाल्याचे काम घेतले आहे. त्या नाल्याचे बांधकाम प्रथम पूर्ण करा आणि त्यानंतर नविन नाले बांधण्यात घ्यावेत. परंतु ज्याठिकाणी संबंधित बिल्डरने महापालिकेस पत्र पाठविले आहे.त्या पत्राच्या अनुषंगाने महापालिका कार्यवाही करणार असेल तर मला वाटते की महापौर महोदया ज्या ठिकाणी लहानाचे मोठे झालो त्या गावठाणामध्ये आज ते लोक राहत आहेत.आयुष्याची पुंजी जमा करुन आपल्या घरात सुधारणा केल्या आहेत. सदर घरे हटविण्यासाठी एखादा बिल्डर महापालिकेस पत्र देतो आणि आपण ती घरे उध्वस्त करीत असाल तर ते आम्ही सहन करणार नाही. येथील बिल्डर जो मूलभूत नाला आहे तो ड्राप्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. महापौर महोदय आपण मला उद्या आपला अमूल्य वेळ दिला तर आपण त्या जागेची पाहणी करु शकतो.ज्यावेळी श्री.सुभाष भोईर यांनी त्या भागाची पहाणी केली तेव्हा त्यांना ती परिस्थिती पाहून धक्काच बसला.त्याठिकाणी नाल्याची आवश्यकता नसताना प्रशासन त्याठिकाणाहून नाला काढण्याचा घाट घालण्याचा प्रयत्न करुन तेथील लोकांना वेठीस धरीत असेल तर गोष्ट आयुक्त महोदय आपण थांबवावी. शेवटी आपण टीपीआर अंर्तगत नाल्याचे काम करण्यासाठी तरतूद केली आहे.त्या नाल्याची कामे तातडीने करण्यांत यावी.आणि पुन्हा महासभेपुढे तो डीपीआर येऊ द्या आणि त्या डीपीआरमध्ये आपण नविन कुठचे नाले घेतो त्याची माहिती सभागृहाला सांगावी अशी मी आपणास विनंती करतो. याबाबत मी संबंधीत अधिका-याकडे मागील २-३ महिन्यापासून पाठपुरावा करीत आहे.जो पर्यत ज्या मुलभूत नाल्याची बांधकाम पूर्ण होत नाही तोपर्यत नवीन नाले घेण्याचा प्रयत्न करु नका.शेवटी आपल्याला नाले बांधावयाचे असतील तर पावसाळयानंतर पुन्हा विचार करु.परंतु या पावसाळयात या लोकांना उध्दस्त करु नका.शेवटी आपला निर्णय

हा अंतिम राहिल.पावसाळयात दोन दिवस जास्त पाऊस झाला तरच तो नाला भरुन वाहतो. त्यानंतर तो नाला पुन्हा वाहत नाही. त्याठिकाणी महापालिका ३० फुटाचा नाला काढण्यासाठी १० कोटी रुपये खर्च करणार असेल तर मला वाटते की, या १० कोटी रुपयांमध्ये ठाणे शहरात विविध प्रकल्प राबवू शकतो. आम्हाला त्या भागात नाल्याची आवश्यकता नसताना तेथे नाला बांधण्यांत येऊ नये. आदरणीय
श्री.सुभाष भोईर यांनी याठिकाणी लक्षवेधी सूचना मांडली आहे. आमच्या भागातील पोकलेन टाकून साफ केले तर ते नाले साफ होऊ शकतात.मुंबई महानगरपालिकेच्या पाईपलाईन खालून आपण स्लॅब कल्व्हर्ट टाकत असल्यामुळे जे पाणी थांबते होते ते पाणी सांकेतमार्गे खाडीत जाऊ शकेल.या दृष्टीकोनातून आपण पाऊले उचलून मुंबई महापालिकेची परवानगी घेतली आहे. श्री.सुभाष भोईर यांच्या लक्षवेधीद्वारे डीपीआर अन्वये जे जुने नाले आहेत ते प्रथम बांधून पूर्ण करावेत.त्यानंतर नविन नाले बांधण्यांत यावेत अशी मी विनंती करतो.तरी आपण मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

**श्री.संजय मोरे :-**

महापौर महोदया, मा.जेष्ठ नगरसेवक देवराम भोईर यांच्या प्रभागात नालेसफाई होत नसेल तर सभागृहाची विनंती आहे. तो जो ठेकेदार आहे त्याच्यावर त्वरित कारवाई करावी.

**श्री.सुरेश कांबळे :-**

महापौर महोदया,नालेसफाईची लक्षवेधी होऊ शकते तर पाणी प्रश्नाबाबत लक्षवेधी का होऊ शकत नाही.तो आपला मूलभूत हक्क नाही का ? साठेनगरला ४-५ दिवसापासून पाणी नाही. मी नेहमी सांगतो की, वागळे इस्टेटला दुय्यम स्थान देण्यांत येत आहे.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

महापौर महोदय,याठिकाणी मा.विरोधी पक्षनेत्यांनी जी लक्षवेधी मांडली आहे.त्यांचा खुलासा करण्यासाठी सर्वजण उभे आहेत.खुलासा झाल्यानंतर त्या विभागामध्ये २-३ दिवस पाणी नाही.तरी मा.महापौर महोदय,संबंधीत अधिका-यांना येथे बोलवून खुलासा करण्यांत यावा.

**मा.महापौर :-**

प्रथम नालेसफाईवर खुलासा होईल.त्यानंतर पाणीप्रश्नावर खुलासा करण्यांत यावा.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदय, वागळे इस्टेट,रायलादेवी प्रभागात पाणी नाही.

**श्री. अशोक राऊळ :-**

महापौर महोदय, आज नालेसफाईवर विरोधी पक्षनेते श्री.सुभाष भोईर यांनी जी लक्षवेधी मांडली आहे आणि जेष्ठ नगरसेवक श्री.देवराम भोईर यांनी नालेसफाईवर जे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, जुन्या नाल्याची कामे पूर्ण झाल्याशिवाय नविन नाले बांधून नयेत.त्या संदर्भात त्यांनी प्रशासनाकडून खुलासा मागितला आहे. त्याचा खुलासा उपआयुक्त घनकचरा यांनी करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

**श्री.महेद्र कोमुर्लेकर :-**

मा.महापौर महोदया, नालेसफाई संदर्भात विरोधी पक्षनेते श्री.सुभाष भोईर आणि श्री.नारायण पवार यांनी जी लक्षवेधी मांडली आहे. त्या अनुषंगाने मुंब्रा प्रभाग समितीमध्ये ४० लाख रुपये खर्च करतो आहोत.आणि  दिवा,कौसा,मुंब्रा या भागात जवळजवळ२५ हजार मीटर नालेसफाई करतो आहोत. त्यासाठी तीन ठेकेदाराची नियुक्ती करण्यांत आली आहे.त्याठिकाणी उजव्या साईटच्या ठेकेदाराला डाव्या साईटचे नाले दिले आहेत.आणि डाव्या साईटच्या ठेकेदाराला उजव्या साईटचे नाले दिले आहे. त्यामुळे प्रशासन आणि ठेकेदार यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे कोऑडीनेशन नाही.त्यामुळे तेथील नालेसफाईला हवी तेवढी गती आलेली नाही.काही ठिकाणी तर नाल्याला अजिबात हात लागलेला नाही.आम्ही स्वतः, अधिकारी आणि ठेकेदारासोबत नाल्याची पहाणी करीत आहोत. मागच्या वेळेस या सभागृहात ४ तास चर्चा झाली.त्यावेळी आम्ही बोललो नाही. आम्हाला वाटले चर्चा होऊन आमचे नाले साफ होतील.बैतुल्ला म्हणून अमृतनगरमध्ये परिसर आहे. त्यामध्ये ती सोसायटी पूर्ण सखल भागात आहे. त्यांच्याबाजूला वसंत अपार्टमेंट नावाची सोसायटी आहे.त्याच्या शेजारी ओपन जागा नाही.तेथे नाला नाही.तेथे कच-याचा  मोठा ढीग आहे पावसाळयात तेथील पाणी बैतुल्लानगर येते. यासंदर्भात तेथील नागरिकांनी महापालिकेकडे पत्रव्यवहार केला आहे मी सुध्दा पत्रव्यवहार केला आहे.अजूनपर्यत तेथे नालेसफाई झालेली नाही.डोंगरावरुन आटंलाटा कंपनीने १ ते दिड मीटरवर नाले डायर्व्हट केलेले आहेत. आणि महापालिकेच्या नाल्याची तेवढी कॅपेसिटी नाही की तेवढे पाणी वाहून नेण्याची.मुंब्रा प्रभागातील दोन नाले मागच्या दोन वर्षामध्ये बांधलेले आहेत. बाकीच्या नाल्याचे काम अजून बाकी आहे. जवळजवळ ८ कोटीचा प्रस्ताव तयार आहे.त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही.ती कार्यवाही होणे गरजेचे आहे.आपण जे नविन नाल्यासंदर्भात टेडर काढले होते.त्यामध्ये मुंब्र्यातील दोन नाले आणि कल्व्हर्ट घेण्यांत आले आहेत आणि त्याच्यानंतर जे टेंडर निघालं त्यामध्ये भारत गिअर कंपनी अप  टू  दिवा,आणि रेतीबंदर चौक ते कळवा नाका असे टेंडर होतं.त्यामध्ये मुंब्रा कौसा गावामध्ये जे नाले आहेत त्यामध्ये समावेश करण्यांत आलेला नाही. हे होणे गरजेचे आहे.आपण यासाठी ८ कोटी रुपयाचा प्रस्ताव केला आहे.त्याचा प्रशासनाने विचार करावा जेणेकरुन  भविष्यात मुंब्र्यातील सर्व नाले बायपासने जी वाट लावली आहे त्यामुळे येथील नाले १ ते दिड किलोमिटर डायव्हर्ट करुन एकत्रित रित्या पाण्याचा लोंढा येतो.त्यातून मोठया प्रमाणावर पाणी येते. ठेकेदार फक्त माती न काढता वरील प्लास्टीकच्या पिशव्याच फक्त काढतो.यासाठी आपण ४० लाख रुपये खर्च करीत आहेत हे काम  आपण २५ मे पर्यत पूर्ण होणे गरजेचे होते. आधीच पावसाने २५ दिवस उशिर केलेला आहे. आम्ही वारंवार प्रशासनाच्या आणि ठेकेदाराच्या मागे फिरतो आहे.अजूनपर्यत आमच्या येथील नाले साफ झालेले नाहीत.या संदर्भात मी माझा अहवाल संबंधीत अधिका-याकडे दिलेला आहे. या कामासाठी आपण जे ठेकेदार नेमले आहेत ते त्या त्या प्रभागासाठी नेमले असते तर हा प्रश्न मुंब्र्यामध्ये निर्माण झाला नसता.कारण ठेकदाराला सुध्दा कळत नाही की आपण कुठले नाले साफ करायला पाहिजेत.प्रशासनाने ठेकेदाराला योग्य ते आदेश देऊन ती कार्यवाही पूर्ण करावी.

**श्री.नारायण पवार :-**

महापौर महोदया, आपण जो आपत्कालीन कक्ष उघडला आहे. पावसाळयामध्ये आपण दरवर्षी सर्व्हे करतो. ज्या सकल भागात पाणी साठते त्या भागातील नागरिकांना त्याचा फार त्रास होतो.त्या संदर्भात आपण डीसी रुलमध्ये तरतूद करणार आहात का ?

**श्री.श्रीकांत सरमोकदम :- (उपआयुक्त,घनकचरा व्यवस्थापन)**

मा.महापौर महोदया,याठिकाणी श्री.देवराम भोईर यांनी नळपाडयाचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्याठिकाणी नाल्याचे पात्र मोठ आहे.मशीन उतरुन त्याठिकाणी आणलं जातं या नाल्यामध्ये जो कचरा जमा होतो तो काढण्यासाठी तेथे रस्ता नाही.तो कच-याचा डोंगर नाल्यात आहे तो कमीत कमी ३ पावसाळयाचा आहे.प्रत्यक्ष पाहणीच्या वेळी मी सांगितलं होतं की,तो बाहेर काढण्यासाठी जागा नाही.हा प्रश्न आहे.तेथे अस्तित्वात असलेल्या शौचालयाची भिंत पाडून तो कचरा काढता आला असता.पण तो आता पावसाळयात तो शक्य नाही.एकूण ९ प्रभाग समितीमधील ७०ते ८० टक्के नाले सफाई झालेली आहे. दरवेळेला आपण ठेकेदाराला काम देतो.काम सुरु केल्यानंतर ८-९ दिवसात पावसाळा सुरु होतो.

**श्री.देवराम भोईर :-**

महापौर महोदय, त्याठिकाणी पलीकडच्या साईटला ब-याच बिल्डरची मागे चालू आहेत.त्याच्या भागातून त्या नाल्यात पोकलेन उतरविल्यास बरेचसे नाले साफ होऊ शकतात.

**श्री.श्रीकांत सरमोकदम :-उपआयुक्त**

महापौद महोदय, हा प्रश्न मागील ३-४ वर्षापासूनचा आहे. तो ढीग एकढा मोठा आहे की तो आज ना उद्या काढावा लागेल.नालेसफाईचे काम कामगार सहकारी संस्था ३३ टक्के,सुशिक्षीत बेरोजगार ३३ टक्के,नोंदणीकृत कंत्राटदार ३४ टक्के अशाप्रकारे कामाची विभागणी केली आहे.काही सन्मा. सदस्यांनी सांगितलं की नाला वरुन साफ करणे आवश्यक आहे.तर काही ठिकाणी मधला भाग अगोदर साफ केला,त्यानंतरच्या ठेकेद्राराने वरचा भाग साफ केला.त्यामुळे डबल कचरा उचलण्याची वेळ आली.मुब्र्यांमध्ये ७७ टक्के नालेसफाई झालेली आहे.तरी तुमच्या काही तक्रारी असतील त्या माझ्याकडे दयाव्यात.नौपाडा ९० ते ९२ टक्के,उथळसर,वागळे,कळवा ८५ टक्के,रायलादेवी,मानपाडा८०टक्के, कोपरी व वर्तकनगर ८५ टक्के, व रेल्वे कल्व्हर्ट जवळजवळ ९० टक्के नाले साफ झालेले आहेत.ही जरी टक्केवारी खरी असली तरी काही कोप-यामध्ये कचरा राहिला असेल तो आम्ही साफ करुन. सामान्यतः ठेकेदाराची कार्य पध्दती अशी असते की, काम सुरु केलं आणि पाऊस आला तो पावसात कचरा वाहून देणं.सन्मा.श्री.कांबळे यांच्या प्रभागातील नाला साफ केल्यानंतर दुस-या दिवशी काढलेल्याच्या ३०टक्के कचरा परत नाल्यात जमा होतो.त्या कच-याकडे गादया आदी वस्तू होत्या.

**श्री.सुरेश कांबळे :-**

महापौर महोदया,महापालिकेमध्ये ठराव झाला होता की, एखाद्या मंडळाला तो कचरा उचलणेबाबत योजना आखली होती. एखादी महिला १०-१० रुपयामध्ये कचरा उचलते.तेव्हा आपण त्यांना पैसे देत नाही.महापालिकेने त्यांना २०००रुपये देण्याबाबत ठराव केला तर त्यांना तिथून पैसे मिळाले नाहीतर आपण त्यांना येथून ५० टक्के येथून देऊ.एखादी महिला महिनाभर मेहनत करणार आणि त्यांना त्याच्या कामाचे पैसे मिळाले नाहीत तर त्याचे घर कसे चालणार. याबाबत महापालिकेने सुध्दा विचार करावयास हवा.महापालिका नालेसफाईवर १ कोटी रुपये खर्च करुन शकते.तर आपण या महिलांना दरमहा २ हजार रुपये मिळाले तर नाल्यात कचरा पडणार नाही.

**मा.महापौर :-**

मा.आयुक्त साहेबांनी यांची नोंद घेतली आहे.

**श्री.श्रीकांत सरमोकदम :-उपआयुक्त**

महापौर महोदय, हे करीत असताना मघाशी सांगितल्याप्रमाणे ज्या हद्दीत आमचे छोटे वाहन देखील जात नाही.कचरा पेटी देखील नाही.आणि तेथील स्थानिक नागरीक नाल्याचा उपयोग कचरा कुंडीकरीता करतात.अशा प्रत्येक भागातील जागा शोधून त्याच वस्तीतील लोकांना हे काम दिले ते त्यावर आळा बसू शकेल.बाहेरची व्यक्ती दिली तर ती व्यक्ती काम करीत नाही असा अनुभव आहे.

**श्रीमती. सुरेखा खातू :-**

महापौर महोदय,आता आम्हाला सांगण्यात आले की, गल्ली बोळयातील जेथे गाडी जाते,पण आमच्या सोसायटीमध्ये अगोदरच्या दोन टिप झाल्या की एमएए सोसायटी व सहयाद्री सोसायटयामध्ये घंटा गाडया येतच नाही.याबाबत आम्हाला सुपरव्हायझरला फोन करावा लागतो.उत्तर मिळते दोनटिप्स झाल्यामुळे तुमच्या भागात घंटागाडी येणार नाही.

**श्री.नरेश म्हस्के :-**

महापौर महोदय, ज्यावेळी नालेसफाईबाबत सभागृहामध्ये चर्चा होती.त्यावेळी मा.मनोज शिदे,नारायण पवार आणि सभागृहातील ब-याचशा नगरसेवकांनी चर्चा केली. खाडी किनारी मोठमोठे बिल्डर भरणी टाकत आहेत. त्यामुळे नाल्याचा मूळ प्रवाह बदला आहे.ते पाणी शहरात घुसणार आहे.लोढा,हिरानंदानी,रुस्तमजी या सारखे बिल्डरांनी कोलशेतपर्यत भरणी केलेली आहे. ही भरणी करण्यासाठी आपल्या ड्रेनेज विभागाची परवानगी लागते.ती परवानगी घेतली का ? आणि परवानगी घेतली नसेल तर त्यांच्यावर आपण काय कारवाई केली.याबाबत आपण ठराव केला होता.पावसाळा सुरु झाल्यानंतर त्याच्यावर कारवाई करण्याचा उपयोग होणार नाही.लोढा बिल्डरने किती नाल्याचे प्रवाह अडविले आहे यांची आपण पहाणी करा.

**श्री.राजन किणे :-**

महापौर महोदय, अशा प्रकारे मुंब्र्यामध्ये ग्लोबल बिल्डरने नैसर्गिक नाल्याला प्रवाह बदलून काम केले आहे.मिलेनियम हॉस्पिटलसमोर.कारण पावसाळयामध्ये डोंगरीवरुन जे पाणी येते ते नागरी वस्त्यामध्ये घुसते.

**श्री.नजीम मुल्ला :-**

महापौर महोदय,या सभागृहात नव्याने पध्दत चालू करा की जेवढे विषय सभागृहात मांडले जातात त्यांची किती पूर्तता होते.आश्वासन मिळतात त्याची माहिती मिळावी.जे डोंगरावरुन पाणी पायथ्यापर्यत येते तेथ घोडबंदर येथे नाल्याचे काम चालू आहे.तेथील नाल्याचे प्रवाह बदलण्यात आली आहे यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.ग्रामीण भागातील नाल्याची स्पष्ट नोंद नकाशावर आहे. त्यांची शहरविकास विभागाने चौकशी करावी आणि आम्हाला माहिती द्यावी.तसेच वृंदावन सोसायटी ते कोळीवाडा येथून जुना नाला जातो. तो नाला वृंदावन सोसायटीमधून खाडीत जातो. या नाल्यावर काही दिवसापूर्वी अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे तो नाला स्वच्छ होत नाही.वृंदावनची हद्दी संपून कोळीवाडयाची सुरुवात होते तिथे. या संदर्भात सन्मा.सदस्य श्री.मिलिंद पाटणकर यांनी प्रशासनाकडे पत्र पाठविले आहे. मी देखील पत्र दिलेले आहे. जोपर्यत या नाल्यावरील अतिक्रमण काढत नाही तो पर्यत कोळीवाडयाचा मागचा परिसर आहे. तेथे पाणी साचण्याची शक्यता आहे. तरी सदर नाल्यावरील अतिक्रमण हटवून तो नाला स्वच्छ करण्यांत यावरा.

**श्री.सुभाष भोईर :-**

महापौर महोदय, या अनुषंगाने आम्ही मुंब्रा प्रभाग समितीमध्ये ठराव केला आहे.घरोघरी जाऊन कचरा जमा करणा-या महिलांकरिता आमच्या नगरसेवक निधीतून दरमहा जमा करावेत.जेणेकरुन नाले साफ राहतील आणि नाल्यात कचरा टाकण्या-या प्रवृत्तीला आळा बसेल.

**श्री.राजन विचारे** :-

महापौर महोदया याबाबत बजेटमध्ये तरतूद करण्यांत आली आहे. पण त्यावर कार्यवाही होत नाही.

**श्री.मनोहर हिर्लेकर :- कार्यकारी अभियंता,**

महापौर महोदय,कासारवेला येथील भरणीबाबत सांगितले.ते भाग आपल्या हद्दीत येत नाही.आपल्याकडे जी तक्रार आली आहे. त्याची १-२ दिवसात पहाणी करतो.आपले नाले पुढे अडले असतील तर त्याची देखील पहाणी करतो.सन्मा.सदस्य श्री.राजन किणे यांनी मिलेनियम हॉस्पिटलसमोरील नाल्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी आज सकाळीच श्री.डोंगरे यांच्यासमवेत गेलो होतो.त्याठिकाणी नाल्याचा मार्ग बदलेला आहे असे काही मला आढळले नाही.

**श्री.राजन किणे** :-

महापौर महोदय,ही आहे आपण प्रस्ताव मंजूर करण्यासाठी परवानगी दिली असेल.पण आपण इतर ठिकाणी नाल्याचे प्रवाह बदल्याबाबत शहर विकास विभागाकडून प्रस्ताव मंजूर करीत असतो.त्यामध्ये आपण एक अट टाकतो की,सदर नाल्याचे बांधकाम विकासकाने करावी.असे असताना सदर काम महापालिकेने करावे असे बिल्डर दबाव आणीत आहेत.त्यासाठी ते आपल्याकडे क्लीन सर्टीफिकेटसाठी येतील.कारण का तर त्याची त्या नाल्याचा प्रवाह बदलल्यामुळे मागे जो अलार्ट एरीया आहे तेथे पाणी साचते.त्यासाठी आपण तेथे नाला बांधून घेणे आवश्यक आहे.माझ्या माहीतीप्रमाणे इतर ठिकाणी प्रस्ताव मंजूर करीत असताना विकासकाना नाले बांधणीसाठी अट टाकून ते नाले बांधून घेतले आहेत.त्या नाल्यासंदर्भात विकास प्रस्ताव मंजूर होऊ दिड वर्षे होऊन गेली आहे. तरी तो नाला पूर्ण होईपर्यत त्यांनी क्लीन सर्टीफिकेट देऊ नये.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदय, त्याचप्रमाणे मी आणि श्री.नरेश म्हस्के यांनी की,लोंढा,हिरानंदानी,रुस्तमजी या बिल्डरवर कार्यवाही करावी असा ठराव केला होता. त्यांच्यावर कार्यवाही का झाली नाही त्यांचा अहवाल आम्हाला दयावा.

**श्री.महेंद्र कोमुर्लेकर :-**

महापौर महोदय,आता पावसाळा सुरु होत आहे. मुब्रा,कौसा,दिवा येथील नाल्यावर मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे चालू आहेत.याबाबत आपण वेळोवेळी कारवाई करीत असता.पण ठोस अशी कारवाई झालेली नाही.आता पावसाळा सुरु होणार असल्याने या अनधिकृत बांधकामाचे पेव सुटणार आहे.तरी याबाबत प्रशासनाने मोठया प्रमाणात कारवाई करण्यांचे आदेश द्यावेत.

**सौ.अनिता गौरी :-**

महापौर महोदय, माझ्या प्रभागात दत्तवाडी,सिरॉक्सच्या शेजारी दोन अनधिकृत बांधकामे होत असून ती अधिकृत असल्याचे समजले आहे. त्यांना ओ.सी.देण्यांत येऊ नये.त्या बांधकामामुळे तेथील नैसर्गीक नाला बंद झालेला आहे. त्या बांधकामाच्या विकासकाला प्रशासनाने सांगितले होते की नैसर्गिक नाल्याचा मार्ग बंद करुन नका.तरी देखील सदर विकासकाने तेथे अनधिकृत बाधकाम केले आहे.परिणामी तेथे पावसाचे पाणी साठण्याची शंक्यता आहे. याबाबत मा.आयुक्त साहेब आपण पहाणी केली होती.प्रश्नोत्तरामध्ये या दोन बिल्डींग संदर्भात विचारलं होतं.त्यावेळी शहर विकास विभागातून मला सांगण्यांत आले होते की, ते टीएमसी पास आहे. तेथे ड्रेनेजचा प्रश्न असताना त्यांना ओ.सी देण्यांत येऊ नये.तसे संबंधित बिल्डरना कळविण्यांत यावं.तसेच त्याठिकाणी नाल्याचे काम करण्यांत येत आहे त्या कामापुढे पुढच्या नाल्यातील पाणी रिव्हर्स येते ते काम आपण पहावे.

**श्री.मनोहर हिर्लेकर :-**

महापौर महोदय, आपण आताच कामाला सुरुवात केली असल्यामुळे बरीचशी कामे आपण पूर्ण करु शकलो नाही. ती कामे आपण करणार आहोत.

**सौ.अनिता गौरी :-**

महापौर महोदया, प्रभागातील नाले साफ करतांना त्या नाल्यातील गाळ आपण रस्त्यावर ठेवला आहे. तो पावसाळयात पुन्हा नाल्यात जाण्याची शक्यता आहे.

**श्री.अशोक राऊळ :-**

मा.महापौर महोदय,आज याठिकाणी श्री.सुभाष भोईर आणि श्री.नारायण पवार यांनी महत्वाच्या विषयावर लक्षवेधी मांडली आहे.तरी या लक्षवेधीबद्दल त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो.नेहमीची येतो पावसाळा असेआपण म्हणतो.आणि नालेसफाईवर दरवर्षी चर्चा होते. अनेक सभासदानी या सभागृहात पोटतिडकीने चर्चा केली होती.मी आपल्याला याठिकाणी सांगू इच्छितो की,२-३ वर्षापूर्वी २६जुलैला जी परिस्थिती निर्माण झाली ती परिस्थिती यावर्षी होऊ नये.म्हणून ज्या पध्दतीने आपण जी काळजी घेणे आवश्यक होते ती आपण घेतलेली नाही. असे मला नाल्याची पहाणी करताना आढळून आले आहे. नालेसफाईबाबत मा.आयुक्त, मा.महापौर, मा.उपमहापौर,मा.विरोधी पक्ष यांनी पहाणी दौरे केले होते. त्यांच्या अहवालावरुन दिसून येते की,नालेसफाई म्हणावी तेवढी झालेली नाही.तसेच याठिकाणी झालेल्या श्री.देवराम भोईर,मनोज शिंदे ,नजीम मुल्ला आणि नरेश म्हस्के यांनी चर्चा केली.नाल्याचा नॅचरल फ्लो बदलण्याचा काही बिल्डरनी प्रयत्न केला आहे. आणि त्या संदर्भात आपल्याकडून ज्याप्रकारची कार्यवाही व्हावयास पाहिजे होती त्याप्रकारची दक्षता आणि कार्यवाही केली गेली नाही.तसेच त्यावेळी आपल्याकडे पूरजन्य परिस्थिती निर्माण होते त्या परिस्थितीला सर्वसामान्य नागरीक सामोरे जातो.त्यामध्ये त्याची जीवित आणि मालमत्तेची हानी होत असते.या विकासकावर आळा घातला नाहीतर सर्वसामान्य जनता आपल्याला जबाबदार धरल्याशिवाय राहणार नाही.प्लॅन पास करताना इतर अनेक गोष्टी घडत असतात.परंतु या नाल्याचा नॅचरल फ्लो बदलण्याच्या बाबतीत आपल्याकडून कुठल्याही प्रकारची चुक होता कामा नये याची दक्षता आपण घ्यायला पाहिजे.परंतु ती घेतली जात नाही.ती आपल्या सर्वाच्या चर्चेतून मला जाणवली.मा.महापौर महोदय,याठिकाणी हिरानंदानी,रुस्तमजी,लोंढा असो.हायवेच्या पलीकडे तारांगण कॉम्प्लेक्स विकसित होत आहे.त्याठिकाणी

दिडशे फूट नाल्याचे डायव्हर्जन होत आहे.आणि त्याबाबत आम्ही प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करुन सुध्दा त्याच्यावर कारवाई होत नाही.आणि इथे आम्हाला थातुरमातुर उत्तरे देऊन सभागृह कसे गप्प बसेल आणि तो प्रश्न तसाच प्रलंबित ठेवून सभागृहाची वेळ मारुन नेली जाते.सभागृहाचे विश्वस्त म्हणून नागरिकांच्या रोषाला आम्हाला जावे लागते.याठिकाणी श्री.हिर्लेकर यांच्याबद्दल वाईट बोलत नाही. ते माझे चांगले मित्र आहेत. परंतु मी त्यांना एकच काम गेली ८ वर्षे सांगत आहे की आमच्या भागात ३ चेंबर्स आहेत त्यामधून पाण्याचा निचरा होत नाही.ते तीन चेंबर्स साफ केलीत तर बाकीचे कामे मार्गी लागतील. ज्या एकात्मिक नाले विकास प्रकल्पावर साडे चार कोटीचे टेंडर मंजूर केला.विकासाच्या दृष्टीकोनातून आपण महत्वाचे निर्णय घेतो.परंतु सामान्य माणसाला साध्या कामासाठी प्रशासनाची मनधरणी करावी लागते.याबाबत आमच्या सारख्या माणसाला काय वाटत असेल याचा विचार केला जात नाही.मा.महापौर महोदया या सर्व प्रकरणात तुम्हाला आम्हाला सखोल चौकशी करणे भाग आहे.या मोठया बिल्डरने नाले बुजविण्याचा प्रयत्न केला असेल त्याच्यावर कठोर कारवाई करुन अशाप्रकारे धारिष्ट नविन माणूस करणार नाही.अशाप्रकारचे भीतीचं वातावरण या शहरामध्ये निर्माण झालं पाहिजे.त्यादृष्टीकोनातून महापौर महोदया आपण तातडीने निर्णय घ्याल की ज्यांनी अशाप्रकारचे गुन्हे केले असतील.आपण एखादया इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम केले असेल तर त्यांना आपण एमआरटी लावतो.परंतु जो माणूस शेकडो माणसाच्या मालमत्तेला किंवा जिवित हानीला जबाबदार होऊ शकतो.त्यांच्यावर आपण कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नाही ही अक्षम्य बाब आहे.त्यासंदर्भात सभागृहाने असा निर्णय घ्यावा की,अशा पध्दतीने जो बिल्डर वागत असेल की आम्ही काहीही केलं तरी आमच कोण वाकड करुन शकत नाही.आम्ही कोणालाही खरेदी करु शकतो.अशी जर त्यांचा धारणा असेल.तर आम्ही कुठेतरी कमी पडतो आणि आमचे धोरण विकासकाच्या बाजूने आहे की काय असे त्या दुर्घटनेमध्ये किंवा पूरग्रस्तांची लाखो रुपयांची मालमत्ता वाहून जाते किंवा जिवित हानी होते.त्यासाठी आम्ही योग्य तो निर्णय घेतला नाही अशी जर त्यांची धारणा झाली तर निश्चितपणे आमच्या सारख्या सभागृहातील विश्वस्तांना योग्य ठरणार नाही.म्हणून महापौर महोदया मला म्हणवेसे वाटते की आपला अकुंश या प्रशासनावर असला पाहिजे असे आम्ही सभागृहातील विश्वस्त म्हणून आपणांस सांगत आहोत.तरी अशा प्रकारच्या चुका करणा-या विश्वस्तावर कठोर कारवाई करण्यांत यावी अशी आमची एकमुखाने मागणी आहे.

**श्री.सुरेश कांबळे :-**

महापौर महोदया, गेल्या ५-६ दिवसापासून पाणी नाही.

**मा.महापौर :-**

यासंदर्भात आपणांस खुलासा करण्यांत येईल.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

महापौर महोदया,आज या सभागृहात मा.विरोधी पक्षनेते श्री.सुभाष भोईर यांनी नालेसफाईबाबत या सभागृहात लक्षवेधी मांडली आहे. तसेच काही सन्मा.सदस्याच्या प्रभागातील नाले अद्यापही साफ झालेले नाही त्याबाबत त्यांनी या सभागृहात चर्चा केलेली आहे. तरी त्या ठिकाणी ज्या ठेकेदाराना काम देण्यात आले आहे.त्यांच्या कामाची बिले अदा करण्यांत येऊ नयेत.जोपर्यंत समाधानकारकरित्या नालेसफाई होत नाही.

**श्री.कैलास मुंबईकर :-कार्यकारी अभियंता**

महापौर महोदया, वागळे, रायलादेवी प्रभाग समिती जो पाणीपुरवठा केला जातो. त्याठिकाणी दि.८ तारखेला २४ तासाचा शटडाऊन होता.

**श्री.सुरेश कांबळे :-**

महापौर महोदया, हे मोठे अधिकारी आपल्या कॅबिनमध्ये असतात.आम्हाला त्याची पेपरवर्कची उत्तरे नकोत.त्याठिकाणी जेई, डेप्युटी अधिकारी नेहमी राऊंड मारतात.त्याचे आणि यांचे उत्तरामध्ये नेहमी तफावत असते. गेल्या ८ तारखेला काम होतं हे आम्हाला नको.

**श्री.शैलेश शिंदे :-**

महापौर महोदया, नेहमी प्रमाणे पाण्याची समस्या निर्माण झाली कि, हे अधिकारी येथे येतात आणि सांगतात की, एवढं एमएलडी पाणी आलं. काल किती एमएलडी पाणी इंदिरानगर टाकीला. याबाबत आपण एकदा तरी इंदिरानगर टाकीला भेट दिली आहे. काल किती सप्लाय केला.अहो काल आपण १५ मिनिटे पाणी देऊ शकला नाहीत तेथील नागरिकांना. तुमच्या पेपरवर काही असेल त्याच आम्हाला काही देणंघेणं नाही.

**श्री.सुरेश कांबळे :-**

महापौर महोदया, मी आता इंदिरानगर टाकीवर फोन केला होता.त्यांनी सांगितलं की, इंदिरानगर टाकीचा एक संप बंद आहे ज्यावेळेस महासभेत चर्चा होते त्यानंतर दोन दिवस चांगल्या रितीने पाणी येते.नंतर तीच परिस्थिती निर्माण होते.

**श्री.शैलेश शिंदे :-**

महापौर महोदया, काल २० मिनिटे पाणी आलं हे त्यांच्या पेपरवर आहे का ? हा अहवाल असेल तर आपण याठिकाणी बोला.

**श्री.सुरेश कांबळे :-**

महापौर महोदया,श्री.मुंबईकर साहेब आपण गेल्या ८ तारखेचे उत्तर देत आहात. आमच्या येथे ५-६ दिवसापासून पाणी नाही.इंदिरानगर,साठेनगर,हनुमाननगर येथेच पाण्याचा प्रश्न का निर्माण होतो.

(सभागृहात गोधळाची परिस्थिती )

**श्री.ढोले :- कार्यकारी अभियंता-इंदिरानगर)**

महापौर महोदया इंदिरानगर येथील पाण्याच्या टाकीला जो ॲडीशनल पाणीपुरवठा आपल्याला करावयाचा आहे. त्यासाठी ब्युस्ट पंपिग स्टेशन उभारण्यात येत आहे त्यासाठी साधारणतः ८ दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.त्यासाठी इलेक्टीकल इन्स्पेक्टर यानी पहाणी केलेली आहे. त्यानी इलेक्ट्रीक सप्लायचे काम पूर्ण केले आहे.त्यानंतर तेथील भागाला रोज ४५ एमएलडी पाणीपुरवठा होऊ शकेल.इंदिरानगरचं पाणी एकूण ३४ एमएलडी आहे.कार्यकारी अभियंता श्री.भसेसाहेब रजेवर आहेत.

**श्री.सुरेश कांबळे :-**

महापौर महोदया, कार्यकारी अभियंता श्री.भसे साहेब यावेळे रजेवर जाण्यास नको होतो.कारण याठिकाणी उत्तर देण्यासाठी कोणतरी हवं असतं.त्याचं अर्धा इंचाच्या पाईपलाईपवर बारीक लक्ष असतं.एखादा व्यक्ती त्याठिकाणी नविन पाईपलाईन कनेक्शनसाठी आला तर महासभेमध्ये सांगितलं आहे की,त्याचे कनेक्शन ७ दवसात झाले पाहिजे. पण आम्हाला श्री.भसेसाहेब आम्हाला जाचक अटी सांगतात. कारण वागळे इस्टेट मधील जागा एमआयडीसीची आहे.त्यामुळे आमच्या टॅक्स पावतीवर अनधिकृत असा शिक्का आहे. तो महापालिकेचे सर्व कर भरतो. त्यांना आपण नविन नळ कनेक्शन देण्यास काय प्रॅाब्लेम आहे. नळ कनेक्शनचे सर्व पेपर असताना त्या नागरिकांना विचारण्यांत येते की तुमच्या येथील अर्धा इंची नळाला प्रेशर किती आहे.त्यांना प्रेशरचे काय कळते.नविन नळ कनेक्शनबाबत कागदपत्रावर २-२ महिने अधिका-यांच्या सहया होत नाही. शेवटी तो खाजगी प्लंबरकडून नळ कनेक्शनचे काम करु घेतात. ही चुक कुणाची.ठिक आहे भसे साहेब ६ महिन्यापूर्वी रायलादेवी प्रभाग समितीमध्ये आले. त्यानी ती अट तेथे लागू केली.मग त्यांच्या अगोदरच्या अधिका-यांनी १९९५च्या अगोदरच्या कागदपत्रावर सहया केल्या त्याच्यावर आपण काय कारवाई करणार आहात.आता आपण ६ महिन्यानंतर १९९५च्या कागदपत्रावर सही करणार नाही. ते नागरीक वागळे मधील असो किंवा ठाणे शहरातील असो त्यांना पाणी हे लागणारच.आपण दोन-दोन वर्षे पाण्याचे बिल देणार नाही. आणि एकदम दंडासहित २-३ वर्षाचे पाण्याचे बिल तेथील नागरीक कसे भरणार.

**श्री.मनोज लासे :-**

महापौर महोदया,पाणी टंचाईबाबत महत्वाची चर्चा होत असताना, नविन कॉम्प्लेक्स तयार होत आहेत. तेथे आपल्या विभागाचे अधिकारी सरसकट पाण्याच्या लाईन देतात.त्यासाठी पाण्याचा प्रेशर पाहिला जात नाही.आणि झोपडपट्टीला पाणी दयावे लागते तेव्हा पाण्याचा प्रेशर पाहिला जातो.मग या लोकाना पाणी दयायचं नाही हा आपला उद्देश आहे का ?श्री. भसे या अधिका-यांनी महापालिकेत चुकीची प्रथा पाडली आहे. महापौर महोदया, गेली २ वर्षे वागळे प्रभागातील नगरसेवक श्री.शैलेश शिंदे,श्री.होडावडेकर ,सौ.अनिता सावंत आणि इतरानी प्रभाग समिती कार्यक्षेत्रात अनेक वेळा पाठपुरावा केला,महासभेतसुध्दा आवाज उठवला,अधिकारी येतात,तात्पुरती उत्तरे देतात आणि त्यानंतर काहीच कामे होत नाहीत.याला जबाबदार कोण ? महापौर महोदया, आम्ही नवनिर्वाचित नगरसेवक आहोत आमच्या प्रभागातील लोकाची मागणी आहे,काय उत्तरे देणार आम्ही लोकांना.

**श्री.सुरेश कांबळे :-**

आयुक्त महोदय, वागळे इस्टेट पाण्याच्या प्रश्नाबाबत ठोस निर्णय घ्यावा.

**श्री.शैलेश सावंतः-**

महापौर महोदया मी आपल्या एक गोष्ट लक्षात आणून देतो की, आजपर्यत पाणी प्रश्नावर लक्षवेधी मांडली जाते किंवा पाणी प्रश्नावर चर्चा केली जाते त्यानंतर १० ते १५ दिवस प्रभागातील पाणीपुरवठा व्यवस्थित चालू असतो. याचा अर्थ आपण वागळे इस्टेटला पाणी देऊ शकतो. आणि वागळे प्रभागातील नगरसेवक याठिकाणी चर्चा करेल.त्याच्या प्रभागात पाण्याचा सप्लाय सुरळीत असतो. त्यानंतर परत १५ दिवसानी पाणी टंचाई भासू लागते. या अर्थ असा की अधिकारी जाणूनबुजून वागळे प्रभागाला पाण्यापासून वंचित ठेवतात.आणि हे पाणी आजुबाजूला फिरविता हा माझा आरोप आहे. तरी मा.महापौर महोदया आणि

मा.आयुक्त महोदय आपल्याकडून मी अशी अपेक्षा ठेवतो की,यापुढे वागळे प्रभागात रेग्युलर सप्लाय केला जाईल जर आपण याकडे लक्ष ठेवलं तर.

**सौ.सुनिता सावंत :-**

महापौर महोदय, या शहरामध्ये पाणी २ टाईम येते. तर आमच्या वागळे प्रभागात १ तास पाणी मिळू शकत नाही.

**श्री.देवराम भोईर :-**

सन्मा. महापौर महोदया,आता कमीत कमी ६-७ भगिनीना त्याच्या प्रभागामध्ये पाणी मिळत नाही अशा प्रकारची ओरड या सभागृहात करीत आहेत.आपल्या महापालिकेला मोरवे धरणाचे १००एमएलडी पाणी नवी मुंबई महानगरपालिका देण्यास तयार आहे. याबाबत माझी तेथील खासदाराची चर्चा झाली.ते आपण पाणी घेतलं तर आपल्या एकही महिला भगिनीची सभागृहामध्ये पाण्याबाबत ओरड होणार नाही. याबाबत महापौर महोदया आपण जातीने या प्रश्नाकडे लक्ष दिलंतर भलं ठिक ठाणे महानगरपालिकेचे पाणी जेव्हा येईल तेव्हा येईल.पण सद्या आपल्याकडे पाण्याची जी ओरड आहे तर हे पाणी आपण का घेत नाही.

**श्री.अशोक वैती :-**

महापौर महोदया, आज याठिकाणी पाण्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. वागळे इस्टेट, इंदिरानगर, समतानगर गेल्या १० दिवसापासून पाणी टंचाई जाणवत आहे. आपण महापालिकेच्या तळमजल्यावर पाणीपुरवठया संदर्भात माहिती कक्ष उघडला आहे. ते कशासाठी काढली आंहे. फक्त एसीमध्ये बसून राहण्यासाठी केलं आहे का ? आम्ही याबाबत तेथे चौकशी केली असता आम्हाला कळते की, तेथे समतानगर,वागळेनगरच्या पाण्याच्या टाकीची इन्ट्री नाही.आयुक्त महोदय हा कक्ष कशासाठी आपण उघडलेला आहे. त्यांच्याकडे माहिती नसेल तर ते बंद करा.तरी याबाबत आम्हाला माहिती दयावी.

**श्री.पांडुरंग पाटील :- (सभागृह नेता )**

महापौर महोदया,वागळे आणि रायलादेवी प्रभाग समिती क्षेत्रामध्य गेलं ४ दिवस पाण्याचा तुटवडा आहे. ज्यावेळी पाण्याचा शटडाऊड घेता त्याच्या दुस-या दिवशी पाण्याचा प्रेशर कमी असतो.तर सतत ४ दिवस पाणी येत नसेल.आणि याठिकाणी श्री.शैलेश शिंदे यांनी जो आरोप केला आहे की महापालिकेचे काही अधिकारी जाणूनबुजून पाणी डायर्व्हट करण्याचा प्रयत्न करीत आहेत ही अतिशय गंभीर बाब आहे. प्रत्येक नगरसेवकांची याठिकाणी एकच मागणी आहे की, आम्हाला चौविस तास पाणी पुरवठा नको आहे फक्त १ तास तरी योग्य प्रेशरने पाणीपुरवठा करा. तसेच ज्यावेळी आपण एका ठिकाणी शटडाऊन घेतो त्यावेळी दुस-याठिकाणी लोडशेडिंग आहे. तरी या लोंडशेडिगबाबत एमईसीबीला विनंती करा की, ज्यावेळी आपण तेथून पाणी सोडतो त्यावेळची लोंडशेडिगची वेळ चेंज करा.जेणेकरुन हा जो कमी दाबाचा प्रश्न निर्माण होतो त्याला कुठेतरी दिलासा मिळू शकते. याबाबत आपण काही करणार आहात की नाही.बुस्टबाबत आपण सांगितलं की ८ दिवसांत हा प्रश्न मार्गी लागेल.त्याकाळात आपण झोपडपट्टीना टॅकरने पाणीपुरवठा करा.ही सुविधा तेथे उद्यापासून सुरु करा.

**श्री.ढोले :- कार्यकारी अभियंता**

महापौर महोदया,सभागृह नेत्यानी आज याठिकाणी जे मुद्दे उपस्थित केले त्यावर आम्ही निश्चित विचार करु.

**मा.महापौर :-**

पाणी प्रश्नावर अनेक आपली बरीच चर्चा झालेली आहे. त्यावर आपल्याला ठोस असे उपाययोजना करावयाची आहे.

**श्री.मधुकर होडावडेकर :-**

महापौर महोदया, गेले १५ दिवस वागळे प्रभागात पाणी टंचाई आहे. आणि आमच्या येथे रात्रीचे पाणी येते ते सुध्दा बंद करण्यांत आले आहे. सकाळी ६ ते १० या कालावधीमध्ये जे पाणी सोडण्यांत येते ते सकाळी ७ वाजता येते. त्याला प्रेशर नसतो.आणि ९ वाजता लोडशेडिग असते त्यामुळे आमच्या भागातील लोकाना पाणीपुरवठा कसा होणार.याबाबत मी चौकशी केली असता हे पाणी रहेजा कॉम्प्लेक्सला फिरवलं आहे.श्रीमतांना पाणीपुरवठा केला जातो तर आमच्या येथील झोपडपट्टयांना पाणीपुरवठा का करण्यांत येत नाही.तर माझी आपणांस विंनती आहे की, सदर भागाचा पाणीपुरवठा प्रेशरने सुरळीत करावा.

**श्री.संजय मोरे** :-

मा.महापौर महोदया,मघाशी सन्मा.सदस्य श्री.सुरेश कांबळे यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता.वागळे इस्टेट प्रभाग समितीमध्ये श्री.भसे,कार्यकारी अभियंता आल्यापासून त्यांनी नविन नळ कनेक्शन देण्याची बंद केलेले आहे.त्यांनी ज्या अटी लावलेल्या आहे याबाबत मी त्यांच्याशी चर्चा केली आणि त्याचे याबाबत म्हणणे काय हे जाणून घेतलं तेव्हा त्यांनी सांगितले की ज्या जलवाहिनीवर कनेक्शनवर नळ कनेक्शन दयावयाचे आहे त्याची कॅपॅसिटी आहे किंवा नाही या संदर्भात ते विचारपूस कोणाकडे करणार.आज ते कार्यकारी अभियंता आहेत. त्यांच्याकडे त्या सुविधा आहे का ? त्यांना माहिती नेण्यासाठी आपल्याकडे अद्ययावत कोणतीही सुविधा नाही.हे तुम्ही कोणाला विचारणार.त्याकारणास्तव ते कनेक्शन रद्द करीत असतील देत असतील तर ते चुकीचे आहे असे महापालिकेमध्ये अनेक अधिकारी आहेत.त्यांना जर तेथे बसून काम करावयाचे नसेल तर ते नगरसेवकाच्या कामामध्ये अडथळे आणीत असतात तर ते चुकीचे आहे. याबाबत मा.आयुक्त यांना विनंती आहे की,अशा अधिका-यांना तेथे काम करायचे नसेल तर . आणि प्रभागातील नगरसेवकांच्या त्याच्याविरोधात तक्रारी आहेत अशा अधिका-यांचे त्याचे इच्छेनुसार त्यांची इतरत्र बदली करण्यांत यावी. तर नागरिकांच्या कामे नगरसेवकांच्या माध्यमातून होतील.

**श्री.अशोक वैती :-**

मा.आयुक्त महोदय आपण पाणीपुरवठया संदर्भात महापालिकेच्या तळमजल्यावर कक्ष उघडण्यांत आलेला आहे. त्याठिकाणी आम्हाला आमच्या येथील पाण्याच्या टाकीतून पाण्याची नोंद मिळावयास हवी.त्यांच्याकडे जेवढे माहिती आहे त्याची ते फक्त माहिती देतात. इतर ठिकाणची माहिती ते जागेवर जाऊन का घेत नाहीत. त्याची जबाबदारी आहे रोजच्या रोजी पाण्याच्या टाकीवर किती एमएलडी पाणी येते याची तेथे जाऊन माहिती घेण्याची.मघाशी भोईर साहेबांनी सांगितले की रक्तपात होईल.नाहीतर त्यांना एकही खुर्ची राहणार नाही त्या लोकांना.

**श्री.शैलेश शिंदे :-**

महापौर महोदया,जेसे श्री.अशोक वैती याठिकाणी म्हणाले की या गोष्टीला टाळता येत नाही आणि श्री.सुरेश कांबळे साहेब बोलले की, वागळे इस्टेटबाबत दुहेरी भूमीका घेण्यांत येते.महापालिकेच्या तळमजल्यावरील कक्षात इंदिरानगर,वागळे इस्टेट,श्रीनगर येथील पाण्याच्या टाकीबाबत कोणतीही नोंद नसते .फक्त शहरातील पाण्याच्या टाकीची नोंद असते. याचा अर्थ ठाणे महानगरपालिकेतून वागळे इस्टेटला वेगळं पाडण्याचा हेतू आहेत का ?तरी मा.आयुक्त महोदय आपणांस विनंती करतो की,तरी सदर कक्षामध्ये ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व पाण्याच्या टाकीची नोंद मिळावयास हवी. त्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.ढोले :- कार्यकारी अभियंता**

महापौर महोदया,मा.सभागृह नेत्यानी याठिकाणी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्यांची नोंद घेतली आहे. इदिरानगर पाण्याच्या टाकीमधील पाण्याची क्षमता वाचून दाखवितात.

**श्री.शैलेश शिंदे :-**

महापौर महोदया, सदर नोंद चुकीची आहे.आपण पुन्हा एकदा तपासून पहा. कारण परवा मी इंदिरानगर पाण्याच्या टाकीवर गेलो होतो.त्याठिकाणी मला २४ एमएलडी पाण्याची नोंद मिळाली आहे.तसेच कालची नोंद काय आहे.

**श्री.ढोले :- कार्यकारी अभियंता**

महापौर महोदया, परवाची नोंद ३८ एमएलडी आहे. जे नोंद तपासून आपल्याला पुन्हा एकदा दाखवितो.काल ३६.२८एमएलडी अशी नोंद आहे.

**श्री.शैलेश शिंदे :-**

महापौर महोदया,कालची नोंद देखील चुकीची आहे.जर आपण ३६ एमएलडी पाणी सोडलं तर ते पाणी कुठे गेलं.मग १५ मिनिटेच पाणी आमच्या येथे कसे काय आले.

**मा.महापौर :-**

सोमवारी श्री.भसे,श्री ढोले आणि तेथील स्थानिक नगरसेवक टाकीवरजाऊन पहाणी करतील.

**श्री.नजीम मुल्ला :-**

महापौर महोदया, ३ दिवसापूर्वी स्थायी समितीमध्ये निर्णय झाला होता की, जेल टाकीवर रोज १००-१५० टॅकर भरले जातात. पाण्याचे टॅकर भरण्याची सुविधा साकेतला दिलेली आहे.आपण आम्हाला आश्वासन दिले होते की आजपासून जेल टाकीवर पाण्याचे टॅकर भरणार नाहीत.पण मागील ३ दिवसापासून सातत्याने जेल टाकीवर फोन करतो आहे . पण तेथे अधिकारी सापडत नाहीत. यासंदर्भात पत्र अजूनही काढण्यात आलेले नाही. तरी जेल टाकीवरील टॅकर ताबडतोब बंद करा.

**श्री.अनिल सावे** :-

महापौर महोदया, एक सुचना करतो की, एक रेडिओ टेलिमेन्टी म्हणून प्रणाली आहे.तीन गोष्टी आपल्याला पहायला मिळतात.टंचाईनुसार पाणी देऊ शकतो,पाणी चोरी थांबवू शकतो आणि गळती तपासू शकतो.रेडिओ टेलिमेन्टी हा विषय आपल्याला महापालिकेमध्ये वापरता आला तर त्याचा निश्चित उपयोग करावा.

**श्री.संजय मोरे :-**

महापौर महोदया,वागळे इस्टेटमध्ये पाण्याचा एवढा मोठा प्रश्न आहे की,श्री.भसेसाहेब कार्यकारी अभियंता आहे. पण उपअभियंता नाही श्री.झगडे यांना रायलादेवी आणि वागळे प्रभाग समितीचा चार्ज होता.त्यांना आता आपत्कालीन विभागाकडे वर्ग करण्यांत आले आहे. त्यामुळे वागळे प्रभाग समितीमधील कामे वेळेवर होत नाही. तरी त्यांना येथें पूर्ण कार्यभार देण्यांत यावा.

**श्री.नारायण पवार** :-

महापौर महोदया, काही दिवसापासून शहरात देखील वेळेवर पाणी येते नाही. तर मग शहरात देखील पाणी कपात केली आहे का ?

(मा.सचिव सो. प्रकरण क्र. २ वाचुन दाखवितात.)

**श्री.मनोज शिंदे** :-

महापौर महोदया, प्रकरणाला हात घालण्यापूर्वी ठाणे शहरात मोठी खिचडी पकते आहे. सद्या ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळात खिचडीचे प्रकरण गाजते आहे.

**श्री.शैलेश शिंदे :-**

महापौर महोदया, या आपल्या ठाणे महापालिकेवर ५ विशेष समित्या आहेत. त्या विशेष समित्याची नियमावली आपल्याकडे आहे का ? या विशेश समित्याची मिटींग वर्षातून,६ महिन्यातून किवां महिन्यातून किती वेळा लागली पाहिले असा नियम आहे का?

**मा.सचिव :-**

महापौर महोदया, विशेष समित्याची मिटींग महिन्यातून लावाच अशी काही तरतूद नाही. त्याच्याकडे विषय आल्यानंतर मिटींग लावली जाते. डारंतु महिन्यातून एक मिटींग लावली.

**श्री.शैलेश शिदे :-**

महापौर महोदया, या विशेष समित्याच्या वर्षानुवर्षे मिटींग होत नाहीत. त्यामध्ये सदस्यांना बोलावण्यात येत नाही. विषयावर कोणत्याही प्रकारची चर्चा केली जात नाही.

**श्री.सुभाष भोईर** :-

महापौर महोदया, सन्मा.सदस्य श्री.शैलेश शिंदे यांनी जो प्रश्न याठिकाणी उपस्थित केला आहे. तो रास्त आहे. दरवर्षी या विशेष समित्याचे आपण गठन करतो आणि आता सचिवानी सांगितले की, असा कोणताही नियम नाही की, प्रत्येक महिन्यात सभा घ्यायलाच पाहिजे. जर महिन्यामध्ये सभा होत नसतील. तर

या समित्यामध्ये सदस्यांना बसून उपयोगच काय ? समित्यामध्ये त्या त्या खात्याचा कारभार कसा चालतो याची माहिती त्या त्या समितीच्या सभापती आणि समितीच्या सदस्याना मिळाली पाहिजे. त्या माध्यमातून त्यांनी काम केलें पाहिजे. मला आठवतयं की, गलीच्छ निर्मुलन समितीमध्ये त्यावेळी दोन सदस्य होते त्यामध्ये एक श्री.द्वारकानाथ पवार आणि श्री.विलास सामंत यांनी चागल्या प्रकारे कामकाज करुन कशाप्रकारे महापालिकेची गलिच्छ निर्मुलन समिती असावयास पाहिजे. याचा त्यांनी अभ्यास केला होता. अशा ठिकाणी सभापती आणि सदस्यांना कोणतेही अधिकार नसतील तर नावासाठी या समित्या बनवायच्या असतील तर मला वाटते की त्याच्यामध्ये कोणतेही स्वारस्थ वाटत नाही. तरी अशा समित्या शासनाकडे परत पाठवाव्यात त्यासाठी या समित्याची नियमावली बनवावी. जेणेकरुन सदर समित्याच्या सभापतीना काही अधिकार मिळू शकतील.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

महापौर महोदया, बरेचसे विषय प्रशासन सरळ महासभेपुढे पाठवित आहेत किंवा सरळ स्थायी समितीकडे पाठवितात. जे विषय समित्याच्या अनुषंगाने असतील त्या समित्याची देखील आवश्यकता आहे. तरी प्रशासनाने यापुढे त्या विषयाला समितीची मंजूरी मिळाल्यानंतरच महासभेपुढे किवा स्थायी समितीपुढे आणले जातील तर त्या समितीला कुठेतरी न्याय मिळेल.

(प्रकरण क्र. ३ वाचून दाखवितात.)

(प्रकरण क्र.३ मंजूर )

(प्रकरण क्र. ४ वाचून दाखवितात.)

**सौ.सुनिता सावंत :-**

महापौर महोदया, सदरचे प्रकरण मंजूर आहे. पण त्या संदर्भात मला थोंड बोलायचं आहे. महापौर महोदया, ठाणे महानगरपालिकेत येणारे अधिकारी हे शासनाकडून येत असतात. त्यांना पगारातून ६ टक्के ङि.ए. देण्यांत येतो. पण आपले अधिकारी एवढे वर्षे काम करीत आहे.उदा.सचिव,हिर्लेकर,डॉ.केंद्रे हे चांगले काम करीत आहेत.पण त्यांना अद्याप डी.ए. देण्यांत आलेला नाही. पण शासनाने पाठविल्याच्या अधिका-यांच्या पगारात तो तात्कार जमा केला जातो. हा आपल्या अधिका-यावर अन्याय आहे.

**श्री.राजन किणे :-**

महापौर महोदया, आपल्या महापालिकेवर शासनाकडून प्रतिनियुक्तीवर जे अधिकारी येतात.त्यामुळे आपल्या महापालिकेतील वरिष्ठ अधिका-यांची चेन कुठेतरी थांबली जाते.उदा.आपल्या महापालिकेत अतिरिक्त आयुक्त श्री. गुप्ता साहेब शासनाकडून आलेले आहेत. तसेच आपल्या महापालिकेत असे काही अधिकारी आहेत की ते त्या पदास लायक आहेत. भविष्यात आपल्याकडे या संदर्भातील अधिकारी नियुक्त करावयाचे असतील तर आपल्याच अधिकारी पदोन्नती दयावी.

**श्री.मिलिंद साळवी :-**

मा.महापौर महोदया, आपल्या महापालिकेमध्ये असे अधिकारी नाही का ते अतिरिक्त आयुक्तांच्या पदास लायक असतील. त्यांचा कालावधी दि.२९/११/२००८रोजी म्हणजे जवळजवळ ८ महिने अगोदर संपलेला असताना ते अजून पदावर कार्यरत आहेत.याबाबत खुलासा व्हावा. ते मागील ८ महिन्यापासून ते महासभेच्या परवानगीशिवाय काम करीत होते. मग ते या पदावर कसे राहू शकतात.

**श्रीमती.दिक्षीत :- कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदया, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.गुप्ता साहेबाचा कालावधी संपल्यानंतर फेब्रुवारी २००९ मध्ये त्या मुदतीवाढीबाबत प्रकरण महासभेसमोर सादर करण्यांत आले होते.त्यानंतर मध्यंतरीच्या काळात आचारसंहिता असल्याने महासभा होऊ शकली नाही.त्यानंतर ही पहिली महासभा असल्याकारणाने हे प्रकरण सादर करण्यांत आले आहे.

**श्री.मिलिंद साळवी :-**

महापौर महोदया,हे प्रकरण तहकूब प्रकरण आहे. तहकूब प्रकरणानंतर सुध्दा ते या पदावर आहेत का ? प्रकरण मंजूर पण नव्हतं आणि नामंजूर देखील नाही.मग ते त्या पदावर कसे राहिले . त्यांना मागहील ८ महिन्यात महापालिकेमार्फत सर्व सवलती देण्यांत आल्या आहेत का ? मग हे नुकसान कोणाचे आहे.तर हे महापालिकेचे नुकसान आहे. या कालावधीत महापालिकेमार्फत त्यांना जे मानधन दिले आहे. त्यांच्यावर झालेला खर्च. तरी या सर्व प्रकरणास जबाबदार कोण आहे याची माहिती दयावी.

**श्रीमती.दिक्षीत :- कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदया,याबाबत मी याठिकाणी स्पष्टीकरण देऊ इच्छितो की, मिरा भाईदर महानगरपालिकाला सचिवाकडून पत्र आलेले आहे.

**श्री.नारायण पवार :-**

महापौर महोदया,सभागृहाची आपण दिशाभूल करीत आहात.मिरा भाईदर महापालिकेने जर चुका केल्या असतील त्या आपण पुन्हा करायच्या का ?

**श्री.सुभाष भोईर :- (विरोधी पक्षनेता)**

महापौर महोदया,आपली महापालिका जुनी असून मिरा भाईदर महापालिका आताची आहे. याठिकाणी सन्मा.सदस्य श्री.मिलिंद साळवी यांनी जी सुचना मांडली आहे ती रास्त आहे.दि.२९/११/२००८ रोजी एखाद्या अधिका-याची मुदत संपते. या महानगरपालिकमध्ये प्रथा आहे की,एखादया अधिका-यांची मुदत संपण्याच्या अगोदर ३ महिने मुदत वाढीचा प्रस्ताव मा.महासभेपुढे आणणे गरजेचे होते.तसे आपण न करता आचारसंहितेचा बाऊ करत आहात. मुळात त्याची मुदत नोव्हेबर २००८ मध्ये संपलेली असताना त्यांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव ३ महिने अगोदर आणणे गरजेचे होते.तसेच त्यांची मुदत संपल्यानंतर डिसेबर किंवा जानेवारी महिन्यात हा प्रस्ताव आणू शकला असता.त्यावेळी आचारसंहिता नव्हती.जर त्यांना ८ महिने सेवेमध्ये ठेवल्यामुळे आपण जे काही आर्थिक खर्च केला आहे. त्याची जबाबदारी कोणावर असणार आहे याचा येथे उलगडा होणे आवश्यक आहे.कुठल्याही प्रकारची महासभेची मंजूरी नसताना अतिरिक्त आयुक्त पदाच्या एखादया व्यक्तीला महापालिकेमध्ये ठेवणे हे कायदयाच्या विरोधात आहे. आम्ही कुठल्याही व्यक्तीच्या विरोधात नाही.चुकीच्या पध्दतीने याठिकाणी प्रस्ताव आणल्याने आमचा याला विरोध आहे.

**मा.उपआयुक्त (मुख्यालय)**

सन्मा.महापौर महोदया, चर्चेमध्ये २-३ मुद्दे उपस्थित झाले होते त्या अनुषंगाने खुलासा करतो की, आपण राज्य शासनाकडे १९९६मध्ये अतिरिक्त आयुक्त या पदाच्या मंजूरीचा प्रस्ताव पाठविला होता.गेले ७-८ वर्षे सदर प्रस्तावाला राज्य शासनाकडे मंजूरी मिळाली नव्हती.२००७मध्ये या पदाला मंजूरी मिळाली आणि सन २००८मध्ये आपण शंासनाकडे सुयोग्य अधिकारी नेमावा अशी विनंती केली होती.त्या अनुषगाने राज्य शासनाने अतिरिक्त आयुक्त श्री.गुप्ता यांनी नियुक्ती केली आहे.सर्वसाधारणं राज्य शासनाच्या कोणत्या कर्मचा-यास कुठल्याही ठिकाणी गेल्यानंतर २ ते ३ वर्षाचा कालावधी दिला जातो.आपल्या विनंतीनुसार ही नियुक्ती केलेली आहे.दरम्यानच्या कालावधी मिरा भाईदर महानगरपालिकेमध्ये अशाच प्रकारचं प्रकरण उदभवल होतं.राज्यशासनाने दि.१२ ऑगस्ट २००५ मध्ये निर्णय कळविला आहे.

**श्री.नारायण पवार :-**

महापौर महोदया, तो जी.आर. आहे का ? मिरा भाईदर महानगरपालिकेचे दाखले आम्हाला देऊ नका.

**श्री.मिलिंद पाटणकर :-**

महापौर महोदया, ते उदाहरणा दाखल वाचून दाखवित आहे. तरी त्यांना ते वाचून दाखविण्यांत यावे.

**श्री.सुभाष भोईर :-**

महापौर महोदया, मिलिंद पाटणकर साहेब हा प्रश्न मिरा भाईदर महापालिकेचा नसून ठाणे महापालिकेचा आहे. अशा प्रकारची चुक महापालिकेने करायची.प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव आपण ३ महिने अगोदर आणणे गरजेचे होते.याबाबतीत आपण कल्याण डोबिवली महापालिकेचे नियम या महापालिकेला लागू करणार आहात का ? कल्याण महापालिकेचा नियम कुठल्याही डेप्युटीशनचा अधिकारी महापालिकेत घेऊ नये असा आहे.कुठलीही महापालिका ठाणे महानगरपालिकेच्या बरोबरीची नाही ही गोष्ट लक्षात ठेवावी. ही ’ब’ वर्ग महापालिका आहे.

**उपआयुक्त (मुख्यालय)**

महापौर महोदया, दोन्ही बाबी आपण राज्यशासनाकडे पाठवू.

**श्री.सुभाष भोईर :-**

महापौर महोदया,हा अधिकार महासभेचा आहे.शासनाने त्यांना एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीवर पाठविले आहे.

**श्री.शैलेश शिंदे :-**

महापौर महोदया, तो शासन निर्णय आहे की जी.आर. आहे हे प्रथम स्पष्ट करा.

**मा.उपआयुक्त (मुख्यालय)**

महापौर महोदय, हा शासन निर्णय आहे.

**श्री.नजिब मुल्ला :-**

महापौर महोदया,श्री.भट साहेबानी मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागात काम केलेले आहे.शासनाने कोणताही निर्णय घेतला की तो फक्त त्या केसपुरती मर्यादित राहतो की,त्याला जी.आर.च स्वरुप दिलं जातं.हे त्यांनी स्पष्ट करावं.निर्णय आणि जी.आर.मध्ये फरक आहे.

**श्री.उपआयुक्त (मुख्यालय)**

महापौर महोदया, सर्वसामान्यपणे जो शासन निर्णय प्रस्तुत केला जातो. तेव्हा त्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर असते.एखादया ठराविक गोष्टीबद्दल झालं तर ती चित्रापुरती मर्यादित असते. सन्मा.विरोधी पक्षनेत्यांनी मघाशी सांगितलं की, कल्याण डोंबिवली महापालिकेचा सुध्दा एक शासन निर्णय आहे. अशा दोन भिन्न बाबी असतील तर त्यावर मार्गदर्शन घेणे हे संयुक्त होईल.

**श्री.नजीब मुल्ला :-**

महापौर महोदया,भट साहेब आता तुम्ही म्हणालात की,प्रस्ताव १९९६ मध्ये पाठविला,आपण मागणी केली.अतिरिक्त आयुक्त यांची नोव्हेंबर २००८ रोजी मुदत संपत असताना त्यांचा प्रस्ताव २ महिने अगोदर सभागृहासमोर आणावयास हवा होता.त्यावेळी निवडणूक आचारसंहिता होती का ? यास जबाबदार असणा-या अधिका-यावर आपण काय कार्यवाही करणार आहात.एखादया अधिका-यांच्या मुदतवाढीबाबत एवढा विलंब होत असेल तर ....

**श्री.मिलींद पाटणकर :-**

महापौर महोदया, माझी सन्मा.नजीब मुल्ला यांच्या भाषणास हरकत आहे. महापौर महोदया सन्मा.श्री.नजीब मुल्ला यां सभागृहात आक्षेपार्ह विधाने या सभागृहात करीत आहेत.माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यत प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-यांचे मुदतवाढीचे ठराव ६ ते ८ महिने प्रलंबित राहत होते आणि नंतर सभागृहासमोर मंजूरीसाठी यायचे.यावेळी तो २ महिन्यांत मंजूरीसाठी आलेला आहे.त्यामुळे प्रशासन हळूहळू सुधारत आहे. सभागृहात दिशाभूल करीत आहे ही माझी हरकत आहे.

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती)

**मा.उपआयुक्त (मुख्यालय :-**

महापौर महोदया, मिरा भाईदर महापालिका ही ’ड’ श्रेणीतील आहे. आपली ’क’ श्रेणीतील आहे.आपल्याकडे जे राज्यशासनाचे  नियम आहेत सर्व सर्वत्र सारखे आहेत.आपल्याकडे प्रतिनियुक्त्यावर आलेल्या अधिका-यांचे आपल्याकडे बायलॉज नाहीत.त्यासाठी आपण काहीही केलेलं नाही.

**श्री.नजीब मुल्ला :-**

महापौर महोदया, आपण आम्हाला हजारो रुपये खर्च करुन प्रशिक्षण देण्यासाठी महाबळेश्वरला घेऊन गेला होता.तरी हे समाजशास्त्रामध्ये नाही का ?

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती)

**श्री.पांडुरंग पाटील :- (सभागृह नेते )**

महापौ महोदया, सदर विषय मतास टाकावा. महापौर महोदया हे शासन निर्णयाचे पालन करीत नाहीत.

**मा.महापौर :-**

हा विषय मंजूर करण्यांत आला आहे. तरी तो मतास टाकण्यात यावा.

**श्री.सुभाष भोईर :-( विरोध पक्षनेता )**

महापौर महोदया,मी याठिकाणी जे मुद्दे उपस्थित केले होते त्यावर मला अजूनपर्यत खुलासा मिळालेला नाही. या प्रस्तावास जबाबदार कोण आहे त्याचा प्रथम खुलासा करावा.

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती)

**श्री.देवराम भोईर** :-

महापौर महोदया,सन्मा.अतिरिक्त आयुक्त श्री.गुप्ता साहेब हयांना मुदतवाढ देण्यासाठी या सभागृहापुढे प्रस्ताव आलेला आहे. प्रस्तावाला विरोध करण्यासाठी मी याठिकाणी उभा नाहीतर प्रस्ताव आपण सांगाल तसे ज्या बाजूला प्रस्ताव करायचा ते आम्ही करु.प्रशासनाच्या याबाबतीत वारंवार त्रुटी निर्माण होतात.त्या त्रुटीचा याठिकाणा प्रशासनाकडून खुलासा झाला पाहिजे.सन्मा.सदस्य श्री.नजीब मुल्ला यांठिकाणी योग्य ते बोलत आहेत. ही चुकीचा परंपरा यापुढे चालत राहिलं ती पुढे कुठेतरी थांबायला हवी.त्यासंदर्भात आम्हाला काही सुचना करावयाच्या आहेत.त्या सुचना आपण ऐकूणच घेत नाही.

**श्री.नजीब मुल्ला :-**

महापौर महोदया, मला जे काही बोलायचे होते ते जेष्ठ सन्मा.सदस्य श्री.देवराम भोईर यांनी याठिकाणी सांगितलं आहे. मी जे काही याठिकाणी बोलतो,मी लहान असल्यामुळे माझ्या भाषणावर याठिकाणी उलट चर्चा सुरु होते.

**श्री.मिलिंद साळवी**:-

महापौर महोदया,जे मुद्दे याठिकाणी मी उपस्थित केले आहे.याचा इन्कार तुम्ही देखील केलेला नाही.विधी संल्लागाराने सुध्दा हे मुद्दे चुकीचे आहे म्हणून.ज्या पदावर ते नसताना त्यांना जो पगार मिळतो.महापालिकेच्या सर्व सुविधा मिळतात.त्यांना देण्यांत येणारे पैसे जनतेच्या करातून भरले जातात.जनतेच्या पैशाचा जो अपव्यय होत आहे त्याला जबाबदार कोण आहे..त्याचा खुलासा आम्हाला दयावा.जोपर्यत आम्ही विचारलेल्या प्रश्नाचा उहापोह याठिकाणी होत नसेल तर आम्ही या सभागृहात प्रश्न मांडायचे नाहीत का ? प्रतिनियुक्तीवर शासनाचा अधिकारी ज्यावेळेस १ वर्षासाठी येतो.त्यावेळी महासभेचे जबाबदारी आहे की, त्यांना मुदतवाढ द्यायची कि नाही ?

**मा.उपआयुक्त : (मुख्यालय)**

महापौर महोदया,एखादा अधिकारी महापालिकेमध्ये प्रतिनियुक्तीवर नोव्हेंबर महिन्यांत आला आहे.त्यांना आपण कामावर ठेवत नाही.त्यासाठी सर्वसाधारणपणे २ महिन्याचा कालावधी जातो.त्यानंतर २ महिन्याच्या कालावधीनंतर तो प्रस्ताव महासभेपुढे ठेवतो.यावेळी एखादया महिन्याचा विलंब झालेला आहे..

तसेच दुसरा मुद्दा याठिकाणी उपस्थित केला गेला की, ते महासभेच्या मंजूरीशिवाय कार्यरत राहिल्यामुळे त्यांच्या वेतनामधून कोणत्याही प्रकारची वसुंली आपण करीत नाही.

**मा.श्री.सुभाष भोईर (विरोधी पक्षनेता )**

महापौर महोदया,या गोष्टीला ९ महिने उलटून गेले आहेत.त्यांना महासभेचे मंजूरी नसताना त्यांना आपण जे काही सुविधा देता तो सर्वसामान्य जनतेच्या या करातून देता.आम्ही तीन महिने समजू शकतो, ६ महिने समजू शकतो.प्रशासनाच्या माध्यमातून ३महिन्याअगोदर त्याच्या मुदतवाढीचा प्रस्ताव सभागृहात यावयास हवा होता.ही प्रशासनाची चूक आहे. यासाठी तंत्वतः मा.महापौर,आयुक्त यांची परवानगी घेतली होती का ? ते तरी आम्हा दाखवा.नसेल तर नाही सांगा.

**श्री.देवराम भोईर :-**

सन्मा.महापौर महोदया,सन १९८८-८९ मध्ये मी स्थायी समितीचा सभापती असताना ठाणे महापालिकेची पैशाची गुंतवणूक विविध बॅकेमध्ये होती. सदर बॅकेमध्ये १ महिन्याच्या २ महिन्याच्या,६ महिन्याच्या,वर्षाच्या गुंतवणुका होत्या. त्यावेळी महिन्यांच्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये यासंदर्भातील विषय न आल्याने आपल्या महापालिकेचे व्याजाचे नुकसान होत होते. यासंदर्भातील मी माझे अधिकार संबंधित विभागाच्या प्रशासकीय अधिका-यांना दिले होते.ी कै.धर्मवीर आनंद दिघेसाहेबांनी ४१ टक्क्यांचा भ्रष्टाचार उघडकीस आणला होता. सन्मा. महापौर महोदया त्यावेळी मी त्यांना माझे अधिकार महापालिकेचे नुकसात होऊन नये म्हणून संबंधित उपआयुक्तांना दिले होते. त्यावेळी माझे देखील त्या गुन्हयामध्ये नांव आले होते.मग ९ महिन्यानंतर एखादया अधिका-यांचा मुदतवाढीचा प्रस्ताव येतो. या प्रस्तावास जे अधिकारी जबाबदार असतील. या प्रकरणावर कोणी मा.न्यायालयात दावा दाखल करुन महापालिकेच्या विरुध्द निकाल लागला तर त्याला जबाबदार कोण ? तरी मा.आयुक्त महोदय मी जो याठिकाणी प्रश्न उपस्थित केला आहे त्यावर आपण उत्तर द्यावं.

**श्री.नजीब मुल्ला :-**

महापौर महोदया,आताच जेष्ठ सन्मा.नगरसेवक श्री.देवराम भोईर यांनी सुचना केल्या आहेत त्या २-३ गोष्टीवर प्रशासनाकडून उत्तरे द्यावीत.एकतर मा.उपायुक्त (मुख्यालय) स्पष्टपणे या सभागृहात कबुली दिलेली आहे. चुक प्रशासनाकडून झालेली आहे.मुदत संपण्यापूर्वी मुदतवाढीचा प्रस्ताव सभागृहात यावयास हवा होता.तसाच विषय सहाय्यक आयुक्त श्री.आकाशी यांची मुदत दि.१/७/२००८रोजी संपते आहे. त्यांचा मुदतवाढीचा प्रस्ताव आता येत आहे. तसेच अतिरिक्त आयुक्त यांच्या मुदतवाढीबाबतचा विषय फेब्रुवारीच्या महासभेत आला होता. त्यावेळी तो प्रस्ताव का तहकूब ठेवण्यांत आला होता. याबाबत संशयाचे वातावरण निर्माण होत आहे. म्हणजे शिंदेसाहेबानी आमच्या लक्षात आणून दिले आहे.यामध्ये त्याची कोणती कामे राहिली होती, कोणती कामे करणे बाकी होती. काम झाले तर ठेवायचे नाहीतर परत पाठवायचे. सन्मा.सदस्य श्री.नरेश म्हस्के यांना भेटले नाहीत याची देखील शंका येते.

**श्री.संजय मोरे :-**

महापौर महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अशाप्रकारचं वक्तव्य करणे हे बेजबाबदारीचे लक्षण आहे.

**श्री.नरेश म्हस्के :-**

महापौर महोदया,सन्मा.श्री.नजीब मुल्ला यांनी याठिकाणी भाष्य केले त्याबद्दल त्यांनी सभागृहाची माफी मागावी.

**मा.महापौर :-**

श्री.नजीब मुल्ला आपण आपले शब्द मागे घ्या.

**श्री.नजीब मुल्ला :-**

महापौर महोदया, मी बोललो की जिल्हाप्रमख आहे.ठाणे महापालिकेची जबाबदारी आहे की, साहेबानी येऊन त्याना त्याची अडचण समजावून सांगितली असेल.प्रस्ताव परत घेतला असेल मंजूरीसाठी ..सभागृहात तहकूब झालेला विषय परत कसा विषयपत्रिकेवर घेण्यांत आला. असं काय घडलं

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती)

**श्रीमती सुरेखा खातू :-**

महापौर महोदया, श्री.नजीब मुल्ला यांना शब्द मागे घ्यावयास सांगा. त्यांना सभागृहाचा वेळ वाया घालवायचा आहे.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदया,सन्मा.सदस्य श्री.नजीब मुल्ला यांनी दि.१६/२/२००९ रोजी प्रकरण क्र.३१९ हे प्रकरण तहकूब झालं असताना,त्याला विरोध झाला असताना, पुन्हा हे प्रकरण मंजूर करण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याठिकाणी संशय त्यांनी निर्माण केला असेल तर प्रशासनाने किंवा महापौर महोदया आपण यावर खुलासा देणे गरजेचे आहे.

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती)

**श्रीमती सुरेखा खाते :-**

महापौर महोदया, सदर प्रकरण मतास टाका.

**श्री.नजीब मुल्ला -**

महापौर महोदया, प्रकरण मतास टाकण्यापूर्वी आमच्या प्रश्नांवर खुलासा करावा.

**श्री.सुभाष भोईर :-**

महापौर महोदया,मा.आयुक्त महोदय आपण या प्रकरणी खुलासा करुन सदर प्रकरण मतास टाकण्यात यावा.

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती)

**मा.महापौर :-**

सदर प्रकरण मतास टाकून मंजूर करण्यांत आला आहे.

**श्री.सुभाष भोईर :-**

महापौर महोदया,मा.आयुक्तांना याठिकाणी खुलासा केला तर सन्मा.सदस्यांचा खुलासा होईल.

**मा.आयुक्त :-**

मा.महापौर महोदया,सभागृहाला माझी विनम्र विनंती आहे की, सन्मा.सदस्यांचे सकाळपासून एकच म्हणणे आहे की आपण बोला,आपण बोलू नका.आयुक्तांना सभेच्या संपूर्ण चर्चेमध्ये आपले निवेदन करण्याचा अधिकार आहे. माझी आपणांस विनती आहे की,एका मर्यादेच्या पलिकडे आपण म्हणता की, आयुक्त तुम्ही बोला आयुक्त तुम्ही बोलू नका.प्रत्येकाची झाकली मूठ असते. आयुक्त आपली मर्यादा ओळखतात.तरी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे,हात जाडून विनंती आहे की,दर वेळेला आपण बोलून,आपण बोललातं तर आयुक्तांना निवेदन करायचं तुम्ही बोलला नाहीतर आयुक्तांना खाली बसायचं. हे कळत नकळत आयुक्तांच्या पदाचां अपमान होता हे कदाचित चुकीचं होणार नाही.ही सर्वाना विनंती आहे.या ठरावात ज्याच्या बाबतीत चर्चा झाली आहे ती बाजूला ठेवून,मी फक्त याठिकाणी २-३ विषयांच्या बाबतीत खुलासा करु इच्छितो.एक मुद्दा म्हणजे आपल्याकडे वरिष्ठ अधिका-यांचा वणवा आहे.या संदर्भात आपल्या सभागृहात वारंवार चर्चा होते. आपल्या कामाची व्याप्ती इतकी वाढली आहे की, त्या मानाने आपल्याकडे जेष्ठ अधिका-यांचा वाणवा आहे.क्रेटर मॅनरमध्ये अनेक त्रुटी आहे. आपल्याला माहित असेल की आपल्याकडे रेग्युलर कॅडरमधून आलेले दोन उपआयुक्त त्याचे शासनाकडे प्रस्ताव देखील केलेले नाहीत.प्रत्येक उपआयुक्त,आरोग्य अधिकारी,सिटी इंजिनिअर या सर्वाचे प्रस्ताव शासनाकडे पाठविणे हा आमचा दोष आहे. पण २महिने ३ महिने विलंब झाला म्हणून सभागृहामध्ये जाब विचारणार असाल तर तेवढयाच काटेकोरपणे काम केले पाहिजे तर कामकाज ठप्प होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.एवढे मी सभागृहाला विनंती करतो आयुक्त सर्वसाधारण कल पाहून आहे तो गाडा पुढे चालू ठेवायचा असतो.दि.३० नोव्हेंबर २००७ मध्ये आलेले अधिकारी याचा प्रस्ताव दि. १७ नोव्हेबर २००८ च्या सुमारास माझ्याकडे आला होता.दि. १९ नोव्हेंबर २००७च्या सुमारास तो मी मंजूर करुन दिलेला आहे.यामध्ये संकेत असे असतात की, शेवटी हे सभागृह सर्वोच्च आहे.जरी आमच्या काही अधिका-यांनी विवरण केले असतील, किवा महापालिकेचे दाखविले असतील.सभागृहाच्या भावनाचा अवमान करुन कुठल्याही अधिका-यांला ठेवायलाच पाहिजे. हे तरी आयुक्त अट्टाहास करणार नाही यांची मी सभागृहाला ग्राही देतो.सभागृहाची जी भावना आहे सभागृहाचे जे मत आहे. त्याचा सतत आदर करण्यातील मी आहे आणि दुसरी एक बाजू अशी आहे की,शासनाने नियुक्तीवर पाठविलेला अधिकार असतो. त्याला आपण कार्यमुक्त करीत नाही.तोपर्यत त्याचे वेतन,भत्ते जे काही आपण म्हणालात सुविधा ते सर्व आपण ग्राहय धरणे अनिर्वाय असते. माझी प्रशासनाकडून निश्चितपणे जे २ महिने जे सन्मा.सदस्यांनी सांगितलें.सभागृहाच्या निर्णयासाठी आपण एखादा प्रस्ताव पाठविला असेल.शासनाने पाठविला सभागृहाची गरज आहे किंवा नाही हे म्हणणे देखील चुकीचे
आहे. एकीकडे प्रशासन आपल्याकडे प्रस्ताव पाठवतं दुसरीकडे आम्ही त्यासाठी उहापोह करणे हे कितपत बरोबर आहे याशी मी सहमत होणार नाही. एकदा विषय सभागृहाकडे पाठविला की या विषयाला सभागृहाने मान्यता दिली तर कायम होतील सभागृहाने मान्यता दिली नाहीत.डिस्कन्टयुन्यूव्ह होतील आणि यापुढे दक्षता निश्चितपणे घेण्यात येईल.कुठलाही प्रतिनियुक्तीवर जो अधिकारी आहे.त्याची प्रतिनियुक्ती संपन्याच्या किमान दोन महिने अगोदर म्हणजे आस्थापना विभागाने दक्षता घ्यावी आणि आम्ही देखील दक्षता घेऊ.अशाप्रकारची कटूता कुठल्याही प्रकारची निर्माण होणार नाही. एवढीच आपणाला ग्वाही देऊन जास्त भाषण करणे टाळतो.

**मा.महापौर :-**

सदरचा विषय मतास टाकून मंजूर करण्यांत येत आहे.

**मा.सचिव :-**

प्रकरण क्र.४ च्या मतदानासाठी प्रस्तावाच्या बाजूने ३८ मते पडली आहे. प्रस्तावाच्या विरोधात १७ मते पडली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती)

(मा.महापौर सायं.७.००वाजता सभा खंडीत करतात.)

प्रकरण क्रमांक २ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० अन्वये खालील पांच विशेष समित्यांवर प्रत्येकी ९ सदस्यांची संख्याबळानुसार नेमणुक करणे.

१) महिला व बालकल्याण समिती
२) क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती
३) माध्य. व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती
४) आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती
५) गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २, दिनांक -२०/६/२००९**

**निर्णय**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या पांच विशेष समित्यांवर प्रत्येकी ९ (नऊ) सदस्य नियुक्तीसाठी पालिका सदस्यांची तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात ठाणे महानगरपालिका शिवसेना गटाचे एकूण ६६ संख्याबळाच्या प्रमाणात प्रत्येक समितीसाठी पांच सदस्य व लोकशाही आघाडीच्या गटाचे एकूण ४९ संख्याबळाच्या प्रमाणात प्रत्येक समितीसाठी चार सदस्य नामनिर्देशित करणेबाबत महापौर यांचेकडे समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची यादी सादर केलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे सदस्य नामनिर्देशित करण्यांत येत आहेत.

**१) महिला व बालकल्याण समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | सौ.छाया मनोहर राव | |
| २ | कुमारी योगीता रमेश वैती | |
| ३ | सौ.अपर्णा नंदकुमार यादव | शिवसेना गट |
| ४ | सौ.महेश्वरी संजय तरे | |
| ५ | सौ.राधा फत्तेबहादूरसिंग | |
| ६ | सौ.मनिषा साळवी | |
| ७ | सौ.शगुफता नसिर खांन | लोकशाही आघाडी |
| ८ | सौ.कल्पना पाटील | |
| ९ | श्रीमती आशरीन इब्राहीम राऊत | |

## २) क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.राम हरि हेगडे | |
| २ | श्री.मनोज विठ्ठल लासे | |
| ३ | श्री.संजय भाऊराव मोरे | शिवसेना गट |
| ४ | श्री.संतोष वसंत वडवले | |
| ५ | श्री.घनश्याम कणसे | |
| ६ | श्री.रविंद्र पाटील | |
| ७ | श्री. यासिन कुरेशी | |
| ८ | श्री.राजेश ठाकूर | लोकशाही आघाडी |
| ९ | श्री.अन्सारी असलम सलीम | |

## ३) माध्य. व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती

| | | |
|---|---|---|
| १ | सौ.अनिता अशोक सावंत | |
| २ | सौ.अनिता सुनिल गौरी | |
| ३ | सौ.अनिता राजन किणे | शिवसेना गट |
| ४ | सौ.सुहासिनी लोखंडे | |
| ५ | श्री.दशरथ बाबुराव पालांडे | |
| ६ | श्री.शैलेश सावंत | |
| ७ | श्री.सय्यदअली अश्रफ | लोकशाही आघाडी |
| ८ | श्री.मिलींद पाटील | |
| ९ | श्रीमती हफिजा नसरुद्दीन नाईक | |

## ४) आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

| | | |
|---|---|---|
| १ | श्री पद्माकर संभाजी कांबळे | |
| २ | सौ.वनिता गंगाराम इंदिसे | |
| ३ | श्री.राम पांडुरंग रेपाळे | शिवसेना गट |
| ४ | श्री.संजय प्रभाकर सोनार | |
| ५ | श्री.दिनेश पाथरे | |
| ६ | सौ.प्रमिला केणी | लोकशाही आघाडी |
| ७ | सौ.अपर्णा साळवी | |
| ८ | श्री.राजेश खारकर | |
| ९ | श्रीमती केवलादेवी रामनयन यादव | |

## **५) गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती ताई मारुती भोंडवे | |
| २ | श्री.राजेश नामदेव सारंग | शिवसेना गट |
| ३ | श्री.जनार्दन कृष्णा खेतले | |
| ४ | श्री.आनंदा तुकाराम केसरे | |
| ५ | सौ.शांता शामजी सोलंकी | |
| ६ | श्री.अशोक राऊळ | लोकशाही आघाडी |
| ७ | श्री.मधुकर होडावडेकर | |
| ८ | श्री.दिनेश कांबळे | |

वरील पाचही समित्यांवरील सदस्यांची मुदत १ (एक) वर्षाकरीता राहील याबाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी.

सही/- (सौ.स्मिता सुभाष इंदुलकर)
महापौर/पिठासीन अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

प्रकरण क्रमांक ३ : ठाणे महानगरपालिकेच्या दि.१९/१/२००९, दि.१९/१/२००९, दि.३/२/२००९, दि.४/२/२००९, दि.५/२/२००९ व दि.१०/२/२००९ रोजीच्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत वाचून कायम करणेबाबत.

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ३, दिनांक : २०/०६/२००९

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या दि.१९/१/२००९, दि.१९/१/२००९, दि.३/२/२००९, दि.४/२/२००९, दि.५/२/२००९ व दि.१०/२/२००९ रोजीच्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत वाचून कायम करीत असताना सन्मा.सदस्यांनी काही सूचना व दुरुस्त्या सुचविलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे :-

दि.१०/२/२००९ रोजी इतिवृत्तांमधील पान क्र.१८ वरील प्रकरण क्र.२७९ बाबतचा विषय खारेगांव येथील तलावाच बाजूला असलेल्या वस्तीला साईनगर असे नाव देणेबाबत चे ऐवजी आनंदनगर जकात नाका येथे ३० टन वजनाचा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) पध्दतीने वजन काटा बसविणेबाबत असे वाचावे. तसेच पान क्र.१९/२ वरील प्रकरण क्र.२८० बाबत परिच्छेद एक वरील पोलीसांचे दल कमी पडणार असल्याने १०० कर्मचारी कायमस्वरुपी महापालिकेकडे उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रस्तावित करण्यांत येत आहे चे ऐवजी पोलीसाचे दल कमी पडणार असल्याने १०० पोलीस कर्मचारी आस्थापेनवर महापालिकेकडे उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रस्तावित करण्यांत येत आहे असे वाचावे.

सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या उपरोक्त दुरुस्त्याव स सुचनांसह ही सर्वसाधारण सभा ठाणे महानगरपालिकेच्या दि.१९/१/२००९, दि.१९/१/२००९, दि.३/२/२००९, दि.४/२/२००९, दि.५/२/२००९ व दि.१०/२/२००९ रोजीच्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत वाचून कायम करीत आहे.

सुचक : श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक : श्री.सुभाष भोईर

सर्वानुमते मंजूर......

सही/- (सौ.स्मिता सुभाष इंदुलकर)
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

( तद्नंतर मा.महापौर महोदया सायंकाळी ७.०० वा. सभा खंडीत झाल्याचे जाहीर करतात.)

सही/-(सौ.स्मिता सुभाष इंदुलकर)
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा खंडीत झाल्याची वेळ - सायंकाळी ७.०० वा.
दिनांक : २०/६/२००९
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सही/-
**(प्र.म. निंबर्गी )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.